१९३७-२०२६ ९० वर्ष

# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड शुक्रवार । दि. २५ सप्टेंबर २०२६ । अंक ११० । पृष्ठे १० । किंमत ५ ₹ । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in


## अंदाज समिती रायगड दौऱ्यावर

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी।

राज्य विधी मंडळाची महत्वाची असलेली अंदाज समिती तीन दिवस रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर असणार आहे. शासकीय विकास कामांचा व खर्चाचा आढावा या समितीच्या माध्यमातून घेतला जाणार आहे. जिल्ह्यातील रखडलेला अलिबाग-रोहा मार्ग, मुंबई-गोवा महामार्ग, जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या वेतनासह पोलीस पाटील यांच्या मानधनातील अपहार, जिल्हा रुग्णालयाच्या दुरुस्तीवर झालेला कोट्यवधींचा खर्च आणि जिल्हा क्रीडा संकुलाच्या असलेल्या पान २ वर

## उद्या अंक नाही!

अनंत चतुर्दशीनिमित्त शुक्रवार, दि. २५ सप्टेंबर २०२६ रोजी कृषीवल कार्यालयाला सुट्टी असल्याने शनिवार, दि. २६ सप्टेंबरचा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची सर्व वाचक, वितरक, जाहिरातदार व हितचिंतक यांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


श्रीगणेश चतुर्थीच्या हार्दिक शुभेच्छा

रजि. नं. : आर.जी.डी./ए.बी.जी./आर.एस.आर./सी.आर./३०८/९२

कमळ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अलिबाग

(ISO 9001 : 2015 मानांकन प्राप्त तसेच CBS सेवाप्रणाली असणारी रायगड जिल्ह्यातील अग्रेसर पतसंस्था)

मुख्य कार्यालय : कमळ भवन, शिवाजी चौक, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२ २०१, दूरध्वनी क्र. ०२१४१-२२६७१६/२२७८६६

कमळ ग्राहक दिन ठेव योजना

ठेवीचा व्याज दर द.सा.द.शे. ९.३०%

ठेव योजनेचा कालावधी ५५५ दिवस

७५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांसाठी - ०.१०% अधिक व्याज

प्रत्येक कुटुंबाची, कुटुंबातील प्रत्येकाची - कमळ पतसंस्था




## वेधक

### मोहोपाड्यात वीज कोसळली

**रसायनी :** मोहोपाडा येथे सायंकाळी विजांच्या कडकडाटासह झालेल्या मुसळधार पावसादरम्यान वीज कोसळल्याने ग्रामस्थांच्या घरातील विद्युत उपकरणांचे नुकसान झाले. ग्रामपंचायत सदस्या रसिका खराडे यांच्या घराजवळ वीज पडल्याने परिसरातील सुमारे १२ ते १३ घरांतील टीव्ही, फ्रीज, पंखे, वायफाय राऊटर, सीसीटीव्ही यंत्रणा यांसह विविध विद्युत उपकरणांचे नुकसान झाले. सायंकाळच्या सुमारास अचानक विजांचा कडकडाट वाढला आणि मोठ्या आवाजासह वीज कोसळली. त्यानंतर रसिका खराडे यांच्या घरातील वायफाय राऊटरने पेट घेतला, तर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या डिव्हाईस वायर जळाल्या. प्रसंगावधान राखत घरातील सदस्यांनी तत्काळ आग विझवल्याने पान २ वर

### टीना रबर कंपनीत भिंत कोसळली

**वाडा /विक्रमगड :** वाडा पोलीस ठाणे हद्दीतील विक्रमगड रोडवरील टीना रबर कंपनीमध्ये भिंत कोसळल्याने तीन कामगारांचा जागीच मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली. मृतांमध्ये केशव वालकु गुनगुणा (वय ५५, रा. मोह, ता. विक्रमगड, जि. पालघर), मीरा जानू गवळी (वय ६०, रा. वसुरी, ता. विक्रमगड, जि. पालघर) आणि रंजना दिलीप कोंब (वय ३५, रा. कोंब पोशेरी, जि. पालघर) यांचा समावेश आहे. उपलब्ध माहितीनुसार, विक्रमगड तालुक्यातील आपटी आणि वाडा तालुक्यातील पाली हद्दीत असलेल्या टीना रबर कंपनीमध्ये हे तिघेही कामगार काम करत होते.सकाळी काम सुरू असताना कंपनी परिसरातील भिंत अचानक कोसळली. त्यानंतर हे तीन कामगार भिंतीखाली दबले गेले. त्यांना तातडीने बाहेर काढण्याचे प्रयत्न करण्यात पान २ वर

### रेल्वेच्या धडकेत प्रवाशाचा मृत्यू

**नेरळ :** पळसदरी रेल्वे स्थानकात येण्यासाठी रूळ ओलांडत असलेल्या एका प्रवाशाला पुण्याकडून आलेल्या गाडीचा धक्का बसला. या अपघातात त्या प्रवाशाचाच मृत्यू झाला आहे. पळसदरी स्थानकाजवळ आज सकाळी ट्रॅक ओलांडताना मेल एक्स्प्रेसची धडक लागून एका प्रवाशाचा मृत्यू झाला. वासरे खोंडा परिसरातील सखाराम हिलम हे नेहमीप्रमाणे पळसदरी स्थानकावरून लोकलने खोपोली येथे नोकरीसाठी जात होते.त्यावेळी खोपोली लोकल पकडण्यासाठी रूळ ओलांडत असताना पुण्याकडून येत असलेल्या मेल एक्स्प्रेस गाडीने सखाराम हिलम यांना धडक दिली. कर्जत रेल्वे पोलिसांनी तातडीने जखमी अवस्थेत असलेल्या हिलम यांना कर्जत उपजिल्हा रुग्णालयात हलवले मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

# लाचखोर भस्मेचा 'साहेब' कोण?

## जिल्हा परिषद अध्यक्ष संशयाच्या भोवऱ्यात?

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

साहेबांना सांगून बदली करून देण्यासाठी योगेश भस्मे यांनी दिड लाख रुपयांची लाच मागितली असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. त्यामुळे लाचखोर भस्मेचा साहेब कोण, असा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर संशयात भोवऱ्यात सापडले असल्याची चर्चा असून यामागील खरा सुत्रधार कोण याचा शोध रायगडचे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग घेतील का असा सवाल उपस्थित केला जात आहे.

रायगड जिल्हा परिषदेच्या पवित्र पोर्टल अंतर्गत सुमारे ३५१ शिक्षकांचे समुपदेशन आणि समायोजन प्रक्रिया बुधवारी (दि.९) राबविण्यात आली होती. अलिबागमधील कुंठेबाग येथील प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात ही प्रक्रिया आयोजित करण्यात आली होती. शिक्षकांच्या सोयी, अंतर, उपलब्ध रिक्त जागांचा ताळमेळ बसविण्यासाठी हे सत्र ठेवले होते. विद्यार्थ्यांच्या हितासाठी समायोजन करण्यात आले होते. सुरुवातीला अवघड क्षेत्राला प्राधान्य देण्यात आले. दक्षिण रायगडमधील शाळांमध्ये समायोजन करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली होती. तक्रारदार यांच्या पत्नीची रायगड जिल्हा परिषद शिक्षण विभागात शिक्षक म्हणून निवड झाली होती. समुपदेशानंतर त्यांना नियुक्त केलेली तळा तालुक्यातील वाशी हवेली ही शाळा देण्यात आली होती. मात्र तक्रारदार यांच्या पत्नीला सुधागड तालुक्यातील पाली येथील शाळेत बदली पाहिजे होती. बदली करण्यासाठी त्यांनी प्रशासनाकडे मागणी केली होती. दरम्यान जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांचे स्वीय सचिव योगेश म्हसे यांनी साहेबांना सांगून बदली करून देतो असे सांगून तक्रारदार यांच्याकडे दीड लाख रुपयांची लाच मागितली होती. अलिबागमधील समाधान हॉटेलमध्ये दुपारनंतर पैसे घेऊन या असे त्याने बुधवारी (दि.२३) दुपारी पावणे दोन वाजण्याच्या सुमारास सांगितले. या पडताळणीनंतर तातडीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या उपअधीक्षक सरिता भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने सापळा रचला. रक्कम ठेवलेले खाकी पाकीट कापडी पिशवीतून काढून पुन्हा कापडी पिशवीत ठेवल्याचे दिसून आले. अखेर साडेचार वाजण्याच्या सुमारास योगेश भस्मेला लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आले.

रायगडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या तक्रारीमध्ये भस्मे याने साहेबांना सांगून बदली करून घेतो असा उल्लेख आहे. त्यामुळे लाच घेऊन भस्मे कोणत्या साहेबांकडून काम करून करून घेणार होता, असा प्रश्न जनतेकडून उपस्थित केला जात आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून भस्मे हा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षाचा स्वीय सचिव म्हणून काम करीत होता. त्यामुळे जिल्हा परिषद अध्यक्ष वाकडीकर हे संशयाच्या भोवऱ्यात सापडल्याची चर्चा जिल्हा परिषदेमध्ये सुरु आहे.



### भस्मेच्या कारकिर्दीतील बदल्यांच्या चौकशीची मागणी

योगेश भस्मे गेल्या सहा महिन्यांपासून अध्यक्षांचे स्वीय सचिव आहेत. बदली करून देण्यासाठी घेतलेल्या लाच प्रकरणानंतर जिल्ह्यातील वेगवेगळ्या विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बदल्यांबाबत संशय व्यक्त केला जात आहे. त्यामुळे सहा महिन्यात किती जणांच्या बदल्या झाल्या याची चौकशी करण्याची मागणी करण्यात येत आहे.

## जि.प. अध्यक्षांनी राजीनामा द्यावा; माजी आ. बाळाराम पाटील यांची मागणी

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा परिषद अध्यक्षांच्या स्वीय सचिवाला महिला शिक्षिकेच्या बदलीसाठी दीड लाख रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडल्यानंतर जिल्हा परिषद प्रशासनात खळबळ उडाली आहे.

योगेश प्रकाश भस्मे यांच्यावर झालेल्या या कारवाईमुळे आता या बदलीच्या व्यवहारामागे नेमके कोण होते, भस्मे यांनी ही रक्कम कोणाच्या सांगण्यावरून मागितली होती का, तसेच या प्रकरणात आणखी कोणाची भूमिका आहे का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. महिला शिक्षिकेच्या बदलीसाठी मागितलेली दीड लाखांची रक्कम नेमकी कोणाच्या इशाऱ्यावर घेतली? हा प्रश्न आता रायगड जिल्हा परिषदेत चर्चेचा विषय ठरला आहे.

विशेष म्हणजे, वित्त विभागातील कर्मचारी असलेल्या भस्मे यांच्याकडे अध्यक्षांचे स्वीय सचिव म्हणून जबाबदारी होती. त्यामुळे शिक्षिका बदली प्रकरणात वित्त विभागातील कर्मचाऱ्याचा प्रवेश नेमका कसा झाला? हा प्रश्नही उपस्थित झाला आहे. लाच स्वीकारताना भस्मे रंगेहाथ पकडले गेले असले तरी या व्यवहाराची व्याप्ती केवळ एका व्यक्तीपुरतीच होती का? लाचेची मागणी करण्यामागे कोणाची भूमिका होती? व्यवहाराबाबत कोणाशी संपर्क झाला होता का? या सर्व बाबींची चौकशी झाल्यानंतरच चित्र स्पष्ट होणार आहे. कारवाईनंतर सर्वात महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होत आहे तो म्हणजे मागितलेली दीड लाखांची रक्कम नेमकी कोणासाठी पान २ वर



### नि:पक्षपातीपणे चौकशी करा : शेकाप

जि.प. अध्यक्षांच्या स्वीय सचिवाला लाच घेताना पकडले जाणे ही गंभीर बाब आहे. या घटनेची नैतिक जबाबदारी स्वीकारून जिल्हा परिषद अध्यक्षांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी शेकापचे माजी आमदार बाळाराम पाटील यांनी केली आहे. दरम्यान, या कारवाईनंतर दीड लाखांची लाच नेमकी कोणासाठी मागितली होती? बदलीच्या व्यवहारात आणखी कोणाचा सहभाग होता का? स्वीय सचिवाला संबंधित प्रकरणात हस्तक्षेप करण्याची भूमिका कोणी दिली? या प्रश्नांची उत्तरे तपासातून समोर येणार असल्याची आशा त्यांनी व्यक्त केली. शिक्षिका बदलीचा विषय हा प्रशासनाच्या संबंधित विभागाशी निगडित असताना अध्यक्षांच्या स्वीय सचिवाची त्यामध्ये नेमकी भूमिका काय होती, याची चौकशी करण्याची मागणीही बाळाराम पाटील यांनी केली. एसीबीच्या कारवाईनंतर आता केवळ लाच स्वीकारणाऱ्या व्यक्तीवर कारवाई होणार की या व्यवहारामागील संभाव्य साखळीचाही तपास होणार, याकडे लक्ष लागले आहे.

## पारसिक हिलवरून थेट रुळावर कोसळली कार



। खांदा । वार्ताहर ।

नवी मुंबईतील बेलापूर परिसरात पारसिक हिलवरून एक कार थेट रेल्वे रुळावर कोसळल्याची धक्कादायक घटना गुरुवारी घडली. या अपघातात कारमधील १७ वर्षीय तरुण गंभीर जखमी झाला असून, त्याला उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

बेलापूर रेल्वे स्थानकाजवळ असलेल्या पारसिक हिल परिसरात हा अपघात झाला. पारसिक हिल बोगद्याच्या पुढील बाजूस उंचावरून कार रेल्वे रुळावर कोसळली. कार पनवेल-उरण मार्गिकेवर पडल्याने काही काळ रेल्वे वाहतुकीवर त्याचा परिणाम झाला. घटनेची माहिती मिळताच रेल्वे पोलीस, पान २ वर

## पथविक्रेत्यांना 'स्वनिधी'चा आधार; अक्षया नाईकांचा पुढाकार

- अलिबाग नगरपरिषदेत लोककल्याण मेळावा
- ५५६ पथविक्रेत्यांना पीएम स्वनिधीचा मिळणार लाभ

। अलिबाग । प्रतिनिधी ।

शहराच्या आर्थिक आणि सामाजिक विकासात पथविक्रेत्यांचे योगदान अधोरेखित करत त्यांच्या व्यवसायाला अधिक स्थैर्य देण्यासाठी नगरपरिषद पुढाकार घेणार आहे. पथविक्रेत्यांना आर्थिक सहाय्य, शासकीय योजनांची माहिती आणि आवश्यक मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यासोबतच त्यांच्या व्यवसायवृद्धीसाठी नगरपरिषदेकडून सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही नगराध्यक्षा अक्षया नाईक यांनी दिली.



> पथविक्रेते शहराच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग आहेत. त्यांना आर्थिक आधार आणि शासकीय योजनांची योग्य माहिती मिळाल्यास त्यांच्या व्यवसायाला स्थैर्य मिळू शकते. त्यासाठी नगरपरिषदेकडून आवश्यक सहकार्य केले जाईल.
>
> – अक्षया नाईक, नगराध्यक्षा

सरकारी योजना केवळ कागदावर न राहता त्याचा प्रत्यक्ष लाभ पथविक्रेत्यांपर्यंत पोहोचावा, यासाठी अलिबाग नगरपरिषदेने पुढाकार घेतला आहे. नगराध्यक्षा अक्षया नाईक यांच्या पुढाकारातून प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेअंतर्गत लोककल्याण मेळावा व स्वनिधी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. नगरपरिषद सभागृहात झालेल्या या मेळाव्याला पथविक्रेत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

> पथविक्रेत्यांना केवळ कर्जाचा लाभ मिळवून देणे हा उद्देश नाही; त्यांना शासकीय योजनांशी जोडून व्यवसाय अधिक सक्षम करण्यासाठी नगरपरिषद सातत्याने प्रयत्नशील आहे. योजना थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवणे ही आमची प्राथमिकता आहे.
>
> –ॲड. मानसी म्हात्रे, उपनगराध्यक्षा

मार्च २०२० पासून जून २०२६पर्यंत अलिबाग नगरपरिषद हद्दीतील ५५६ पथविक्रेत्यांना पीएम स्वनिधी योजनेचा लाभ मिळवून देण्यात आला आहे. कोविड काळात व्यवसायावर परिणाम झालेल्या पथविक्रेत्यांना पान २ वर

रायगड जिल्हा प्रशासनाने घेतला पुढाकार | डिजीटल मंचचा घेतला आधार

# गणेशोत्सवाची परंपरा जगाच्या नकाशावर पोहोचणार

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

कोकणातील प्रसिध्द गणेशोत्सवाची परंपरा आता जगाच्या नकाशावर येणार आहे. धार्मिक, सांस्कृतिक परंपरा असलेल्या गणेशोत्सवाला राज्य महोत्सव म्हणून घोषित करण्यात आले आहे. या परंपरेला जगाच्या नकाशावर ओळख देण्यासाठी डिजीटल मंचचा आधार घेतला आहे. गणेशोत्सवाशी संबंधित आठवणी, पारंपरिक प्रथा, आरत्या, छायाचित्रे, नैवेद्य व पाककृती तसेच उत्सवाशी संबंधित सांस्कृतिक वैशिष्ट्यांची माहिती Bappa.org वर नोंदविता येणार आहे. त्यासाठी या पोर्टलवर नोंदविता येणार आहे. गणेशोत्सवाची परंपरा जगासमोर आणली जाणार आहे.

कोकणात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. दीड दिवसांपासून पाच,सहा तसेच अनंत चतुर्थीच्या दहा दिवसांपर्यंत गणेशमूर्ती घराघरात विराजमान होते. या कालावधीत बाप्पाच्या आवडीचे मोदक तयार करण्यापासून पूजेचे साहित्य, सजावटीवर अधिक भर दिला जातो.अबालवृध्दांपासून सर्वच मंडळी या उत्सवात सहभागी होतात.रायगड जिल्ह्यासह रत्नागिरी, सिंधुदुर्ग आदी जिल्ह्यातून सुरु झालेली गणेशोत्सवाची परंपरा आज महाराष्ट्राच्या अनेक भागात सुरु आहे. वेगवेगळ्या आकाराचे रंगाच्या गणेशमूर्ती आणून त्यांची प्रतिष्ठापना केली जाते. मनोभावे सेवा केली जाते. ग्रामीण भागासह शहरी भागात धार्मिक कार्यक्रमांसह सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रम तसेच समाजप्रबोधनाचे कार्यक्रम घेतले जातात. एक वेगळा उत्साह या निमित्ताने दिसून येतो. रायगडसह कोकणातून सुरु झालेल्या या परंपरेला राज्य महोत्सव म्हणून ओळखले जात आहे. अनेक कुटुंबे आणि गणेश मंडळे पिढ्यानपिढ्या पारंपरिक प्रथा जपत आहेत. आपल्या घरातील, गावातील आणि परिसरातील गणेशोत्सवाच्या वैशिष्ट्यपूर्ण परंपरा Bappa.org या पोर्टलद्वारे जगासमोर आणण्यासाठी जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेतला आहे. आपल्या बाप्पाशी जोडलेल्या पान २ वर



### जिल्हाधिकाऱ्यांकडून आवाहन

विविध परंपरा, श्रद्धा, संस्कृती आणि वैशिष्ट्यांना राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळवून देण्यासाठी 'Bappa.org' हा अधिकृत डिजीटल मंच उपलब्ध करून देण्यात आला आहे. या माध्यमातून गणेशोत्सवाशी संबंधित विविध परंपरांचे डिजिटल दस्तऐवजीकरण करून त्या पुढील पिढ्यांसाठी जतन करण्यात येणार आहेत. नागरिकांनीही या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवून बाप्पाशी संबंधित वैशिष्ट्यपूर्ण परंपरा आणि आठवणी जगासमोर आणाव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले आहे.

## नेहा भोसलेंकडून परिपत्रकाचा अवमान?

### तक्रारदारांच्या पत्राला उत्तर देण्यास केली टाळाटाळ; ॲड. राकेश पाटील यांची माहिती

। अलिबाग । प्रतिनिधी ।

चिंचोटी गावातील जल जीवन मिशन योजनेतील १,९८,५८,१०० रकमेच्या कथित गैरव्यवहाराबाबत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे ॲड. राकेश पाटील यांनी लेखी अर्ज सादर केला होता. केलेल्या तक्रार अर्जावर ९८ दिवस उलटूनही अद्याप कोणतीही कार्यवाही किंवा निर्णय न कळविल्याबाबत महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम १० अनुषंगाने तातडीने कार्यवाही करण्याबाबतची कारणे दाखवा नोटीस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांना देण्यात आली आहे, अशी माहिती ॲड. राकेश पाटील यांनी दिली.

चिंचोटी गावामध्ये जलजीवन योजनेंतर्गत राबविण्यात आलेल्या कामांमध्ये अंदाजे १,९८,५८,१०० इतक्या मोठ्या शासकीय निधीच्या कथित गैरव्यवहाराबाबत सविस्तर तक्रार अर्ज ॲड. राकेश पाटील पान २ वर

## पान १ वरुन

## अंदाज समिती रायगड दौऱ्यावर

दुरवस्थेबाबत ही समिती काय भूमिका घेणार याकडे आता रायगडकरांचे लक्ष लागून राहिले आहे. महाराष्ट्र विधानमंडळ अंदाज समितीचे २७ सदस्य रायगड जिल्ह्यात येणार आहेत. त्यामध्ये विधान परिषद व विधानसभेचे आमदार तसेच अधिकारी यांचा समावेश आहे. ही समिती २९ ते ३० सप्टेंबर आणि १ ऑक्टोबर या कालावधीत रायगड जिल्ह्यात वेगवेगळ्या विभागाची पाहणी करणार आहेत. या समितीमध्ये आमदारांसह अधिकारी असल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयापासून वेगवेगळ्या विभागाची धावाधाव सुरु झाली आहे. जिल्हास्तरावर वेगवेगळ्या बैठका घेऊन सर्व फाईल तयार करून ठेवण्याचे आदेश जिल्हा पातळीवर वेगवेगळ्या विभागाला देण्यात आले आहेत. क्रीडा विभागाकडून जिल्ह्यात नाविन्यपूर्ण योजनेतून अनुदान सर्वसाधारण अंतर्गत साहित्यांसाठी वितरीत केलेला निधी, विनियोग झाला किंवा नाही, याची पाहणी समितीद्वारे केली जाणार आहे.

क्रीडांगण विकास, व्यायामशाळा विकास, अनुदानातून तसेच जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत मंजूर झालेला निधी याबाबतही माहिती घेतली जाणार आहे. रायगड जिल्हा परिषदेसह महसूल विभाग व अशा अनेक विभागाच्या खर्चाचा व कामांचा आढावा घेतला जाणार आहे. ही समिती खर्चाचा आणि कामांचा आढावा घेऊन काय कार्यवाही करणार याकडे आता रायगडकारांचे लक्ष लागून राहिले आहे.

## मोहोपाड्यात वीज कोसळली

मोठा अनर्थ टळला. त्यांच्या घरातील फ्रीज जळाला असून काही पंखेही बंद पडले.

याच घटनेत वैभव खराडे यांचा एलईडी टीव्ही संच जळाला, तर अनिल खराडे यांच्या घरातील दोन सीलिंग फॅनचे नुकसान झाले. शोभा अनिल रेपाले दोन फॅन, मनोहर तांडेल यांचा व्हायफाय राऊटर तसेच आसपासच्या परिसरातील ग्रामस्थांच्या विद्युत उपकरणांचे नुकसान झाले.याशिवाय परिसरातील अन्य ११ ते १२ घरांमधील विविध विद्युत उपकरणांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे सांगण्यात आले.वीज कोसळण्याच्या घटनेनंतर काही काळ परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही.

दरम्यान, परिसरात विजांचा कडकडाट आणि मुसळधार पाऊस सुरू असतानाही वीजपुरवठा खंडित करण्यात आला नाही, असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे अचानक झालेल्या वीज प्रवाहातील बिघाडामुळे विद्युत उपकरणांचे नुकसान झाल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. झालेल्या नुकसानीची पाहणी करून संबंधित विभागाने पंचनामा करावा आणि नुकसानग्रस्तांना योग्य ती मदत मिळावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## टीना रबर कंपनीत भिंत कोसळली

आले, मात्र त्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच वाडा पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून पंचनामा आणि पुढील तपास सुरू आहे. या दुर्घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून मृत कामगारांच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.टीना रबर कंपनीत यापूर्वीही विविध अपघात आणि वादग्रस्त घटना घडल्याची चर्चा स्थानिकांमध्ये आहे. काही वर्षांपूर्वी कंपनीच्या परिसरात उघड्यावर साठवून ठेवलेल्या टायरला आग लागल्याने मोठ्या प्रमाणात धूर व प्रदूषण निर्माण झाले होते. त्या घटनेमुळे परिसरातील नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला होता. कंपनीमधून निघणाऱ्या उग्र वासामुळे परिसरातील ग्रामस्थ अनेक वर्षांपासून त्रस्त असल्याची तक्रार करत आहेत. प्रदूषण, दुर्गंधी आणि पर्यावरणीय परिणामांमुळे स्थानिक नागरिकांनी विविध स्तरांवर तक्रारी व आंदोलने करून कंपनी बंद करण्याची मागणीही वारंवार केली आहे. या दुर्घटनेनंतर कंपनीच्या सुरक्षितता उपाययोजना आणि प्रशासनाच्या देखरेखीबाबत पुन्हा प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. या दुर्घटनेबाबत पोलिसांचा तपास सुरू असून संबंधित यंत्रणांकडून पुढील कारवाई केली जात आहे.

## पारसिक हिलवरून थेट रुळावर कोसळली कार

नवी मुंबई पोलीस आणि अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. रुळावर पडलेली कार हटविण्याचे काम तातडीने सुरू करण्यात आले.

कार रुळावर आल्याने हार्बर मार्गावरील लोकल सेवा काही काळ विस्कळीत झाली. त्यामुळे प्रवाशांना काही प्रमाणात गैरसोयीचा सामना करावा लागला. दरम्यान, कार नेमकी कोणत्या कारणामुळे पारसिक हिलवरून खाली कोसळली, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. वाहनावरील नियंत्रण सुटले की अन्य कोणते कारण होते, याचीही चौकशी केली जात आहे.अपघातग्रस्त कारचे मोठे नुकसान झाले असून, जखमी तरुणाची प्रकृती गंभीर असल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे बेलापूर परिसरात काही काळ खळबळ उडाली होती.

## गणेशोत्सवाची परंपरा जगाच्या नकाशावर पोहोचणार

आठवणी, श्रद्धा आणि परंपरांचे डिजीटल दस्तऐवजीकरण करून हा सांस्कृतिक ठेवा पुढील पिढ्यांसाठी जतन करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून केल जाणार आहे. या महोत्सवासह परंपरा, संस्कृती, एकोप्याची माहिती जगाच्या नकाशावर आणण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून पुढाकार घेण्यात आला आहे. घरगुती किंवा सार्वजनिक गणेश मंडळातील आरतीचे ध्वनिचित्रमुद्रण, गणेशोत्सवाची छायाचित्रे, पारंपरिक नैवेद्य व पाककृती, तसेच गणेशोत्सवाशी संबंधित विशेष परंपरांची माहिती या माध्यमातून शेअर केली जाणार आहे. रायगड जिल्ह्यामध्ये साडेतीन हजारहून अधिक नोंदणी होणे अपेक्षीत आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी या उपक्रमात सहभागी होऊन घरच्यासह सार्वजनिक गणेशमूर्तींचे आकर्षक फोटो,सार्वजनिक उपक्रम याचे छायाचित्र या पोर्टलवर पाठविली जाणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

## जि.प. अध्यक्षक्षांनी राजीनामा द्यावा, माजी आ. बाळाराम पाटील यांची मागणी

होती? भस्मे यांनी स्वतःच्या फायद्यासाठी ही रक्कम मागितली होती की या व्यवहारामागे आणखी कोणी व्यक्ती होती, हे तपासातून स्पष्ट होणे अपेक्षित आहे.

या प्रकरणातील संबंधित शिक्षिकेच्या बदलीचा अर्ज कोणत्या स्तरावर प्रलंबित होता, त्यावर कोणत्या अधिकाऱ्यांची स्वाक्षरी किंवा शिफारस आवश्यक होती आणि या संपूर्ण प्रक्रियेत भस्मे यांचा प्रत्यक्ष संबंध कसा आला, याचाही तपास होणे महत्त्वाचे ठरणार आहे.

बदली प्रक्रियेचीही चौकशी करा? या प्रकरणामुळे जिल्हा परिषदेतील बदली प्रक्रियेच्या पारदर्शकतेचा मुद्दाही चर्चेत आला आहे. संबंधित बदलीचा अर्ज, त्यावरील नोंदी, पत्रव्यवहार, फाईलची हालचाल आणि संबंधित अधिकाऱ्यांशी झालेला पत्रव्यवहार यांची तपासणी झाल्यास या प्रकरणातील अनेक बाबी स्पष्ट होऊ शकतात. एसीबीला भस्मे यांच्याकडून मिळालेली माहिती, संबंधित कागदपत्रे आणि इतर उपलब्ध पुरावे तपासले जात असल्याने या प्रकरणाचा तपास पुढे कोणत्या दिशेने जातो, याकडे जिल्हा परिषद वर्तुळाचे लक्ष लागले आहे. कारवाईने अनेक प्रश्न ऐरणीवर या कारवाईने केवळ एका कर्मचाऱ्यावरील लाचप्रकरण समोर आले नसून, जिल्हा परिषदेत प्रशासकीय निर्णय प्रक्रिया नेमकी कशी चालते, लोकप्रतिनिधींच्या कार्यालयातील पदाधिकाऱ्यांची भूमिका किती असते आणि बदलीसारख्या संवेदनशील विषयांमध्ये अनधिकृत हस्तक्षेप होतो का, असे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. मात्र या प्रश्नांची उत्तरे तपास पूर्ण झाल्यानंतरच स्पष्ट होतील. दीड लाखांच्या लाचेचा हा व्यवहार केवळ भस्मेपुरता मर्यादित आहे की त्यामागे आणखी काही दुवे आहेत, याचा उलगडा आता एसीबीच्या तपासातून होणार आहे.

**निःपक्षपातीपणे तपास होणे अपेक्षित**

बदलीसाठीचा अर्ज नेमका कोणत्या टेबलावर होता? बदलीचा निर्णय घेण्याचा अधिकार कोणाकडे होता? या प्रक्रियेत भस्मे यांची भूमिका काय होती? तसेच संबंधित फाईल कोणकोणत्या अधिकाऱ्यांकडून पुढे सरकली, याचाही तपास होणे अपेक्षित आहे, असे मत शेकापचे माजी आ. बाळाराम पाटील यांनी व्यक्त केले.

## पथविक्रेत्यांना स्वनिधीचा आधार; अक्षया नाईकांचा पुढाकार

पुन्हा व्यवसाय उभा करण्यासाठी या योजनेतून आर्थिक आधार मिळाला. केंद्र शासनाने या योजनेची मुदत आता मार्च २०३० पर्यंत वाढवली आहे.

योजनेअंतर्गत कर्जाची विहित मुदतीत परतफेड करणाऱ्या लाभार्थ्यांना ७ टक्के व्याज अनुदान मिळते. तसेच मुदतपूर्व कर्जफेड केल्यास कोणताही दंड आकारला जात नाही. या सुविधांसह केंद्र शासनाच्या अन्य योजनांची माहितीही पथविक्रेत्यांना देण्यात आली. योजना आणि लाभार्थी यांच्यातील दुवा मजबूत करण्यावर या मेळाव्यात भर देण्यात आला. बँक व्यवस्थापकांनी विविध योजनांची माहिती दिली, तर नगरपरिषद प्रशासनाने अर्ज, कर्जप्रक्रिया आणि उपलब्ध योजनांबाबत मार्गदर्शन केले. त्यामुळे केवळ कर्ज मिळवून देण्यापुरता हा उपक्रम मर्यादित न राहता पथविक्रेत्यांना उपलब्ध असलेल्या विविध शासकीय सुविधांची माहिती एकाच ठिकाणी मिळाली. मुख्याधिकारी सागर साळुंखे यांनी पथविक्रेत्यांना पीएम स्वनिधीबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमास सुमारे १२० लाभार्थी उपस्थित होते. पथविक्रेत्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी योजना, प्रशासन आणि लाभार्थी यांच्यात थेट संवाद निर्माण करण्याचा अक्षया नाईक यांचा हा प्रयत्न ठरला.

कार्यक्रमाला महिला व बालकल्याण उपसभापती अश्विनी ठोसर, नगरसेविका संध्या पालवणकर, निवेदिता वाघमारे, नगरसेवक संदीप पालकर, अंकित बंगेरा, समीर ठाकूर, निलम हजारे तसेच अन्य नगरसेवक-नगरसेविका, वैद्यकीय अधिकारी डॉ. शिंदे, समुदाय संघटक स्नेहा रणदिवे आणि नगरपरिषद कर्मचारीही उपस्थित होते.

## नेहा भोसलेंकडून परिपत्रकाचा अवमान?

यांनी १९ जून २०२६ रोजी सादर केला आहे. तक्रारीमध्ये जल जीवन मिशन योजनेतील कामांची प्रत्यक्ष पाहणी, मंजूर अंदाजपत्रक, प्रशासकीय व तांत्रिक मान्यता, निविदा प्रक्रिया, कार्यादेश, मोजमाप पुस्तिका, बिलांची देयके, काम पूर्णत्व प्रमाणपत्रे, निधी वितरण तसेच संबंधित अधिकारी, पदाधिकारी, कंत्राटदार यांच्या भूमिकेची चौकशी करण्याची मागणी करण्यात आलेली आहे. मात्र, तक्रार अर्ज सादर करून तीन महिन्यांहून अधिक कालावधी उलटूनही तक्रारीवर कोणतीही चौकशी करण्यात आली नाही. कोणत्या अधिकाऱ्याकडे प्रकरण सोपविण्यात आले, काय निष्कर्ष निघाला अथवा कोणती कार्यवाही करण्यात आली, याबाबत कोणतेही लेखी पत्र, निर्णय, कार्यवाही अहवाल देण्यात आलेला नाही. ही बाब अत्यंत गंभीर आहे, असे ॲड. राकेश पाटील यांचे म्हणणे आहे. महाराष्ट्रातील जिल्हा परिषदेमधील उच्च पदस्थ अधिकारी तक्रार अर्जावर कारवाईच करत नसल्यामुळे उच्च न्यायालयात याचिका दाखल कराव्या लागतात, राज्य सरकारवर न्यायालयाच्या आदेशानुसार परिपत्रक काढण्याची नामुष्की आली आहे, मात्र रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे चिंचोटी गावातील जलजीवन मिशन योजनेत घोटाळा केल्याच्या बाबतीत पुराव्यांच्या कागदपत्रांसह तक्रार अर्ज दाखल करून ९८ दिवस उलटूनही त्यांनी आजपावेतो कोणतीही कारवाईच केली नाही. चिंचोटी ग्रामपंचायतीच्या सरपंच, ग्रामसेवक, ठेकेदारासह रा.जि.प. पाणीपुरवठा विभागाचे अभियंता यामध्ये दोषी आढळण्याची शक्यता असल्यामुळेच त्यांना वाचविण्यासाठी शासनाच्या परिपत्रकाचा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अवमान केला असल्याचा आरोप तक्रारदार ॲड.राकेश पाटील यांनी केला आहे.

## लिलाश्री सहजीवन वृद्धाश्रमास १२ हजारांची मदत



**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

चौल येथील श्री सद्गुरू ग्रामीण पतसंस्थेने सामाजिक बांधिलकी जपत चौलमधील लिलाश्री सहजीवन वृद्धाश्रमास १२ हजार रुपयांचा मदत निधी सुपूर्द केला. आर्थिक क्षेत्रात कार्यरत असताना सामाजिक उपक्रमांनाही प्राधान्य देणाऱ्या पतसंस्थेच्या या उपक्रमाचे विविध स्तरातून कौतुक होत आहे.

श्री सद्गुरू ग्रामीण पतसंस्था चेअरमन प्रविण राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत आहे. संस्थेने आपल्या व्यावसायिक कार्यासोबतच सभासद व जनतेचा विश्वास संपादन केला आहे.

चेअरमन प्रविण राऊत यांच्या संकल्पनेतून निर्मल गणेश साई कल्याण निधी या योजनेअंतर्गत गरजू व्यक्ती व सामाजिक संस्थांना मदत केली जाते. याच उपक्रमांतर्गत यावर्षी चौल येथे कार्यरत असलेल्या लिलाश्री सहजीवन वृद्धाश्रमासाठी १२ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. त्यानुसार श्री सद्गुरू पतसंस्थेचे सचिन असिफ किरकिरे, संचालक प्रथमेश राऊत व इतर पदाधिकाऱ्यांनी वृद्धाश्रमास प्रत्यक्ष भेट देऊन व्यवस्थापक प्रमोद हरिश्चंद्र हर्डिकर यांच्याकडे १२ हजार रुपयांचा धनादेश सुपूर्द केला. यावेळी वृद्धाश्रमाचे व्यवस्थापक प्रमोद हर्डिकर यांनी चेअरमन प्रविण राऊत तसेच पतसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे आभार मानले. सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून वृद्धाश्रमाला मिळालेली ही मदत उपयुक्त ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.



## दिवाळीपूर्वी कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान द्या

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिकेतील सर्व कामगार, कर्मचारी व अधिकारी तसेच शिक्षण मंडळ, एनयुएम आदी विभागांतील कर्मचाऱ्यांना सन २०२६ च्या दिवाळी सणापूर्वी ४० हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

या मागणीचे निवेदन मंगळवारी (दि. २२) पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांना देण्यात आले. यावेळी युनियनचे सरचिटणीस अनिल जाधव, कोषाध्यक्ष दत्तगुरू म्हात्रे, उपाध्यक्ष संजय जाधव यांच्यासह विनायक बारसे, मनोज कांबळे, रविंद्र गायकवाड, कैलास जाधव, अरुण कांबळे, भगवान राजपूत, प्रफुल्ल घरत, सन्नी बैद, वासिम पटेल, धोंडी बागडी व हर्ष बहिरा उपस्थित होते. निवेदन स्वीकारल्यानंतर महापौर नितीन पाटील यांनी कर्मचाऱ्यांच्या मागणीबाबत लवकरच सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन दिले.

## शटर उघडून मोबाईल फोनची चोरी

**पनवेल :** रेस्टॉरंटच्या शटरचे लॉक तोडून चोरट्याने आत प्रवेश केला आणि पासष्ट हजार रुपये किमतीचे दोन मोबाईल फोन चोरून नेले. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात २३ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. आयान हसीन अहमद मलिक हा पनवेल येथे राहत असून तो काम करत असलेल्या नियाज रेस्टॉरंटचे शटरचे लॉक तोडून चोरांनी आत प्रवेश केला. आणि रेस्टॉरंटच्या बिलिंग काउंटरवर असलेले दोन मोबाईल फोन करून नेले.

## ५५ हजारांची केली फसवणूक

**पनवेल** : डेबिट कार्डची अदलाबदल करून फसवणूक केल्याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तबसूम समीर पावणे हे डेबिट कार्ड घेऊन एटीएम मशीनमध्ये पैसे काढण्यासाठी गेले होते. यावेळी अनोळखी इसमाने त्यांना एटीएममधून पैसे आणि रिसीट काढताना व डेबिट कार्डचा पिनकोड पाहिला आणि हात चलाखीने त्यांच्याकडील डेबिट कार्डची अदलाबदल केली आणि फसवणूक केली.

### जाहीर हरकत नोटीस

सर्व लोकांस या जाहीर हरकतीच्या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, मौजे वेश्वी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकती त्या मिळकतीचे मालक कै. अनंत रामचंद्र कदम, रा. गोंधळपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून कायम खरेदी करण्याच्या उद्देशाने ते हयात असताना मा. उपविभागीय अधिकारी अलिबाग रायगड यांचेकडून क्र.उविअ/कात-२/कुळवहिवाट/एसआर अन्वये विक्री परवानगी घेतलेली होती व आहे. तसेच खरेदीकामी आर्थिक मोबदला देखील दिलेला होता व आहे. सदरचा मोबदला नंदकुमार अनंत कदम यांच्या समक्ष उपस्थितीत दिलेला आहे. आजमितीस मौजे वेश्वी येथील गट नं. २४/३ चे ७/१२ सदरी भोगवटादार या रकान्यात १) सुलोचना अनंत कदम २) अनिता अनंत खांडेकर ३) विनिता विलास शिंदे ४) स्नेहल जयकुमार दळवी ५) संगिता सुरेश खांबे ६) शितल हेमंत यादव ७) ज्योती निलेश म्हात्रे ८) नंदकुमार अनंत कदम या व्यक्तीची नावे नमुद आहेत. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| वेश्वी ता.अलिबाग जि.रायगड | २४/३ | ०-०८-९० पो.ख.०-०१-०० एकुण ०-०९-९० | २.१९ |

वरील नमुद ७/१२ मधील भोगवटादार रकान्यातील नमुद १ ते ८ यानी विकण्यास काढल्याचे आमच्या अशिलास समजले आहे. त्यामुळे अशी मिळकत त्रयस्त इसमाने विकत घेतल्यास सदर विकत घेणाऱ्या इसमाची व आमच्या अशिलांची फसवणूक होईल तसेच सदरचा होणारा व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

तरी या नोटीशीने कळविण्यात येते की, मौजे वेश्वी, ता. अलिबाग भूमापन क्रमांक २४/३, क्षेत्र ०-०९-९० हे.आर., आकार २.१९ रू. पै. सदरची मिळकत कोणीही विकत घेवू नये व तसा सदर मिळकतीबाबत कोणताही व्यवहार करू नये. याऊपर तसा व्यवहार केल्यास तो आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही व त्यावेळी होणाऱ्या सर्व परिणामांस सर्वस्वी व्यवहार करणारी व्यक्तीच जबाबदार राहील, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : /०९/२०२६

**(श्री.सचिन दि. पाटील)**
ॲडव्होकेट
अलिबाग कार्यालय : २१,
पारिजात सोसायटी चेंढरे,
अलिबाग, जि.रायगड,
मोबा.नं.९४२३३७५०६९,

## मोबाईलच्या दुकानातून १५ मोबाईलची चोरी

**पनवेल :** मोबाईल दुकानात घरफोडी करत चोरांनी दुकानातील वेगवेगळ्या कंपन्यांचे एक लाख ९३ हजार रुपये किमतीचे मोबाईल चोरून नेले. १५ सप्टेंबर ते १६ सप्टेंबर दरम्यानच्या रात्री ते सकाळी हितेश पुरी हे काम करत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौक, प्रभाकर राजे कॉम्प्लेक्स, पनवेल येथील महालक्ष्मी मोबाईल रिपेरिंग सेंटरमधील मुख्य शटर चोरट्यांनी उचकटला आणि आतमध्ये प्रवेश करून दुकानातील एक लाख ९३ हजार रुपये किमतीचे १५ मोबाईल फोन चोरून नेले. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस तपास करत आहेत.

### पनवेल महानगरपालिका
**पर्यावरण विभाग**

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्राची लोक जैवविविधता नोंदवहीचे अद्यावतीकरण करणेकरिता आर्थिक खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणेकरिता जाहीर सूचनेद्वारे नोंदणीकृत व अनुभवी संस्थांकडून बाजारभावाची दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदरची माहिती panvelcorporation.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

जा.क्र/पमपा/पर्या./२२२६/प्र.क्र.०१/१४६/२०२६

दिनांक :- २४/०९/२०२६

(सही/-)
**उपायुक्त (पर्यावरण)**
**पनवेल महानगरपालिका**

### जाहीर नोटीस

सदरील नोटीशीद्वारे सर्वांना सूचीत करण्यात येते की, माझ्या अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली जमीनमिळकत संदर्भित जमीनमिळकतीच्या विद्यमान मालक शरयु शरद घरत यांच्याकडून कायमस्वरूपी व कायदेशीरपणे विकत घेण्याचे ठरविलेले आहे व तशी प्राथमिक बोलणी माझे अशील व विद्यमान मालक यांचे दरम्यान पूर्ण झालेली आहेत. असे असूनदेखील संदर्भित जमीन मिळकतीमध्ये जर कोणत्याही व्यक्तीचे/व्यक्तींचे खरेदीखत करार, भाडेपट्टा, बक्षिस, गहाणखत इत्यादीद्वारे व इतर कसल्याही कराराद्वारे वा दस्ताद्वारे प्राप्त होणारे कायदेशीर हक्क/अधिकार वा हितसंबंध असतील तर अशा व्यक्तीने/ व्यक्तींनी त्या आशयाची लेखी हरकत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत माझ्या खालील नमूद पत्त्यावर पाठवून द्यावी. विहित मुदतीनंतर आलेली कसलीही हरकत/ हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व माझे अशिल संदर्भित जमीनमिळकतीचा व्यवहार अंतिमतः पूर्ण करतील याची कृपया नोंद घ्यावी.

**-: संदर्भित जमीनमिळकतीचे परिशिष्ट :-**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| धोकवडे, ता.अलिबाग, जि.रायगड. | ५०६ | ०-१७-०० | ०.३३ |

अलिबाग,
दिनांक : २५/०९/२०२६.

**राजेंद्र दा. पाटील,**
ॲडव्होकेट.
कृष्णवंदन - २, ब्राम्हणआळी,
कन्याशाळेसमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड,
मो. ९८२२५२८९३१,
ईमेल : adv.rdpatil@gmail.com

### जाहीर नोटीस

सदरील नोटीशीद्वारे सर्वांना सूचीत करण्यात येते की, माझ्या अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमीनमिळकतीपैकी १) शरयू शरद घरत, २) शर्मिला वसंत थळी, ३) अंजनी एकनाथ पाटील, ४) अरूणा अरविंद पाटील, ५) रेखा सचिन गायकवाड, ६) सुविधा विशाल कडवे, ७) रेश्मा रमेश गावंड, ८) समिधा विश्वास पाटील, ९) गौरव गजानन गावंड, १०) चैतन्य गजानन गावंड व ११) चैत्राली रूपेश पाटील यांच्या अविभक्त हिश्श्याची जमीनमिळकत कायमस्वरूपी व कायदेशीरपणे विकत घेण्याचे ठरविलेले आहे व तशी प्राथमिक बोलणी माझे अशील व विद्यमान मालक यांचे दरम्यान पूर्ण झालेली आहेत. संदर्भित जमीनमिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी बोजाविरहीत व निर्वेध तसेच कोणत्याही प्रकारे अबाधित असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे. असे असूनदेखील संदर्भित जमीनमिळकतीमध्ये जर कोणत्याही व्यक्तीचे/व्यक्तींचे खरेदीखत, करार, भाडेपट्टा, बक्षिस, गहाणखत इत्यादीद्वारे व इतर कसल्याही कराराद्वारे वा दस्ताद्वारे प्राप्त होणारे कायदेशीर हक्क/ अधिकार वा हितसंबंध असतील तर अशा व्यक्तीने/व्यक्तींनी त्या आशयाची लेखी हरकत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत माझ्या खालील नमूद पत्त्यावर पाठवून द्यावी. विहित मुदतीनंतर आलेली कसलीही हरकत/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व माझे अशिल संदर्भित जमीनमिळकतीचा व्यवहार अंतिमतः पूर्ण करतील याची कृपया नोंद घ्यावी.

**-: संदर्भित जमीनमिळकतीचे परिशिष्ट :-**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| धोकवडे. ता.अलिबाग, जि.रायगड. | ५०३ | ०-३३-०० पैकी ०-१६-५ | ०.५९ |

अलिबाग,
दिनांक : २५/०९/२०२६.

**राजेंद्र दा. पाटील,**
ॲडव्होकेट.
कृष्णवंदन - २, ब्राम्हणआळी,
कन्याशाळेसमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड,
मो. ९८२२५२८९३१,
ईमेल : adv.rdpatil@gmail.com


बैंक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda

**झोनल स्ट्रेस्ड् ॲसेट रिकव्हरी ब्रॅन्च : मेहेर चेंबर, तळमजला, डॉ. सुंदरलाल बेहल मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई -४०० ००१. दूरध्वनी : ०२२-४३६८३८०७, ४३६८३८०८ ई-मेल :** armbom@bankofbaroda.bank.in

स्थावर मालमत्तांच्या विक्रीकरिता विक्री सूचना - परिशिष्ट ४ - ए (नियम ८ (६) व ९ (१) च्या तरतुदी पाहा)

**सीक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचन सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ (६) व ९ (१) च्यातरतुदी यांअंतर्गत स्थावर संपत्तींच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना**

सर्वसामान्य जनता आणि विशेषतः कर्जदार, तारण देणारे व हमीदार यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, बँक ऑफ बडोदा (सुरक्षित धनको) यांचेकडे तारण ठेवलेल्या/भारित आणि बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्यांनी ज्यांचा ताबा घेतला आहे, अशा खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्तांची विक्री केली जाणार आहे. ही विक्री जशी आहे तशी, ज्या स्थितीत आहे तशी, जी काही आहे तशी आणि कोणत्याही दायित्वाशिवाय या तत्त्वांवर, सुरक्षित धनकोच्या खाली नमूद केलेल्या खात्यांमधील थकबाकी वसूल करण्यासाठी केली जाईल. कर्जदार, तारण देणारे, हमीदार, तारण मालमत्ता, थकबाकी, राखीव किंमत, ई-लिलावाची तारीख व वेळ, ईएमडी आणि बोली वाढीची रक्कम यांचा तपशील खाली नमूद केला आहे -

| कर्जदार/संचालक/हमीदार/कॉर्पोरेट हमीदार/ गहाणवटदार यांचे नाव व पत्ता | ज्ञात भारांसमवेत, काही असल्यास, स्थावर मालमत्तांचे विवरण | एकूण देणी | १. ई-लिलाव दिनांक, २. ई-लिलावाची वेळ | १. राखीव मूल्य, २. मालमत्तेच्या इरठेची रक्कम, ३. बोली विस्तार रक्कम | ताबा स्थिती (विधायक /प्रत्यक्ष ) | मालमत्ता परीक्षण दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| **मे. ईमार्क एनर्जायझर्स प्रायव्हेट लिमिटेड (कर्जदार)** **ए) गाळा क्र. १३ व ए/१४,** ईस्ट वेस्ट इंडस्ट्रीयल सेंटर, सफेद पूल, अंधेरी कुर्ला रोड, साकीनाका, अंधेरी (पूर्व) - ४०० ०७२. **बी) प्लॉट क्र. बी २७ व प्लॉट क्र. बी २८,** एमआयडीसी महाड , जिल्हा रायगड, महाराष्ट्र - ४०० २३१. **सी) ब्लॉक क्र. ५८८,** हथुरन कोसंबा रोड, फेअरडील टेक्सटाइल पार्कच्या समोर, मौजे महावेज, कोसंबा, तरसाडी, सुरत. **श्री. महेश कुमार शाह (संचालक/हमीदार)** फ्लॅट क्र. १६०३, आदित्य एलिगन्स, ७७ टीएच, कटारिया मार्ग, बाबा वाइन्सच्या वर, माटुंगा रोड, मुंबई - ४०० ०१६. **श्री. असगरअली फक्रुद्दीन फकरी (संचालक)** १३०४, निओ विक्रम सीएचएसएल, सहकार नगर, जेपी रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०० ०५३. **श्री. राजेश शाह (हमीदार)** **श्रीमती कल्पना महेश शाह (हमीदार)** **श्रीमती ज्योती राजेश शाह (हमीदार)** फ्लॅट क्र. १६०३, आदित्य एलिगन्स, ७७ टीएच, कटारिया मार्ग, बाबा वाइन्सच्या वर, माटुंगा रोड, मुंबई - ४०० ०१६. | **प्रॉपर्टी आयडी बीएआरबी२५८५०५८७** पुढील पत्यावरील फॅक्टरी जमीन व इमारतीचे भाडेपट्टा हक्क, प्लॉट क्र. बी - २७, क्षेत्र मोजमापित १८०० चौ. मी., फॅक्टरी इमारतीसमवेत व बी - २८, मोजमापित १८०० चौ. मी. , फॅक्टरी इमारतीसमवेत, अतिरिक्त औद्योगिक क्षेत्र महाड, एमआयडीसी, गाव बिरवाडी, तालुका महाड, जिल्हा व नोंदणीकरण जिल्हा रायगड, महाराष्ट्र - ४०२३०१ येथील. मे. ईमार्क एनर्जायझर्स प्रायव्हेट लिमिटेडच्या नावे. **बँकेस ज्ञात भार : शून्य.** | दि. ०१.०८.२०२४ रोजीनुसार एकूण थकबाकी रु. ११,८२,४२,४९९.९१ अधिक कायदेशीर प्रभार, अन्य प्रभार अधिक त्यावरील पुढील व्याज/मूल्य. | १. दि. ०५.११.२०२६ २. दु. २.०० ते सायं. ६.०० | १. रु. ४,७०,००,०००.०० २. रु. ४७,००,०००.०० ३. रु. १,००,०००.०० | **प्रतिकात्मक ताबा** मालमत्ता ही प्रतिकात्मक ताब्याअंतर्गत आहे व बँक विस्तृत अटी व शर्तीनुसार लिलाव खरेदीदारास मालमत्तेचा प्रतिकात्मक ताबा सुपूर्द करील. | दि. १५.१०.२०२६ रोजी स ११.०० ते दु १.०० या वेळेत |
| | **प्रॉपर्टी आयडी बीएआरबी२५८५०५८८** औद्योगिक युनिट/गाळा क्र. १३, मोजमापित २४.५९ चौ. मी. चटई क्षेत्रफळ, तळमजला, ए विंग, इमारतीचे नाव ईस्ट वेस्ट इंडस्ट्रीयल सेंटर व सोसायटीचे नाव ईस्ट वेस्ट इंडस्ट्रीयल सेंटर प्रीमायसेस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि., पत्ता सफेद पूल, कुर्ला अंधेरी मार्ग, साकीनाका, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०७२, जमिनीचा पत्ता सीटीएस क्र. ६७५, गाव मोहिली, तालुका कुर्ला. श्री. महेश शाह व श्री. राजेश शाह यांच्या नावे. **बँकेस ज्ञात भार : शून्य** | | १. दि. ०५.११.२०२६ २. दु. २.०० ते सायं. ६.०० | १. रु. ७४,००,०००.०० २. रु. ७,४०,०००.०० ३. रु. १,००,०००.०० | **प्रतिकात्मक ताबा** मालमत्ता ही प्रतिकात्मक ताब्याअंतर्गत आहे व बँक विस्तृत अटी व शर्तीनुसार लिलाव खरेदीदारास मालमत्तेचा प्रतिकात्मक ताबा सुपूर्द करील. | दि. १५.१०.२०२६ रोजी स ११.०० ते दु १.०० या वेळेत |
| | **प्रॉपर्टी आयडी बीएआरबी२५८५०५८९** औद्योगिक युनिट/गाळा क्र. ए/१४, मोजमापित ३०५ चौ. फूट चटई अर्थात ३४.०१ चै. मी. बिल्ट अप क्षेत्र, तळमजला, ए विंग, इमारतीचे नाव ईस्ट वेस्ट इंडस्ट्रीयल सेंटर व सोसायटीचे नाव ईस्ट वेस्ट इंडस्ट्रीयल सेंटर प्रीमायसेस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि., पत्ता सफेद पूल, कुर्ला अंधेरी मार्ग, साकीनाका, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०७२, जमिनीचा पत्ता सीटीएस क्र. ६७५, गाव मोहिली, तालुका कुर्ला. श्रीमती ज्योती राजेश शाह व श्रीमती कल्पना महेश शाह यांच्या नावे. **बँकेस ज्ञात भार : शून्य** | | १. दि. ३१.१०.२०२६ २. दु. २.०० ते सायं. ६.०० | १. रु. ८५,००,०००.०० २. रु. ८,५०,०००.०० ३. रु. १,००,०००.०० | **प्रतिकात्मक ताबा** मालमत्ता ही प्रतिकात्मक ताब्याअंतर्गत आहे व बँक विस्तृत अटी व शर्तीनुसार लिलाव खरेदीदारास मालमत्तेचा प्रतिकात्मक ताबा सुपूर्द करील. | दि. १५.१०.२०२६ रोजी स ११.०० ते दु १.०० या वेळेत |

मालमत्ता ही प्रतिकात्मक ताब्याअंतर्गत आहे व बँक विस्तृत अटी व शर्तीनुसार लिलाव खरेदीदारास मालमत्तेचा प्रतिकात्मक ताबा सुपूर्द करील.

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी, कृपया https://www.bankofbaroda.in/e-auction.htm या संकेतस्थळाला आणि https://baanknet.com या ऑनलाइन लिलाव पोर्टलला भेट द्या. तसेच, इच्छुक बोलीदार अधिकृत अधिकाऱ्यांशी ०२२-४३६८३८०३-१३ या दूरध्वनी क्रमांकावर किंवा ८६९८०४५०५६ या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधू शकतात.

**दिनांक : २४.०९.२०२६**
**ठिकाण : मुंबई**

सही/-
**प्राधिकृत अधिकारी**

# चिरनेर जंगल सत्याग्रहाच्या इतिहासाची उपेक्षा

**१९३० च्या कायदेभंग चळवळीत २५ सप्टेंबरच्या गोळीबार प्रकरणामुळे चिरनेर गावाचे नाव साऱ्या हिंदुस्तानात गाजत आहे. चिरनेर जंगल सत्याग्रहाचा हा लढा भारत देशाच्या इतिहासात सुवर्ण अक्षराने लिहून ठेवण्यासारखा इतिहास आहे. या स्वातंत्र्यलढ्यात चिरनेरच्या थोर पुरुषांचा आणि निरनिराळ्या ध्येयप्रणालींचा समावेश झालेला आहे.**





**दत्तात्रेय म्हात्रे**

महाराष्ट्रातील ब्रिटिश राजवटीला पहिली धडक दिली ती आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांनी. त्यानंतर महात्मा गांधींच्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीचा एक भाग म्हणून उरण तालुक्यातील चिरनेर येथे जंगल सत्याग्रह करण्यात आला. जंगल सत्याग्रह या नावातूनच सत्याग्रहाचा हेतू स्पष्ट होतो. हा सत्याग्रह अनेक कारणांमुळे वैशिष्ट्यपूर्ण मानावा लागेल. या सत्याग्रहाला सामान्य जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला होता. येथील खेड्यापाड्यातील सामान्य जनता ब्रिटिश सत्तेविरोधात इतक्या एकजुटीने उभी ठाकली की ब्रिटिश सरकारच्या अधिकाऱ्यांना दहशतकारी मार्गाचा अवलंब करण्याची वेळ आली. मात्र, सत्याग्रहींनी अहिंसात्मक असे धोरण स्विकारले आणि ब्रिटिश राजवटीचे सारे अत्याचार सहन केले. या १९३० च्या जंगल सत्याग्रहांमध्ये १३ भूमिपुत्रांनी हौतात्मे पत्करले. यामध्ये आठ शूर देशभक्तांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. तर, मामलेदारासह पाच सरकारी कर्मचाऱ्यांना यावेळी आपले प्राण गमवावे लागले. स्वातंत्र्य लढ्यातील प्रमुख घटनांमध्ये या आंदोलनाचा समावेश आहे.

स्वातंत्र्य लढ्यामध्ये रायगड व ठाणे जिल्ह्यातील भूमिपुत्रांचे योगदान महत्त्वाचे आहे. आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांच्यापासून घणसोली मधील स्वातंत्र्यसैनिकांपर्यंत मोठी ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. परंतु, या परिसरातील प्रकल्पग्रस्तांवरील अन्यायाप्रमाणे भूमिपुत्रांचा इतिहासही दुर्लक्षित राहिला आहे. यामध्ये चिरनेरच्या जंगल सत्याग्रहाचा समावेश आहे. इंग्रजांनी आदिवासी व शेतकऱ्यांचा जंगलावरील हक्क नाकारल्यानंतर देशभर आंदोलन सुरू झाले. चिरनेरच्या अक्कादेवी जंगल परिसरामध्ये रायगड जिल्ह्यातील शेतकरी व आदिवासी नागरिकांनी आंदोलन केले. यावेळी इंग्रजांनी आंदोलकांवर केलेल्या गोळीबारामध्ये तेरा भूमिपुत्र शहीद झाले. तेव्हापासून २५ सप्टेंबर हा दिवस जंगल सत्याग्रह स्मृतिदिन म्हणून साजरा केला जात आहे.

देशातील अनेक लढ्यांची दखल देशाच्या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासामध्ये घेण्यात आली आहे. परंतु, चिरनेर जंगल सत्याग्रहातील हुतात्म्यांची माहिती देशवासियांना व्हावी, यासाठी काहीच प्रयत्न होत नाहीत. चिरनेरमध्ये स्मृतीस्थळास राष्ट्रीय स्मारक घोषित करून त्याचा विकास करण्याकडेही शासनाने दुर्लक्ष केलेले आहे. प्रत्येक वर्षी २५ सप्टेंबरला शासकीय मानवांना देण्यात येते. परंतु, तेवढी औपचारिकता सोडली तर शासन पुन्हा वर्षभर फार गांभीर्याने याकडे लक्ष देत नाही. मात्र, चिरनेर ग्रामस्थांनी हा ऐतिहासिक वारसा प्राणपणाने जपला आहे. परंतु, शासकीय उदासीनतेमुळे या आंदोलनाविषयीची माहिती राज्यातील व देशातील प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचू शकलेली नाही.

जंगल सत्याग्रह व येथील स्वातंत्र्य सेनानींचा पराक्रम आजही देशवासीयांसाठी प्रेरणादायी आहे. निशस्त्र आंदोलकांनी दिलेल्या लढ्यामुळे इंग्रज सरकारही हादरले होते. परंतु, सद्यस्थितीमध्ये चिरनेरमधील स्मारकांची अवस्था फार चांगली नाही. या ठिकाणी सर्व हुतात्म्यांचे भव्य स्मारक असले पाहिजे. सद्यस्थितीमध्ये ग्रामस्थांनी हुतात्म्यांची शिल्प तयार करून घेतली आहेत. प्रत्येक हुतात्म्याचे योगदान एका वाक्यात लिहून ठेवले आहे. परंतु, त्यामुळे आंदोलनाची तीव्रता लक्षात येत नाही.

चिरनेर गावामध्ये पुरातन गणपती मंदिरामध्ये इंग्रजांनी आंदोलकांवर बेछूट गोळीबार केला होता. यात येथील गणपती मंदिराच्या लोखंडी गजावर अद्याप बंदुकीच्या गोळीची खूण दिसत आहे. गणेश मंदिर व स्मारक परिसरामध्ये पुरातन तलाव आहे. या तलावाचे सुशोभीकरण करून घेतले पाहिजे व मंदिरासह स्मृतिस्थळाचा आराखडा तयार करून भव्य स्मारक उभारण्याची गरज आहे. याशिवाय या लढ्याची माहिती पाठ्यपुस्तकामध्ये दिल्यास, विद्यार्थ्यांमध्ये देश प्रेमाची भावना निर्माण करण्यास मदत होईल, अशी अपेक्षाही इतिहास प्रेमी व्यक्त करत आहेत. परंतु, शासन याकडे गांभीर्याने लक्ष देत नसल्यामुळे हे स्मारकही दुर्लक्षित राहिले असून, अजून किती दिवस ऐतिहासिक ठिकाणांची उपेक्षा होणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

भारतीय स्वातंत्र्य संग्रामात जे-जे उठाव झाले. त्यात चिरनेरच्या जंगल सत्याग्रहाचा आवर्जून समावेश करावा लागेल. ब्रिटिशांच्या विरोधात ज्या वीरांनी आपले हौतात्मे दिले, त्यात चिरनेरच्या जंगल सत्याग्रहातील सर्वच हुतात्म्यांचा सहभाग होता. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणाचे बलिदान देणाऱ्या या वीरांना ही मातृभूमी कधीच विसरणार नाही. त्यामुळे येथील हुतात्म्यांच्या नावाने उभारण्यात आलेली स्मारके आजही प्रेरणादायी आहेत.

**ग्रामस्थांनी जपल्या लढ्याच्या स्मृती**

चिरनेरच्या जंगल सत्याग्रहाची योग्य दखल अद्याप शासनाने घेतलेली नाही. परंतु, चिरनेर ग्रामस्थांनी मात्र जंगल सत्याग्रहाच्या आठवणी जपल्या आहेत. येथे येणाऱ्या प्रत्येकाला नागरिक सत्याग्रहाची माहिती आणि इंग्रजांनी केलेल्या गोळीबारा याविषयी माहिती देतात. ज्या गावातील भूमिपुत्रांनी रक्त सांडले त्या प्रत्येक गावात हुतात्मा स्मारक तयार केले आहे. जंगल सत्याग्रहामध्ये अटक करण्यात आलेल्या कैद्यांची नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी ठाणे जेलमध्ये जाऊन भेट घेतली होती. जुलै १९३१ मध्ये या खटल्याचा निकाल लागला. तेव्हा स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर तेथे उपस्थित होते. इंग्रजांनी पाडलेल्या स्तंभाचा कळस नागरिकांनी वाजत गाजत चिरनेर गावात आणला होता. तसेच, भव्य राष्ट्रीय स्मारकासह आंदोलनाचा इतिहास पाठ्यपुस्तकात यावा. चिरनेर पर्यटन स्थळ म्हणून घोषित करण्यात यावे. जंगल सत्याग्रहातील हुतात्म्यांची नावे नवी मुंबई व रायगड मधील मोठ्या प्रकल्पांना द्यावीत, अशी येथील जनतेसह इतिहास प्रेमींनी मागणी केली आहे.

## निवडक

### उरण तालुक्यात मलेरियाचे थैमान

**चिरनेर :** उरण तालुक्यात दूषित हवा, वाढती अस्वच्छता, बदलते वातावरण, डासांचा वाढता प्रादुर्भाव व आरोग्य विभागाचा जनजागृतीचा अभाव यामुळे मलेरिया, डेंगूच्या रुग्णांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ दिसून येत आहे. दरम्यान, तालुक्यातील विविध रुग्णालयात उपचार घेणारे काही रुग्ण दगावल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. असे असताना रायगड जिल्हा प्रशासन आणि उरण तालुका आरोग्य विभाग अजून अनभिज्ञ असल्याचे दिसून येत आहे. प्रशासनाच्या अनास्थांमुळे ही परिस्थिती अशीच राहिली तर तालुक्यात प्रत्येक घराघरात डेंगू मलेरियाचे रुग्ण आढळून येतील, अशी भीती नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे. उरण तालुक्यातील अनेक गावागावांत स्वच्छतेचा बोजवारा उडाला असून, काही गावांना तर बकाल स्वरूप प्राप्त झाले आहे. त्याचबरोबर पावसानेही विश्रांती घेतल्यामुळे कडक उन्हाचा देखील आरोग्यावर परिणाम होत आहे. परिणामी साचलेले पाण्याचे डपके आणि टाकाऊ साहित्यांमध्ये साचलेले पाणी यामुळे डासांची उत्पत्ती मोठ्या प्रमाणावर होत आहे. परिसरात वाढलेली गोदामे, टायरची दुकाने ही तर डासांची मुख्य उत्पत्तीस्थाने आहेत. दरम्यान, तालुक्यातील खासगी व सरकारी रुग्णालयांत रुग्णांची मोठ्या प्रमाणावर गर्दी दिसून येत आहे. तपासणीत अनेक रुग्णांचे रिपोट पॉझिटिव्ह येत असल्यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांमध्ये भीतीचे वातावरण दिसून येत आहे. तालुक्यात डेंगू मलेरियाच्या आजाराचा वेग वाढत असून, संबंधित आरोग्य विभागाने याकडे लक्ष घालून, तातडीने प्रभावी उपाययोजना करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.



(छायाचित्रः संजय गायकवाड)

### संकटाच्या काळात मदतीचा हात

**कर्जत :** ढगफुटीसदृश मुसळधार पावसामुळे दहिवली येथील संजयनगर वाडी परिसरातील अनेक कुटुंबांच्या घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अचानक आलेल्या या नैसर्गिक संकटामुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले असून, अनेक कुटुंबांसमोर मोठे आर्थिक आणि कौटुंबिक संकट उभे राहिले आहे. या कठीण प्रसंगी नुकसानग्रस्त नागरिकांच्या दुःखात सहभागी होत, त्यांच्या प्रत्यक्ष गरजा जाणून घेण्यासाठी नगरसेवक अ‍ॅड. संकेत भासे यांनी परिसराला भेट दिली. नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी समजून घेतल्यानंतर त्यांच्या हस्ते आवश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. संकटाच्या काळात केवळ मदत देणे नव्हे, तर नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे हीच खरी सामाजिक बांधिलकी आहे. या मदतीमुळे नुकसानग्रस्त कुटुंबांना काहीसा दिलासा मिळाला असून, आपत्तीच्या काळात माणुसकी आणि सामाजिक एकजुटीचे दर्शन घडले आहे. यावेळी नगरसेविका जान्हवी देवघरे, नगरसेवक वैभव सुरावकर, युवासेना शहर अधिकारी सचिन भोईर, उपशहरप्रमुख दिनेश कडू, शिवसेना शहर संपर्कप्रमुख सुदेश देवघरे, गणेश लाड, अजय दिघे, संजय दिघे, संकेत जाधव, स्वप्निल जाधव तसेच स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# पर्यायी मार्गांवर वाहनचालकांची गैरसोय

## ● रात्रीच्या वेळी सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर




**| माणगाव | प्रतिनिधी |**

गणेशोत्सवाची भक्तिमय सांगता झाल्यानंतर आता कोकणातून मुंबईच्या दिशेने परतीचा प्रवास सुरू झाला आहे. हजारो गणेशभक्त कुटुंबासह मुंबई, ठाणे, नवी मुंबई आणि पुण्याच्या दिशेने मार्गस्थ होत असताना माणगाव परिसरातील वाहतूक व्यवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. वाहतुक कोंडी झाली की, वाहने पर्यायी मार्गाने वळवली जातात. परंतु, या पर्यायी मार्गावर दिशदर्शक फलकांचा अभाव असल्याने वाहकांची मोठी गैरसोय होत आहे. विशेषतः वाहनचालकांना रात्रीच्या वेळी मोठी डोकेदुखी ठरत असून, त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

गणेशोत्सवाच्या काळात मुंबई-गोवा महामार्गावर निर्माण झालेल्या वाहतूक कोंडीच्या आठवणी ताज्या असतानाच, आगामी काळात परतीच्या वाढत्या वाहतुकीमुळे माणगावमध्ये पुन्हा कोंडी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच, वाहतूक कोंडी झाली की, वाहने पर्यायी मार्गाने वळविणे हा प्रशासनाचा तात्पुरता उपाय ठरतो. मात्र, ज्या पर्यायी मार्गावर वाहनचालकांना सुरक्षितपणे आणि योग्य दिशेने पोहोचविण्याची जबाबदारी असते, त्याच मार्गावर पुरेसे दिशादर्शक फलक नसल्याने वाहनचालकांची मोठी गैरसोय होत आहे. विशेषतः माणगाव परिसराची माहिती नसलेल्या बाहेरील जिल्ह्यांतील वाहनचालकांना नेमका कोणता रस्ता मुंबई-पुण्याकडे आणि कोणता पुन्हा मुंबई-गोवा महामार्गाला जोडतो, हे समजणे अनेकदा कठीण जाते. तसेच, महाडकडून मुंबईच्या दिशेने येताना पूर्वेकडील नवीन आनंद भुवनजवळून बायपासची एक लेन निजामपूर रस्त्यापर्यंत येते. याठिकाणी आल्यावर वाहनचालकांसमोर पुढील प्रवासासाठी विविध पर्याय उपलब्ध होतात. निजामपूरमार्गे पुण्याकडे जाता येते. तसेच, विळे एमआयडीसीमार्गे पाली, खोपोली आणि पुढे पुणे-मुंबई महामार्गाकडे जाता येते. दुसरा मार्ग निजामपूर रस्त्याने माणगावच्या दिशेने येऊन पुन्हा मुंबई-गोवा महामार्गाला जोडतो. मात्र, या महत्त्वाच्या मार्गांवर मोठ्या आकाराचे, स्पष्ट आणि रात्रीच्या वेळी सहज दिसणारे दिशादर्शक फलक पुरेशा प्रमाणात नसल्याने वाहनचालकांचा गोंधळ वाढतो. वाहतूक कोंडीच्या वेळी अचानक वाहतूक पर्यायी मार्गावर वळविल्यानंतर हा गोंधळ आणखी तीव्र होतो.

गणेशोत्सवादरम्यान अनेक कुटुंबे रात्रीच्या वेळी मुंबईकडे परतीचा प्रवास करतात. पर्यायी मार्गावरील काही भाग तुलनेने निर्मनुष्य असल्याने, त्यातच रस्त्याच्या दिशांची स्पष्ट माहिती नसल्यास वाहनचालकांना मानसिक तणावाचा सामना करावा लागतो. चुकीच्या मार्गावर वाहन गेल्यास पुन्हा योग्य रस्ता शोधण्यासाठी वेळ, इंधन आणि कुटुंबीयांची सुरक्षितता यांचा प्रश्न निर्माण होतो. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांसह प्रवास करणाऱ्या कुटुंबांसाठी अशा परिस्थितीत स्पष्ट दिशादर्शन आणि सुरक्षित वाहतूक व्यवस्था अत्यंत आवश्यक आहे. गणेश विसर्जनानंतर कोकणातून मुंबईच्या दिशेने परतणाऱ्या वाहनांची संख्या वाढत असल्याने पुढील काही दिवस माणगाव परिसरासाठी वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडी झाल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा प्रशासनाने आतापासूनच संभाव्य कोंडीच्या ठिकाणांची पाहणी करून पर्यायी मार्गांची तयारी करणे गरजेचे आहे.

### मोठ्या दिशादर्शक फलकांची गरज

निजामपूर रोड, विळे एमआयडीसी, पाली व माणगावकडे येणारे जोडरस्ते तसेच महामार्गाला मिळणाऱ्या महत्त्वाच्या ठिकाणी मोठे दिशादर्शक फलक, रिफ्लेक्टरयुक्त सूचना फलक आणि आवश्यक त्या ठिकाणी प्रकाशव्यवस्था उभारणे आवश्यक आहे. तसेच, कोंडीच्या काळात वाहनचालकांना प्रत्यक्ष मार्गदर्शन करण्यासाठी महत्त्वाच्या चौकांवर पोलीस कर्मचारी तैनात करणेही गरजेचे आहे.

### बायपासचे काम रखडल्यामुळे कोंडी

माणगाव बायपासचे काम रखडल्यामुळे मुंबई-गोवा महामार्गावरील वाहतुकीला अपेक्षित पर्यायी मार्ग पूर्ण क्षमतेने उपलब्ध झालेला नाही. परिणामी, कोंडी निर्माण झाल्यानंतर उपलब्ध रस्त्यांवर वाहतूक वळविण्याची वेळ प्रशासनावर येते. मात्र, वारंवार उद्‌भवणाऱ्या वाहतूक कोंडीवर केवळ पर्यायी मार्ग हा कायमस्वरूपी उपाय ठरू शकत नाही. माणगाव बायपासचे रखडलेले काम गतीने पूर्ण झाल्यास भविष्यातील वाहतूक व्यवस्थेवरील मोठा ताण कमी होण्यास मदत होईल.



● आकाश पाटील, मेटपाडा-कोळीवाडा, अलिबाग यांच्या घरी विराजमान झालेले गणराय.



● ज्ञानेश्वर जगन्नाथ सारंग, अलिबाग-कोळीवाडा यांच्या घरातील गणपती बाप्पा.



● कु. मितांश अमित वेळे, मु. ढोलपाडा - खंडाळा यांच्या घरी विराजमान झालेले गणपती बाप्पा.



● कु. आराध्य पाटील, रा. बेलकडे यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाची सुंदर सुबक मुर्ती.



● मोहन मणिराम कावजी, खंडाळे यांच्या घरातील गणेशाची सुबक मूर्ती.



● राऊळ वाडीचा राजा, रायवाडी-आक्षी यांच्या घरी विराजमान झालेले गणराय.



● महाजने गावातील पारंगे परिवाराच्या घरी विराजमान झालेले गणपती बाप्पा.

# या ज्ञानेशांना घालवा

देशातील निवडणुकांमध्ये भानगडी चालू असल्याचा संशय गेली किमान पाच वर्षे घेतला जातो आहे. आता त्या संदर्भात नवीन पुरावा समोर आला आहे. इंडियन एक्स्प्रेसच्या वार्ताहरांनी याबाबत केलेली पोलखोल धक्कादायक आहे. मतदारयादीमधून नावे हटवणे आणि नवीन नावे घालणे हे काम एखाद्या सॉफ्टवेअरमार्फत मोदी सरकार किंवा भाजपवाले मुद्दाम करत आहेत असा विरोधकांचा वहीम होता. तो बळकट करणारा पुरावा या बातम्यांमधून देण्यात आला आहे. विशेष म्हणजे या संदर्भात निवडणूक आयोगामध्येच आतून विरोध होत होता असे दिसते. निवडणूक आयोगावर तीन आयुक्त असतात. तीनही आयुक्तांचा दर्जा समान असतो. पण त्यातील एकाला प्रमुख मानले जाते व मुख्य निवडणूक आयुक्त म्हटले जाते. सध्या ज्ञानेशकुमार हे असे मुख्य आयुक्त आहेत. आयोगामध्ये कोणताही निर्णय घेताना तीनही आयुक्तांच्या सहमतीने किंवा मतभेद असल्यास बहुमताने तो व्हावा असे स्पष्टपणे कायद्यात नमूद आहे. मात्र ज्ञानेशकुमार नावाच्या आयुक्ताने हुकुमशाही करून हा कायदा धाब्यावर बसवला होता काय असा सवाल निर्माण झाला आहे. आयोगाने यंदाच्या जानेवारीमध्ये इसीआय नेट नावाचे नवीन एप जारी केले. त्याचा जंगी कार्यक्रम झाला. देशभरातील सर्व मतदारांचा डेटा या एपवर एकत्रित केला गेला. मात्र हे करताना दिल्लीतून मतदारांची नावे वगळली वा समाविष्ट केली जात आहेत असे लक्षात आले. कहर म्हणजे स्थानिक पातळीवरील निवडणूक अधिकाऱ्यांना यात काही अधिकार नव्हते. ही सर्व सूत्रे दिल्लीतून वा केंद्रीय स्तरावर हलवली जात होती. दोन आयुक्त सुखबीरसिंग संधू आणि विवेक जोशी यांनी याला आक्षेप घेतला. तशी पत्रे ज्ञानेशकुमार आणि नंतर प्रशासनातील सर्वोच्च अधिकारी केंद्रीय कॅबिनेट सचिवांना लिहिली. पण त्यांच्या तक्रारींना केराची टोपली दाखवली गेली. गोव्यामध्ये ज्यांची नावे वगळली आहेत अशा ९७ मतदारांनी आवश्यक ते नवे पुरावे दिले. त्यानंतर तेथील स्थानिक अधिकाऱ्याने या मतदारांची नावे पुन्हा यादीत समाविष्ट करण्याचे मान्य केले. कायद्यानुसार त्याच अधिकाऱ्याकडे या इसीआय नेटमधील डेटामध्ये बदल करून ही नावे जोडण्याचे अधिकार आहेत. पण प्रत्यक्षात वारंवार प्रयत्न करूनही या जिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्याला या सॉफ्टवेअरमध्ये एक्सेस मिळाला नाही. त्याबाबत त्याने दिल्लीतील वरिष्ठांकडे तक्रार करूनही उपयोग झाला नाही. कारण याची सूत्रे कोणीतरी तिसरीच व्यक्ती हलवत होती. हा अत्यंत गंभीर, बेकायदा प्रकार आहे.

## तद्दन बेकायदेशीर

हा प्रकार एका उदाहरणाने समजून घेण्यासारखा आहे. समजा, तुमच्या बँकेतल्या खात्यातले एक लाख रुपये काढून घेतल्याचे पासबुकात दिसले. वास्तविक तुम्ही असा कोणताही व्यवहार केलेला नाही. हे बँकेच्या निदर्शनास आणल्यावर व स्थानिक बँक व्यवस्थापकाने तुमचे म्हणणे मान्य केल्यानंतर पासबुकात बदल करण्याचा अधिकार त्याचाच असायला हवा. अशा चुकीच्या एन्ट्री नेहमीच सुधारून दिल्या जात असतात. पण समजा असे करण्याचा बँक व्यवस्थापकाचा अधिकार काढून घेतला गेला आणि त्याने तक्रार केल्यावरही ते एक लाख रुपये परत खातेदाराच्या खात्यात दाखवले जाऊ शकत नसतील तर तो निव्वळ सॉफ्टवेअरचा घोळ नसतो. सॉफ्टवेअर चालवणारे हात व डोके ज्याचे आहे तो ही भानगड करीत असतो. काल प्रसिध्द झालेली बातमी खरी असेल तर निवडणूक आयोगात अशीच भानगड चालू होती व तिला दोन आयुक्तांनी एकत्रित व स्वतंत्रपणे विरोध केल्यानंतरही त्याचा उपयोग होत नव्हता. ज्ञानेशकुमार यांनी आपला हेका कायम ठेवला होता. आजतागायत हा बदल झालेला नाही. या दोन आयुक्तांनी चौदा वेळा अशी पत्रे लिहिल्याचे वा विरोध अधिकृतपणे कागदावर आणल्याचे बातमीत म्हटले आहे. निवडणूक आयोगाच्या कायद्यानुसार हे दोन विरुध्द एक असे बहुमत होते. पण मुख्य निवडणूक आयुक्त या पदाचा फायदा घेऊन ज्ञानेशकुमार आपले निर्णय बेकायदेशीरपणे पुढे रेटत होते. फॉर्म सहाबाबतच्या निर्णय हा तर कळस आहे. नव्याने नाव नोंदणी करणाऱ्या मतदारांना हा फॉर्म भरून द्यायचा असतो. सध्यादेखील ही नोंदणी चालू आहे. मात्र या मतदारांना आपल्या आईवडिलांच्या मतदारयादीतल्या नोंदींचा तपशील मागितला जात आहे. हे तद्दन बेकायदेशीर आहे.

## लोकशाहीवरचा विश्वास उडेल

फॉर्म सहा भरून देण्यासाठी आजवर अशी कोणतीही माहिती मागितली जात नव्हती. केवळ मतदाराची ओळख, वय तसेच पत्ता इत्यादींचा पुरावा पुरेसा असे. मात्र आता त्यात आईबापांची वये किंवा मतदारयादीतील नंबर वगैरे विचारला जात आहे. असा बदल केला गेला आहे हे संधू व जोशी या दोन आयुक्तांनाही ठाऊक नव्हते. त्यांना ते वृत्तपत्रांतील बातम्यांवरून कळले. त्यावेळी त्यांनी खातरजमा केली व असा बदल करणे बेकायदेशीर व अनधिकृत आहे असे स्पष्टपणे ज्ञानेशकुमारांना कळवले. नंतर केंद्रीय सचिवांकडेही तक्रार केली. इतका मोठा बदल करताना दोन आयुक्तांना तो ठाऊक नसावा व तो बदल बेकायदेशीर आहे असे त्यांनी लिखित स्वरुपात म्हणावे हा अत्यंत भयंकर प्रकार आहे. या एका मुद्द्यावरून ज्ञानेशकुमार यांची तत्काळ हकालपट्टी करायला हवी. शिवाय त्यांनी या भानगडी कोणाच्या सांगण्यावरून आणि कोणत्या कारणासाठी केल्या याची चौकशी करायला हवी. अर्थात, या सगळ्याच्या मागे कोण आहे याचा सर्वांना अंदाज आहे. मोदी राजवटीच्या कारस्थानांची आता जनतेला पुरेपूर कल्पना आहे व त्यामुळे त्यांच्या नेत्यांनीच भाजपच्या फायद्यासाठी हे सगळे बदल घुसडले असावेत असे मानायला जागा आहे. मुलगा वा मुलगी १८ वर्षांचे झाले की आजवर सहजपणे त्यांची नावे मतदार म्हणून नोंदली जात असत. याच मतदारांच्या जोरावर भाजपने अनेक निवडणुका जिंकल्या. मोदींनाही यांचाच फायदा झाला. पण आता याच मतदारांची भीती वाटू लागली आहे असा याचा अर्थ आहे. त्यामुळे १८ वर्षांचे असले तरी त्यांचे आईबाप कोण आहेत, भाजपला अनुकूल की प्रतिकूल याचा बहुदा शोध घेतला जात असावा असे मानण्यास जागा आहे. किंवा या मतदारांच्या नोंदणीत अडथळे निर्माण करून केवळ भाजपच्या भक्तांपैकी असलेल्यांची नावेच समाविष्ट होतील याची काळजी घेण्याचा यात काही डाव असावा. संशय बरेच आहेत. पण दोन आयुक्तांनी ही गोष्ट बेकायदा आहे असे म्हटले होते व त्यांच्या नकळत ती अमलात आणली गेली हे बातमीनुसारचे वास्तव आहे. गेल्या वर्षी राहुल गांधी यांनी मतदार म्हणून नावे वगळली जाण्याबाबत दोन पत्रकार परिषदा घेतल्या. तेव्हा ज्ञानेशकुमार यांनी मोठ्या तोऱ्यात त्यांना माफी मागण्यास फर्मावले होते. आता ही बातमी प्रसिध्द झाल्यावर त्यांनी पत्रकार परिषद घेण्याचे धाडस दाखवायला हवे. भाजपच्या राजवटीत ज्ञानेशकुमार चौकशी होण्याची किंवा त्यांचा राजीनामा होण्याची शक्यता खूपच कमी आहे. याच ज्ञानेशकुमार यांनी सध्या जी मतदार पुनरीक्षणाची मोहिम रेटली आहे तिला खुद्द सर्वोच्च न्यायालयानेही क्लिन चीट दिली होती. आता या बातमीनंतर तरी न्यायालयाला आपल्या मतात बदल करावासा वाटतो का हे पाहणे उद्बोधक असेल. दरम्यान, सध्या चालू असलेली मतदार तपासणीची मोहिम स्थगित केली जायला हवी. अन्यथा, लोकांचा लोकशाही आणि निवडणुकांवरचा विश्वास उडून जाईल. ते फार धोकादायक ठरेल.

विचार

# पंजाबच्या राजकारणात पुन्हा रंगत

***पंजाबच्या राजकारणात पुन्हा एकदा हालचाली वाढल्या आहेत. काँग्रेसमधील अंतर्गत गटबाजी, 'आम आदमी पक्षा'च्या खासदारांचा भाजप प्रवेश, भाजप आणि अकाली दलाची संभाव्य युती आणि ताजी राजकीय जुळवाजुळव यामुळे पंजाबचे राजकारण ढवळून निघत आहे. मात्र शेतकरी, बेरोजगार, व्यापारी, मध्यमवर्गीय आणि महागाईने त्रस्त नागरिकांना राजकीय पक्षांच्या या हालचालींपेक्षा रोजच्या प्रश्नांची चिंता अधिक जाणवत आहे.***

**राही भिडे**

पंजाब विधानसभेत 'आम आदमी पक्षा'कडे अद्याप स्पष्ट बहुमत आहे. त्यामुळे काही खासदारांनी पक्ष सोडून भाजपची वाट धरल्याने राज्यातील सरकार तातडीने संकटात येईल, असे चित्र नाही; पण खासदारांचे पक्षांतर हा राजकीय वातावरणातील बदलाचा संकेत नक्कीच आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीतील मतदारांचे वर्तन वेगळे असू शकते, हे पंजाबने यापूर्वी अनेकदा दाखवून दिले आहे. त्यामुळे सध्याच्या पक्षीय हालचालींचे थेट रूपांतर निवडणुकीतील विजयात होईल, असे मानणे घाईचे ठरेल. पंजाब काँग्रेसचा इतिहास पाहिला तर पक्षाकडे मजबूत संघटन, अनुभवी नेते आणि राज्याच्या राजकारणात खोलवर रुजलेला जनाधार आहे; पण या ताकदीपेक्षा अंतर्गत गटबाजी अधिक चर्चेत राहणे, ही पक्षाची मोठी शोकांतिका आहे. कधी मुख्यमंत्रिपदाभोवतीचे संघर्ष, कधी प्रदेशाध्यक्षपदावरून वाद, कधी एखाद्या नेत्याचा दुसऱ्या नेत्यावर उघड हल्ला या सगळ्यामुळे काँग्रेसचा कार्यकर्ता संभ्रमात पडला. पक्षाचा विरोधक कोण आहे, यापेक्षा पक्षात आपला विरोधक कोण आहे, यावरच अधिक ऊर्जा खर्च होत असेल, तर निवडणुकीत जनतेसमोर कोणता संदेश जाणार? आता काँग्रेसने सचिन पायलट यांच्यावर पंजाबचे प्रभारी म्हणून जबाबदारी सोपवली आहे. हे पाऊल पक्षासाठी महत्त्वाचे ठरू शकते. पायलट यांच्यासमोर सर्वांत मोठे आव्हान संघटन उभे करण्याचे नसून संघटनेतील अंतर्गत अविश्वास कमी करण्याचे आहे. पंजाब काँग्रेसला एक गोष्ट ठरवावी लागेल, ती म्हणजे निवडणुकीपूर्वी मुख्यमंत्री कोण होणार, कोणाचा गट मोठा, कोणाचे तिकीट कुठे, यापेक्षा पक्षाला पुन्हा जनतेच्या प्रश्नांशी जोडणे.

लोकशाहीमध्ये पक्षांतर्गत मतभेद असणे स्वाभाविक आहे; पण ते सार्वजनिक भांडणात बदलले, की पक्षाला फटका बसतो. पायलट यांना या गटांना एका व्यासपीठावर आणण्यात यश आल्यास काँग्रेसला पंजाबमध्ये पुन्हा उभारी घेण्याची संधी आहे. 'आम आदमी पक्षा'ने पंजाबमध्ये सत्ता मिळवली तेव्हा पारंपरिक राजकारणाला मोठा धक्का बसला होता. जनतेने काँग्रेस आणि अकाली दल-भाजपला पर्याय म्हणून 'आप'ला संधी दिली. आजही विधानसभेत 'आप'चे संख्याबळ मजबूत आहे. त्यामुळे काही खासदार भाजपमध्ये गेल्यामुळे विधानसभा सरकार कोसळण्याची परिस्थिती नाही; पण पक्षांतरांकडे पूर्णपणे दुर्लक्षही करता येणार नाही. खासदारांचे पक्षांतर हे अनेकदा स्थानिक राजकीय समीकरणांशी जोडलेले असते; मात्र त्याचा परिणाम कार्यकर्त्यांच्या मनोबलावर आणि मतदारांच्या धारणा बदलण्यावर होऊ शकतो. 'आप'ला आता एकाच वेळी दोन आघाड्यांवर लढावे लागेल. सरकार म्हणून आपल्या कामाचा हिशेब द्यावा लागेल आणि पक्षातील असंतोषाला आळा घालावा लागेल. सत्तेत असताना जनतेच्या अपेक्षा वाढतात. विरोधात असताना आश्वासने देणे सोपे असते. सत्तेत आल्यानंतर प्रत्येक आश्वासनाचा आर्थिक आणि प्रशासकीय हिशेब द्यावा लागतो. आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या पंजाबसारख्या राज्यासाठी हे अधिक कठीण आहे. पंजाबच्या राजकारणात भाजप आणि शिरोमणी अकाली दलाची जवळीक ही नवीन गोष्ट नाही. दीर्घकाळ दोन्ही पक्षांनी एकत्र निवडणुका लढवल्या आणि सत्ता सांभाळली; मात्र शेतकरी आंदोलनाच्या काळात हे संबंध तुटले. आता पुन्हा दोन्ही पक्षांमध्ये संवाद वाढत आहेत.

पंजाबमधील बदलत्या राजकीय समिकरणांमागे आगामी विधानसभा निवडणुकीची गणिते असणे स्वाभाविक आहे; पण जुनी युती म्हणजे जुनेच समीकरण असे नसते. पंजाब बदलला आहे. शेतकरी आंदोलनाने ग्रामीण पंजाबच्या राजकीय विचारविश्वावर खोल परिणाम केला आहे. अकाली दलाच्या पारंपरिक मतदारांमध्येही बदल झाले आहेत. भाजपने पंजाबमध्ये स्वतंत्रपणे आपला जनाधार वाढवण्याचा प्रयत्न केला आहे, म्हणून भाजप-अकाली दलाची पुन्हा जवळीक झाली तर जागावाटपापेक्षा मोठा प्रश्न असेल तो मतदारांचा विश्वास पुन्हा मिळवण्याचा. शेतकरी आंदोलनाच्या जखमा अद्याप ताज्या असताना ही युती ग्रामीण मतदारांपर्यंत कोणता संदेश घेऊन जाणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. पंजाबचे राजकारण कोणत्याही पक्षीय समीकरणापेक्षा शेतकऱ्यांच्या प्रश्नांभोवती फिरते. पंजाबची अर्थव्यवस्था आणि सामाजिक रचना शेतीशी खोलवर जोडलेली आहे. किमान आधारभूत किंमत, पीकखरेदी, कर्जबाजारीपणा, पिकांचे बदलते स्वरूप, उत्पादनखर्च, पाणीटंचाई, भूजलाची घटती पातळी आणि शेतीमालाला योग्य बाजारभाव हे प्रश्न आजही कायम आहेत. शेतकरी विविध मागण्यांसाठी आंदोलन करत आहेत. आंदोलन हा लोकशाहीतील अधिकार आहे; पण तो केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न मानून दडपण्याचा प्रयत्न केला तर समस्या सुटत नाही. त्याच वेळी प्रत्येक मागणी आर्थिकदृष्ट्या शक्य आहे का, तिचा राज्याच्या अर्थव्यवस्थेवर किती भार पडेल, याचाही प्रामाणिक विचार करावा लागेल.

आज पंजाबला फक्त अधिक अनुदान देणारी शेती नको आहे, तर अधिक उत्पन्न देणारी शेती हवी आहे. धान-गहू या पारंपरिक पिकांच्या चक्रातून बाहेर पडून फळे, भाजीपाला, कडधान्ये, तेलबिया आणि प्रक्रिया उद्योगांकडे वळण्याची चर्चा अनेक वर्षांपासून होते; पण त्यासाठी बाजार, साठवणूक, प्रक्रिया उद्योग आणि हमीभावाची विश्वासार्ह व्यवस्था उभी करावी लागेल. निवडणुकीच्या काळात शेतकऱ्यांना दिलेली आश्वासने आणि सत्तेत आल्यानंतरची अंमलबजावणी यातील अंतर कमी झाले पाहिजे. राजकीय पक्ष कितीही मोठमोठ्या घोषणा करोत, शेवटी सामान्य मतदाराचा निर्णय त्याच्या घरच्या बजेटवरही ठरतो. महागाई वाढली, की सर्वात आधी मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबांचे गणित बिघडते. अन्नधान्य, दूध, शिक्षण, आरोग्य, वीज, वाहतूक आणि घरखर्च वाढत असताना उत्पन्न त्याच वेगाने वाढत नसेल तर सरकारविषयी नाराजी निर्माण होणे स्वाभाविक आहे. पंजाबमधील तरुणांसाठी तर रोजगाराचा प्रश्न आणखी गंभीर आहे. शिक्षण घेतल्यानंतरही योग्य रोजगार न मिळणे, सरकारी नोकऱ्यांवर वाढलेले अवलंबित्व आणि परदेशात जाण्याची वाढती इच्छा ही केवळ आर्थिक नव्हे तर सामाजिक समस्या आहे. पंजाबमधील अनेक कुटुंबांसाठी परदेशात जाणे हे आता स्वप्न न राहता पर्याय बनले आहे. तरुण राज्याबाहेर किंवा देशाबाहेर जात असतील, तर राज्याच्या भविष्यासाठी हा इशारा आहे. राजकीय पक्षांनी याकडे केवळ निवडणूक घोषणेच्या दृष्टीने पाहू नये. उद्योग, लघुउद्योग, कृषी प्रक्रिया, सेवा क्षेत्र आणि कौशल्य प्रशिक्षण यांना चालना देऊन स्थानिक रोजगार निर्माण करणे आवश्यक आहे.

पंजाबच्या राजकारणात अमली पदार्थांचा प्रश्न वर्षानुवर्षे चर्चेत आहे. हा विषय निवडणुकीच्या भाषणापुरता मर्यादित राहिला तर परिस्थिती बदलणार नाही. तरुणांना अमली पदार्थांच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी पोलिस कारवाईबरोबरच पुनर्वसन, मानसिक आरोग्य सेवा, रोजगार आणि कुटुंबाला आधार देणाऱ्या सामाजिक यंत्रणा उभ्या कराव्या लागतील. पुरवठा करणाऱ्यांवर कठोर कारवाई आवश्यकच आहे; पण मागणी कमी करण्यासाठीही तितकाच प्रयत्न हवा. आगामी विधानसभा निवडणुकीत प्रत्येक पक्ष आपापल्या पद्धतीने मुद्दे मांडेल. 'आप'च्या कारभारावर काँग्रेस टीका करेल. 'आप' आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांच्या अपयशाचा मुद्दा भाजप पुढे करेल. अकाली दल पंजाबच्या प्रादेशिक अस्मितेवर आणि शेतकरी प्रश्नांवर भर देईल. 'आप' आपल्या सरकारच्या कामांचा हिशेब जनतेसमोर ठेवेल; पण मतदारासाठी आता केवळ पक्ष बदलायचा आहे की राज्याची दिशा बदलायची आहे, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरेल. पंजाबला भावनिक राजकारणाची सवय आहे. धर्म, भाषा, प्रादेशिक अस्मिता आणि शेतकरी हे विषय राजकीय वातावरण सहज तापवू शकतात; पण या सगळ्यापलीकडे आर्थिक वास्तव उभे आहे. राज्याचे कर्ज, सरकारी खर्च, रोजगार, शेतीतील संकट, उद्योगांची कमतरता आणि तरुणांचे स्थलांतर या प्रश्नांवर कोणाकडे व्यवहार्य योजना आहे, हे मतदाराने पाहिले पाहिजे.

पंजाबच्या राजकारणात सध्या कोण कोणाच्या संपर्कात आहे, कोण कोणत्या पक्षात जाणार, कोणती युती होणार, कोणाला किती जागा मिळणार याची चर्चा सुरू आहे; पण निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यात या सगळ्या गणितांपेक्षा मतदाराचे गणित निर्णायक ठरेल. पंजाबच्या मतदाराने सत्ताधाऱ्यांना अनेक वेळा धक्का दिला आहे. एके काळी मजबूत मानल्या जाणाऱ्या पक्षांना त्याने सत्तेबाहेर केले आहे. त्यामुळे कोणताही पक्ष पंजाबला आपला कायमचा गड समजू शकत नाही, हेच वास्तव आहे.

चर्चा आजची

# व्यापारी कर सवलत युपीआयच्या हिताची

**सुयोग आंग्रे**

युपीआयच्या २ हजार रुपयांच्या व्यवहारावर व्यापारी कर सवलत लादण्याच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण देशात आकांडतांडव माजलेआहे. अशा परिस्थिती मध्ये सर्वसामान्य नागरिकांना हि सवलत खरेच हिताची कि अडचणीची यावर बँकिंग क्षेत्रातील तज्ज्ञांबरोबर चर्चा केली तेंव्हा साऱ्या तज्ज्ञांच्या मते व्यापारी कर सवलत हि युपीआयच्या हिटाची आहे असा सूर ऐकू आला. त्याबातचउहापोह मांडण्याचा प्रयत्न केला आहे.युपीआय म्हणजेच युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस ही एक अशी प्रणाली आहे. ज्याद्वारे आपण मोबाईलद्वारे कोणालाही त्वरित पैसे पाठवू किंवा ऑर्डर करू शकतो. हे २०१६ मध्ये नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने सुरू केले होते आणि त्यावेळी फक्त ४४ बँका त्याच्याशी संबंधित होत्या. आज ७५० हून अधिक बँका त्याच्याशी जोडल्या गेल्या आहेत. सुरुवातीला त्याचा वापर खूपच कमी होता, परंतु आज दरमहा २,४०० कोटींहून अधिक व्यवहार याद्वारे केले जात आहेत. याचा अर्थ दररोज ८० कोटींहून अधिक लोकयुपीआयद्वारे पैसे पाठवत आहेत किंवा घेत आहेत. हा बदल केवळ शहरांपुरता मर्यादित नाही. खेड्यातील छोटी दुकाने, कार्ट विक्रेते, ऑटो चालक इत्यादी सर्वयुपीआय क्यूआर कोडशी जोडले गेले आहेत. यामुळे रोखावरील अवलंबित्व कमी झाले आहे आणि ज्यांच्याकडे यापूर्वी कधीही डेबिट-क्रेडिट कार्ड नव्हते त्यांच्यासाठी बँकिंग सुलभ झाले आहे. यामुळे लहान व्यापाऱ्यांना कोणतेही भारी उपकरण किंवा शुल्क न घेता डिजिटल पेमेंट स्वीकारण्याची संधी मिळाली. अर्थशास्त्राच्या दृष्टिकोनातून, युपीआयने पेमेंटची किंमत शून्यावर आणली, ज्यामुळे औपचारिक अर्थव्यवस्थेची व्याप्ती वाढली आणि आर्थिक समावेशनाला नवीन गती मिळाली. यामुळेच आजयुपीआय ही केवळ तांत्रिक सुविधा नसून भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेचा कणा आहे. यूपीआयचे आंतरराष्ट्रीय स्तरावरही खूप कौतुक झाले आहे. आयएमएफने जून २०२५ मध्येयुपीआयचे वर्णन जगातील सर्वात मोठी रिअल-टाइम पेमेंट यंत्रणा म्हणून केले आहे, जे जगातील सुमारे ४९ टक्के रिअल-टाइम डिजिटल व्यवहार हाताळतेब्राझील, चीन आणि दक्षिण कोरिया सारख्या देशांपेक्षा जास्त. आज, भूतान, नेपाळ, सिंगापूर, युएई , फ्रान्स, श्रीलंका, मॉरिशस आणि मालदीवसह सुमारे डझनभर देशांनीयुपीआय स्वीकारले आहे आणि अनेक देश या मॉडेलवर त्यांची डिजिटल पेमेंट इन्फ्रास्ट्रक्चर तयार करण्याचा विचार करत आहेत. आता या मोफत प्रणालीमध्ये १५ ऑक्टोबर २०२६ पासून नाममात्र शुल्क आकारण्यात येणार आहे, ज्याला एमडीआर म्हणजेच व्यापारी सवलत दर म्हणतात. एनपीसीआयच्या या निर्णयामुळे खळबळ उडाली आहे, मात्र खरे चित्र समजून घेण्यासाठी याकडे आकडेवारी आणि अर्थशास्त्राच्या दृष्टिकोनातून पाहणे गरजेचे आहे. सर्वप्रथम, २,००० रुपयांपर्यंतचीयुपीआय देयके पूर्णपणे मोफत राहतील आणि ही रक्कम एकूण पेमेंटच्या ९५ टक्क्यांहून अधिक आहे . याचा अर्थ, १०० पैकी ९५ वेळा तुम्ही युपीआयद्वारे पेमेंट करता तेव्हा कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. युपीआयपेमेंटवरील शुल्क केवळ २,००० पेक्षा जास्त असलेल्या पाच टक्क्यांहून कमी व्यवहारांवर आणि तेही फक्त मोठ्या दुकानदार-व्यावसायिकांवर आकारले जाईल.युपीआय क्यूआर कोड वरून महिन्याला १ लाख रुपयांपर्यंत कमाई करणाऱ्या छोट्या दुकानदारांना काही फरक पडणार नाही. त्यांच्यासाठी सर्व काही पूर्वीप्रमाणेच मोफत राहील. दर देखील अगदी नाममात्र ठेवण्यात आला आहे. फक्त ०.४ टक्के आणि तो देखील रु. ७५,००० किंवा त्याहून अधिक व्यवहारांवर कमाल ३०० रु. हे शुल्क ग्राहकाकडून घेतले जाणार नाही तर दुकानदाराकडून घेतले जाणार आहे, म्हणजेच ३,००० रुपयांच्या खरेदीवर दुकानदाराला फक्त १२ रुपयांचाव्यापारी सवलत दर भरावा लागेल. १,००,००० रुपयांच्या खरेदीवर ०.४ टक्के ४०० रुपये आकारले जातात, परंतु दुकानदाराकडून जास्तीत जास्त ३०० रुपये आकारले जातील. रेल्वे तिकीट, विम्याचे प्रीमियम, वीज-पाणी बिल, पेट्रोल पंप आणि शाळा-कॉलेज फी इत्यादींवर आणखी सवलत आहे. तिथे टक्केवारीऐवजी फक्त ५ रुपये फ्लॅट फी आकारली जाईल, मग ती कितीही मोठी असली तरी आकारली जय; भारतात, दुकानदारांना क्रेडिट कार्डवर १.५ ते २.५ टक्के शुल्क द्यावे लागते, तर डेबिट कार्डवर ते ०.९ टक्क्यांपर्यंत जाऊ शकते. त्यानुसार, चा ०.४ टक्के दर अजूनही सर्वात स्वस्त असेल - क्रेडिट कार्डपेक्षा चार-सहा पट कमी आणि डेबिट कार्डपेक्षा खूपच कमी. याचा अर्थ असा की दुकानदारांकडे डिजिटल पेमेंटचा अवलंब सुरू ठेवण्याचे कारण असेल आणि रोख परत येण्याचा धोका वाढणार नाही. इतर मोठ्या देशांच्या तुलनेत भारताचा दर खरोखरच कमी आहे. चीनमध्ये, अली पे सारखी मोबाईल-वॉलेट व्यापाऱ्यांकडून ०.६ टक्क्यांपर्यंत, म्हणजेचयुपीआय पेक्षा जास्त शुल्क आकारतात, तरीही तिथल्या व्यवहारांची संख्या भारताइतकी मोठी आहे. ब्राझीलमध्ये, डेबिट कार्डवर एक टक्क्यांपेक्षा जास्त शुल्क आकारले जाते आणि क्रेडिट कार्डवर २.२ टक्के शुल्क आकारले जाते. अमेरिकेत कोणतीही मर्यादा नाही आणि क्रेडिट कार्डचे शुल्क अनेकदा २ ते ३ टक्क्यांपर्यंत जाते, ज्याची तक्रार तेथील छोटे दुकानदार वर्षानुवर्षे करत आहेत. या सर्वांच्या तुलनेत भारताचा ०.४ टक्के दर खूपच कमी आहे. खरा प्रश्न दरापेक्षा फीच्या कारणाचा आहे.युपीआय वर दरवर्षी सुमारे २०,००० कोटी फक्त सर्व्हर, सायबर सुरक्षा आणि तांत्रिक पायाभूत सुविधांवर खर्च केले जातात. कोणतीही सुविधा कायमस्वरूपी मोफत चालू शकत नाही. जेव्हा एखादी सुविधा पूर्णपणे विनामूल्य असते, तेव्हा अनेकदा फक्त मोठ्या कंपन्याच दीर्घकाळ तोटा सहन करू शकतात आणि नवीन छोट्या कंपन्यांना बाजारात टिकून राहणे कठीण होते. नाममात्र शुल्क या मार्केटमध्ये अधिक स्पर्धा आणू शकते आणि नवीन तंत्रज्ञानातील गुंतवणुकीला प्रोत्साहन देऊ शकते.यामुळे नागरिकांनी घाबरून जाण्याचे कारण नाही असे अनेक बँकिंग क्षेत्रातील तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

लोकसंसद

## लाडक्या बाप्पाला निरोप देण्याचा दिवस!

बघता बघता अनंत चतुर्दशीचा दिवस उजाडला आणि लाडक्या बाप्पाला निरोप द्यायची वेळ आली. बाप्पाला निरोप देण्याचा हा दिवस अत्यंत भावूक असला तरी आध्यात्मिक दृष्टीने हा आपल्या आयुष्यातील 'अनंत' तत्त्वाची जाणीव करून देणारा एक महान दिवस आहे. गणेशोत्सवाच्या या सांगता दिनाकडे बाप्पाच्या विसर्जनाचा केवळ एक दिवस म्हणून न पाहता बाप्पाने या दहा दिवसांत आपल्या मनात जागवलेल्या सकारात्मक उर्जेचे जतन करण्याचा



हा दिवस आहे. बाप्पाचे विसर्जन हे आपल्याला एक सुंदर जीवन तत्त्व शिकवते. बाप्पाची मातीची मूर्ती पाण्यात विलीन होते पण बाप्पाने उत्सवाच्या काळात भरभरून दिलेली सकारात्मकता, प्रेम आणि ऊर्जा कधीही विलीन होत नाही. बाप्पाच्या आगमनाची पुढच्या वर्षाची वाट पाहत आशीर्वाद बनून ती आपल्या मनात साठून राहते. बाप्पा निरोप घेताना आपल्याला अथांग संयम आणि भक्तीची शिकवण देऊन जातो. जीवनातील प्रत्येक आव्हानाचा सामना करताना त्या अनंत परमेश्वरावर श्रद्धा ठेवून पुढे जाणे हाच या अनंत चतुर्दशीचा खरा संदेश आहे. या पवित्र दिवशी आपणही आपल्या मनातील नकारात्मक विचार, संकुचित वृत्ती, राग आणि ईर्ष्या यांचे विसर्जन करण्याचा संकल्प करूया. गणपती बाप्पा मोरया! पुढच्या वर्षी लवकर येणार! शनिवार ४ सप्टेंबर २०२७!

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे,** अंधेरी

दिनविशेष

# चला..गणेशभक्तांनो, आपण गणरायाला निरोप देऊया

हिंदू संस्कृतीचे आराध्य दैवत... गुणांचे संवर्धन करून बुद्धीला प्रकाशमान करणारे 'गणपती' अशी गणरायाची महिमा आहे. बुद्धी व विवेकाचं प्रतिक. 'चौदा विद्या अन् चौसष्ट कला' यांची पुंजी ज्यांच्याकडे आहे असे विघ्नहर्ता गणपती...आपणास दंडवत प्रणाम! श्रीगणेशाची स्थापना होऊन ११ दिवस मोठ्या भक्तीभावाने संपन्न झाले अन् आज 'अनंत चतुर्दशी' निमित्त गणरायाला निरोप देण्याचा दिवस उजाडला. श्रीगणेशाला निरोप देताना डोळे पाणवतात. तथापि मन घट्ट करून आध्यात्मिक रीतीरिवाजाप्रमाणे गणरायाचं विसर्जन करणं क्रमप्राप्त असते.



बंधू-भगिनींनो, मिरवणूकीदरम्यान बेंजो-डिजे ही कर्कश वाद्य टाळा. त्यातून ध्वनीप्रदूषण निर्माण होऊन श्रवणइंद्रियांना इजा पोहोचते. भगिनींनो, मिरवणुकीत दागिने घालणे टाळावे. लहान मुलांना मिरवणुकीत येण्यास 'मज्जाव' करावा. कारण मिरवणुकीत लहान मुले गायब होण्याचे प्रकार घडतात. 'समाजकंटक' चोरीचपाटी करणाऱ्यांपासून भक्तांनी सावध रहावे. तसेच पोलीस कर्मचाऱ्यांनीही अशा कारवायांवर बारकाईने लक्ष ठेवावे. मिरवणुकीदरम्यान 'मद्यपान,भांग,मादक द्रव्ये प्राशन करू नये. त्याने सणाचे पावित्र्य नष्ट होते. गुलाल डोळ्यात जाणार नाही याची प्रत्येकाने काळजी घ्यावी. मिरवणुकीदरम्यान महिलांनी समूहात (ग्रुप)रहाणे सुरक्षिततेच्यादृष्टीने उचित असते. मंडळ प्रमुख आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांनी एकमेकात समन्वय ठेवून कायदा व सुव्यवस्था यंत्रणा सक्षम ठेवावी. जेणेकरून समाजकंटकांवर वचक बसेल. सांगण्याचे तात्पर्य म्हणजे परमप्रिय गणरायाची विसर्जन मिरवणूक ही शांतता व आनंदमय वातावरणात पार पाडणं, हे प्रत्येकाचे आद्यकर्तव्य आहे. विघ्नहर्ता गणरायाला वाजतगाजत भावपूर्ण निरोप देण्यासाठी विभिन्न गणेश मंडळे हे ढोल-ताशे, लेझीम पथकांच्या साहाय्याने पारंपरिक पद्धतीने भव्यदिव्य मिरवणुका काढतात. भक्तजनो, सद्बुद्धीशिवाय सिद्धी प्राप्त होत नाही, म्हणून हीच सद्बुद्धी भक्तांना देण्याचं काम श्रीगणेश करतात. बुद्धीला प्रकाशमान करणारे गुणपती तुम्हा आम्हा सर्वांना पावोत, हीच प्रभुचरणी प्रार्थना. चला तर, आपण सर्वजण एकसंध होऊन मोठ्या भक्तीभावाने गजाननाला आनंदाश्रूने निरोप देऊया! गणपती चालले..गावाला! चैन पडेना.. आम्हाला! तथापि, गणरायाची पूजाअर्चा केली, मोदक अर्पण केले खरे...परंतु एवढं करणं पुरेसं नाही. तर दैनंदिन व्यवहारात, वागण्यात, बोलण्यात व आचरणात शुद्धता अन् सात्विकता असणं तितकंच आवश्यक असतं.असं केल्याने प्रत्येकाच्या जीवनातील विघ्ने दूर होऊन सकल गणेशभक्त सुखी, आनंदी व समृद्ध होतील, हे निश्चित! गणेश मंडळांनी गणरायाचे विसर्जन शांततेने व शिस्तीने व्हावे, यासाठी संयुक्तरित्या प्रयत्न करावेत. प्रिय भक्तांनो, गणेश विसर्जन खेळीमेळीच्या वातावरणात व धार्मिक सहिष्णतेने पार पडावं, हीच श्रींची इच्छा! धार्मिक पावित्र्य अबाधित रहावे, हेच यामागील प्रांजळ उदिष्ट आहे. 'गणपती बाप्पा मोरया.. पुढच्या वर्षी लवकर या.'

**- रणवीर राजपूत**

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

२५ सप्टेंबर
१) श्रीम. विद्या नंदकुमार कुवळेकर
रामनाथ, अलिबाग
दि.२५-०९-१९६०

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु.३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक,कृषीवल**

# ठाणा नाका रेल्वे पूल दुर्लक्षित

## • पायऱ्यांवरील फरशा तुटल्या; प्रकाशव्यवस्थेचा अभाव

**| खांदेश्वर | प्रतिनिधी |**

खांदा कॉलनी आणि ठाणा नाका परिसरातील नागरिकांना ये-जा करण्यासाठी रेल्वे प्रशासनाने उभारलेला पादचारी पूल सध्या दुर्लक्षित अवस्थेत आहे. छोटा खांदा परिसरातील नागरिकांसह सर्वसामान्य प्रवाशांसाठी महत्त्वाचा असलेला हा पूल सध्या वापरण्यास सुरक्षित आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

पुलावर जाणाऱ्या जिन्यांवरील अनेक पायऱ्यांच्या लाद्या तुटलेल्या असून, त्यावरून चढताना नागरिकांना कसरत करावी लागत आहे. पुलाकडे जाणाऱ्या मार्गावर मोठ्या प्रमाणात झाडाझुडपे वाढली असून, नागरिकांच्या वाटेत अडथळे निर्माण झाले आहेत. रस्त्याचीही दुरवस्था झाल्याने पुलापर्यंत पोहोचणे नागरिकांसाठी त्रासदायक ठरत आहे.

पुलाच्या आजूबाजूला वाढलेल्या झाडांमुळे परिसर अधिकच दुर्लक्षित दिसत आहे.




विशेष म्हणजे पुलावर पुरेशी प्रकाशव्यवस्था नसल्याने रात्रीच्या वेळी नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

दिवसा नागरिकांची वर्दळ असली तरी रात्री हा परिसर निर्मनुष्य होत असल्याने प्रकाशाची आवश्यकता आहे. पनवेल महानगरपालिकेची नवीन इमारत या परिसरात उभी राहत असल्याने भविष्यात या मार्गावर नागरिकांची वर्दळ आणखी वाढण्याची शक्यता आहे.

मात्र, त्यापूर्वीच या पुलाची दुरुस्ती आणि परिसराची स्वच्छता करण्याची गरज आहे. हा पूल रेल्वे प्रशासनाने उभारला असला, तरी त्याच्या देखभालीची जबाबदारी नेमकी कोणाची, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे. पूल रेल्वेचा, परिसर सिडकोचा की देखभाल पनवेल महानगरपालिकेची, याबाबत स्पष्टता होणे आवश्यक आहे.

प्रशासनांच्या परस्पर जबाबदारीच्या चर्चेत नागरिकांना मात्र, त्रास सहन करावा लागत आहे. तुटलेल्या पायऱ्या, वाढलेली झाडे आणि अपुरी प्रकाशव्यवस्था यामुळे एखादी दुर्घटना घडण्यापूर्वीच उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

### सुशोभीकरणाची मागणी

प्रशासनाने तातडीने दखल घेऊन पुलाची दुरुस्ती व परिसराचे सुशोभीकरण करावे, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत. अन्यथा एखादी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा संतप्त सवाल नागरिकांकडून विचारला जात आहे.

पुलाची तातडीने पाहणी करून धोकादायक पायऱ्यांची दुरुस्ती करावी. झाडाझुडपे हटवून पुलाकडे जाणारा मार्ग मोकळा करावा. तसेच पुलावर आणि जिन्यांच्या परिसरात पुरेसे दिवे बसवावेत. नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने रेल्वे, सिडको आणि पनवेल महानगरपालिकेने संयुक्त पाहणी करावी, अशी मागणी आहे.'पूल कोणाचा?' यापेक्षा 'पूल नागरिकांसाठी सुरक्षित कधी होणार?' हा प्रश्न सध्या महत्त्वाचा आहे.

# माणगावात महसूल लोक अदालतीचे आयोजन

**| माणगाव | प्रतिनिधी |**

महसूल प्रशासनातील विविध अर्धन्यायिक प्रकरणे आणि प्रलंबित अपिलांचा जलद गतीने निपटारा करण्यासाठी माणगाव उपविभागात ङ्गमहात्माजोतीरावफुलेमहसूललोक अदालत अभियानफराबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत माणगाव येथील उपविभागीय अधिकारी यांच्या न्यायालयात सोमवार, ५ ऑक्टोबर २०२६ तसेच सोमवार, ७ डिसेंबर २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत विशेष सुनावणी घेण्यात येणार आहे. अशी माहिती उपविभागीय अधिकारी माणगाव यांनी प्रसिद्धीसाठी दिलेल्या पत्रकातून दिली. महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने १४ ऑगस्ट २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार राज्यभर १ सप्टेंबर २०२६ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीत ङ्गमहात्मा जोतीराव फुले महसूल लोक अदालत अभियानफ राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. महसूल प्रशासनातील मंडळ अधिकारी, तहसीलदार, अपर तहसीलदार, शेतजमीन न्यायाधिकरण तसेच उपविभागीय अधिकारी यांच्या स्तरावर प्रलंबित असलेल्या अर्धन्यायिक दावे व अपिलांचा जलद निपटारा हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे. महसूल विषयक दावे दाखल झाल्यानंतर विविध कारणांमुळे अनेक प्रकरणे दीर्घकाळ प्रलंबित राहतात. त्यामुळे संबंधित पक्षकारांना वेळ, खर्च आणि न्यायालयीन प्रक्रियेचा अतिरिक्त भार सहन करावा लागतो. तडजोडीने अथवा उभय पक्षांच्या सहमतीने निकाली काढता येणाऱ्या प्रकरणांना या विशेष अभियानाच्या माध्यमातून जलदगतीने निर्णयाच्या टप्प्यावर आणण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. दरम्यान, अपर जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांनी २७ ऑगस्ट २०२६ रोजीच्या आदेशान्वये माणगाव उपविभागीय अधिकारी यांच्या न्यायालयातील प्रलंबित अर्धन्यायिक प्रकरणांचा जलद निपटारा करण्या साठी महसूल लोक अदालत आयोजित करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्या नुसार माणगाव उपविभागीय अधिकारी यांच्या न्यायालयात या अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर माणगाव व तळा तालुक्यातील संबंधित विधिज्ञांनी तडजोडीने व सहमतीने निकाली निघण्याची शक्यता असलेल्या प्रकरणांची माहिती, उभय पक्षकारांची नावे तसेच दावा क्रमांक आणि आवश्यक तपशील २८ सप्टेंबर २०२६ पूर्वी उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडे सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. माणगाव उपविभागातील संबंधित पक्षकार, विधिज्ञ आणि महसूल प्रकरणांशी संबंधित नागरिकांनी निर्धारित मुदतीत आवश्यक माहिती सादर करून लोक अदालत अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी, माणगाव विभाग, डॉ. संदीपान सानप यांनी केले आहे.

## निलेश चव्हाण यांचे निधन

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

पनवेल तालुक्यातील कामोठे येथील रहिवासी निलेश यशवंत चव्हाण (५१) यांचे १३ सप्टेंबर रोजी निधन झाले आहे. गणेशोत्सवात झालेल्या या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी असा परिवार आहे. ते नवीमुंबई महानगरपालिकेच्या पारिचारिका विजया चव्हाण यांचे पती होते. त्यांचा दशक्रिया विधी २२ सप्टेंबर रोजी श्रीक्षेत्र चिरनेर-भोम खाडी येथे झाले.



## दामोदर चौलकर यांचे निधन

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

उरण तालुक्यातील चिरनेर कलानगर येथील कुंभार समाजातील प्रसिद्ध मूर्तिकार दामोदर पोसू चौलकर (८०) यांचे गुरुवारी (दि.१७) वृद्धपकाळाने निधन झाले आहे. गणेशोत्सवात झालेल्या या घटनेमुळे चिरनेर कलानगर येथील कुंभार समाजावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पार्थिवावर चिरनेर येथील मुक्तिधाम स्मशानभूमीत कुंभार समाजासह विविध समाजातील नागरिकांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा आप्त परिवार आहे. संत गोरोबाकाका सेवा मंडळाचे ते अनेक वर्ष पदाधिकारी होते. दामोदर चौलकर हे कवी मनाचे होते. त्यांनी लिहिलेल्या कविता जिल्ह्यातील कवी संमेलनात प्रचंड गाजल्या. उत्तम मूर्तिकार असल्यामुळे त्यांच्या हातून प्रसन्न भावमुद्रेतील हजारो मूर्ती घडल्या गेल्या आहेत. त्यांनी केलेली गणरायाच्या डोळ्यांची सजीव भासणारी आखणी गणेश भक्तांचे लक्ष वेधून घेत होती.



# प्रबोधनकार ठाकरे यांची जयंती साजरी

**| कर्जत | प्रतिनिधी |**

प्रबोधनकार ठाकरे हे जातीव्यवस्था, अंधश्रद्धा, अस्पृश्यता, हुंडापद्धती, बालविवाह, देवदासी प्रथा अशा सामाजिक दुष्कृत्यांविरुद्ध जनमत तयार करून लढणारे द्रष्ट्ये युगपुरुष होते, असे प्रतिपादन कृषी विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने यांनी केले. येथील प्रादेशिक कृषी संशोधन केंद्रात आयोजित प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. डॉ. मर्दाने यांनी प्रबोधनकारांच्या जीवनातील विविध प्रसंगांचे नेटके विवेचन केले. अध्यक्षीय मार्गदर्शनात डॉ. वाघमोडे यांनी प्रबोधनकार ठाकरे यांनी जीवनभर सामाजिक समता निर्माण करण्यासाठी परिश्रम घेतले, असे नमूद करीत त्यांचे संस्कार आणि वारसा जतन करण्याचे कार्य त्याच्या भावी पिढीकडून होणे अभिमानास्पद असल्याचे सांगितले. कार्यक्रमास डॉ. महेंद्र गवई, डॉ. वैशाली सावंत, डॉ. नामदेव म्हसकर, डॉ. राजेंद्र सावळे, नरसिंह निरडे, दीप्ती पाटील व अन्य कर्मचारी उपस्थित होते.


■ (छायाचित्र : संजय गायकवाड)

# मुरुडमध्ये गडगडाटात पाऊस

**| कोर्लई | प्रतिनिधी |**

मुरुडमध्ये दिवसभर उन उकाड्याने हैराण झालेल्या मुरुडकरांना दुपार नंतर पडलेल्या पावसाने दिलासा मिळाला. मुरुडमध्ये आतापर्यंत २३७१ मि. मी. पाऊस पडला आहे. राज्यात सप्टेंबरच्या अखेरच्या आठवड्यात बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे मुसळधार परतीचा पाऊस पडत असून अनेक जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह पावसाचा जोर कायम आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांसाठी पावसाचा यलो आणि ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. कोकण आणि किनारपट्टी मुंबई, ठाणे, पालघर आणि रायगड परिसरात मध्यम ते जोरदार पाऊस आणि वादळी वाऱ्यासह हलक्या ते मध्यम सरींची शक्यता वर्तवण्यात आली आहे.



# परतीच्या पावसाच्या सरींमुळे शेतकऱ्यांना दिलासा

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

परतीच्या पावसाच्या सरींमुळे उरण तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून, शेतकरी सुखावला आहे. भाताचे पीक पोटरीला आले असून, भाताच्या पिकांमध्ये दाणा तयार होण्याच्या मार्गावर असताना, परतीच्या पावसाच्या सरी बरसल्यामुळे येथील शेतकरी सुखावला आहे. गणपतीचे आगमन झाल्यापासून पावसाने विश्रांती घेतली होती.



मात्र, धापडवड जमिनीतील पाण्याचा ओलावा खूप कमी झाल्यामुळे, भात पिकांना दाणे भरण्यासाठी पावसाची निकडीची गरज होती. बुधवारी सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास पावसाच्या सरी बरसल्या त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

# वेळास येथील आरोग्य शिबिराला प्रतिसाद

**| वेळास | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन तालुक्यातील उपकेंद्र वेळास येथे गणपती गणेशोत्सव अभियान अंतर्गत भव्य आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये ग्रामस्थांची सर्वसाधारण आरोग्य तपासणी, ब्लड शुगर तपासणी आणि स्क्रीनिंग करण्यात आले. यासोबतच शासनाच्या आयुष्मान भारत योजनेअंतर्गत पात्र नागरिकांना मोफत कार्ड काढून देण्याची विशेष सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली होती.

या शिबीराला परिसरातील ज्येष्ठ नागरिक व तरुणांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



उपक्रम यशस्वी करण्यासाठी आशा सेविका सौ. स्नेहा कल्पेश मुरकर यांनी विशेष पुढाकार घेऊन घराघरांत जनजागरण केले. तसेच आशा सेविका मृणाली काविणकर व सामिया पारकर यांनी शिबीरासाठी विशेष मेहनत घेतली.

या प्रसंगी आरोग्य सहाय्यक गोपीनाथ पाटील, आरोग्य सेवक राजेंद्र जाणवल, उ.क.ज. विठ्ठल चौधरी साहेब, गाव अध्यक्ष ऋतुराज शिलकर, समाजसेवक राजेश (राजू) तोंडलेकर आणि दीपक वाजे यांच्यासह स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामीण भागात राबवल्या गेलेल्या या उपक्रमाचे ग्रामस्थांकडून मनापासून कौतुक केले जात आहे. तसेच या उपक्रमाचे मान्यनरानी कौतुक केले.

**स्थानिक नागरिकांच्या जीवाला धोका | लवकरात लवकर काम पूर्ण करण्याची मागणी**

# खांब-वरसगाव हद्दीत अवजड वाहनांची वर्दळ

**| धाटाव | प्रतिनिधी |**

मुंबई गोवा महामार्गाचे काम गेली १७ वर्ष रखडलेले असून ते अपूर्ण अवस्थेत आहे. खांब ते वरसगाव भीरा फाटा महामार्गावरील स्थानिक नागरिकांना महामार्ग येणाऱ्या अति वेगवान वाहनांचा धोका निर्माण होत आहे. याकडे महामार्गाचे अधिकारी, ठेकेदार लोकप्रतिनिधींनी लक्ष देणे गरजेचे आहे.

महामार्गावर खांब ते वरसगाव पर्यंत अनेक गावे येत आहेत. मुठवली, पुगाव, पुई, रोहिदास नगर, कोलाड, महादेववाडी, आंबेवाडी अशी अनेक गावे या महामार्गावर आहेत. त्यामुळे या रस्त्यावरून कामगार वर्ग शालेय विद्यार्थी ज्येष्ठ नागरिक, छोटे मोठे व्यावसायिक हजारोच्या संख्येने जात असतात. त्यामुळे त्यांना प्रवास करताना रस्ता ओलांडून जावे लागत आहे लागत आहे. कुठेही अधिकृत क्रॉसिंगची सुविधा नाही. भोले भाबडे ग्रामीण नागरिक तर रस्त्यावर उभे राहत आहेत. सुसाट वेगाने येणाऱ्या वाहनांचा वेग पाहिला तर मोटरसायकल स्वराचा अंदाज चुकला तर अपघाता निश्चित अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.



गणेशोत्सवात तर रस्त्याच्या पलीकडे जाताना अर्धा पाऊण तास लोकांना ताटकळत राहावे लागत होते. त्यामुळे भविष्याच्या काळात यावर उपाययोजना झाली नाही तर अपघात घडू शकतात.

प्रत्येक तीन किलोमीटरवर रस्ता क्रॉसिंग ठेवण्यात येणार आहे. परंतु अद्याप काम अपूर्ण असल्याने लोकांना नेमकं जायचं कुठून हा प्रश्न निर्माण झाला आहे. पुगाव नम्रता ढाबा या ठिकाणी क्रॉसिंग ठेवण्यात आले आहे. पुढे पुई त्यानंतर रेल्वे ब्रिज जवळ क्रॉसिंग राहणार असे समजते. परंतु महामार्गाचे ठेकेदार निश्चित असे सांगत नाहीत.

महामार्गाचे रखडलेले काम भविष्यकाळात मार्गी लागेल परंतु खांब पासून ते वरसगाव पर्यंत महामार्गावर येथील स्थानिक खासदार आमदारांनी जातीने लक्ष घालून रस्ता पूर्ण करावा जेणे करून नागरिकांची गैरसोयी दूर होईल.

### स्थानिकांच्या प्रश्नांकडे लक्ष द्या

स्थानिक नागरिकांचे प्रश्न सोडवणे हे काळाची गरज ठरत आहे. केवळ अनेक वर्षांची पक्ष संघटना टिकवण्याची नेत्यांची धडपड पाहिली तर ती धडपड सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी दिसत नसल्याची खंत स्थानिक नागरिक व्यक्त करीत आहेत.

## निवडक

# तुरुंबाडीत विद्यार्थ्यांना स्वावलंबनाचे धडे

**म्हसळा** : म्हसळा तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा तुरुंबाडी येथे विद्यार्थ्यांमध्ये श्रमसंस्कार, स्वावलंबन तसेच पोषणाबाबत जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या परसबाग उपक्रमाला चांगले यश मिळत आहे. सोमवारी (दि. २१) सप्टेंबर रोजी शाळेच्या परसबागेतून तब्बल १५ किलो विविध प्रकारच्या ताज्या भाज्यांची काढणी करण्यात आली. या परसबागेत लाल भोपळा, काळा भोपळा, दोडका, भेंडी, मिरची, वांगी आणि काकडी आदी विविध भाज्यांचे उत्पादन घेण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी शाळेच्या परिसरात तयार केलेल्या या परसबागेतील भाजीपाला काढणीचा अनुभव घेतला. काढण्यात आलेल्या एकूण १५ किलो भाजीपैकी ५ किलो भाजी शालेय पोषण आहारासाठी वापरण्यात आली, तर उर्वरित १० किलो भाजीची विक्री करण्यात आली. परसबागेत उत्पादित झालेली ताजी भाजी विद्यार्थ्यांना पोषण आहारातून देण्यात आल्याने विद्यार्थ्यांना पौष्टिक व ताजा आहार मिळाला. त्याचबरोबर उर्वरित भाजीची विक्री करून ७२५ रुपये उत्पन्न शाळेला मिळाले. या उत्पन्नाचा उपयोग शाळेच्या शैक्षणिक व परसबाग उपक्रमासाठी करण्यात येणार आहे. शालेय परसबागेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ भाजीपाला उत्पादनाची माहिती मिळत नाही, तर शेती, श्रमाचे महत्त्व, पोषणमूल्य, पर्यावरण संवर्धन, स्वावलंबन आणि आर्थिक व्यवहार यांचेही प्रत्यक्ष शिक्षण मिळत आहे. त्यामुळे तुरुंबाडी जिल्हा परिषद शाळेचा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी अनुभवाधारित शिक्षणाचे उत्तम उदाहरण ठरत आहे.



# विद्यार्थिनींनी अनुभवली दिल्लीवारी

**खरोशी** : जिल्हा परिषदेतील शाळेतील विद्यार्थ्यांची दिल्लीवारी अनुभव देणारी ठरली. १६ ते २२ सप्टेंबर २०२६ दरम्यान खोपोली-दिल्ली-खोपोली प्रवास संस्मरणीय ठरल्याचे शिक्षिका जयश्री सुर्वे व शिल्पा पाटील यांनी सांगितले.देशभरातील २४ हजार ७०६ शाळांमधील १०लाख ६हजार,९२२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलेल्या प्रतिष्ठित राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्रातून निवड झालेल्या विद्यार्थ्यांपैकी जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वडवळ येथील ३ मुली आणि जिल्हा परिषद शाळा नारंगी येथील १ मुलगी अशा एकूण ४ गुणवंत विद्यार्थिनींनी जयश्री सुर्वे, शिल्पा पाटील यांनी दिल्लीतील ग्रँड फिनालेमध्ये राज्याचे प्रतिनिधित्व केले अतिशय सुंदर आणि डोळ्यांचे पारणे फिटणारे क्षण अनुभवायला मिळाले. पंतप्रधान संग्रहालय नवी दिल्ली येथे आयोजित भव्य आणि दिमाखदार बक्षीस वितरण सोहळ्याचे मानकरी आणि साक्षीदार होण्याची सुवर्णसंधी या विद्यार्थीनींना मिळाली. संपूर्ण देशभरातून निवड झालेल्या १३० बालचमूंमध्ये महाराष्ट्रातील ४ विद्यार्थी हे एकट्या खालापूर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांचे असणे ही आपल्या रायगड जिल्ह्यात शिक्षण क्षेत्रासाठी अत्यंत अभिमानाची बाब ठरली आहे अशी माहिती मार्गदर्शक शिक्षिका जयश्री सुर्वे व शिल्पा पाटील यांनी दिली. या संपूर्ण ६ दिवसांच्या प्रवासात दिल्लीतील भव्य नियोजन, निवास व भोजनाची उत्कृष्ट व्यवस्था तसेच विविध राज्यांतील विद्यार्थ्यांशी झालेला वैचारिक देवाणघेवाणीचा संवादामुळे मुलांचा आत्मविश्वास द्विगुणित झाला आहे.





# चिल्हे येथे शैक्षणिक साहित्याचे वाटप

**खांब** : स्फूर्ती प्रतिष्ठान ढोलताशा ध्वजपथक, रोहा यांच्या वतीने शुभम म्हात्रे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून तालुक्यातील श्रमिक विद्यालय चिल्हे येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक दिपक जगताप, स्फूर्ती प्रतिष्ठानचे सुशील बामणे, दिनेश मोरे, शुभम म्हात्रे आदींसह विद्यालयातील सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते. स्फूर्ती प्रतिष्ठान ढोलताशा ध्वजपथकाच्या माध्यमातून गेल्या काही वर्षांपासून केवळ सांस्कृतिक उपक्रमांपुरते मर्यादित न राहता सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम सातत्याने केले जात आहे. ढोलताशा व ध्वजपथकाच्या माध्यमातून वर्षभरात जमा होणाऱ्या रकमेतून आवश्यक देखभाल व प्रवासाचा खर्च वगळून उर्वरित रक्कम सामाजिक कार्यासाठी वापरण्याचा आदर्श उपक्रम प्रतिष्ठानच्या माध्यमातून राबविला जात आहे. याच सामाजिक जाणिवेतून गरजू व्यक्तींना तसेच विद्यार्थ्यांना विविध प्रकारे सहकार्य केले जाते. यंदाही श्रमिक विद्यालय चिल्हे येथील सुमारे शंभर विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देऊन त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यात आले.स्फूर्ती प्रतिष्ठानच्या या स्तुत्य उपक्रमाचे पालक, विद्यार्थी व ग्रामस्थांकडून कौतुक करण्यात येत आहे.

# भाकरवड गावात कवी संमेलन

**भाकरवड** : अलिबाग तालुक्यातील भाकरवड येथे गुरुवारी (दि. १७) सप्टेंबर रोजी नरेश पाटील यांच्या निवासस्थानी कोकण मराठी साहित्य परिषद शाखा उरण यांच्या विद्यमाने गणपती बाप्पाविशेष कवी संमेलन घेण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात गणेश पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमास प्रा. एल. बी पाटील, कैलास पिंपळे, मच्छिंद्र म्हात्रे, रमण पंडित, शिवप्रसाद पंडीत, रामचंद्र म्हात्रे, दिलीप मोकल, अमृत जुईकर, प्रकाश पाटील, मोहन पाटील, प्रकाश मिसाळ, सदानंद ठाकूर, न. ग. पाटील, राजाराम भगत, संजीव पाटील, महेंद्र पाटील, दिलीप पाटील, राजेंद्र पाटील, दयानंद म्हात्रे, विनायक पाटील ,आदी मान्यवर उपस्थित होते. कवींनी मुंबई गोवा महामार्ग, ग्रामीण रस्ते, प्रदूषण, तर गणेशोत्सव यावर विशेष काव्य, कवितांचे सादरीकरण केले. मृदुंगाच्या साथ जीवन पाटील यांनी दिली .

# औदुंबर पाटील यांचा सत्कार

**पनवेल :** नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत पनवेल गुन्हे शाखा ३ च्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदाचा पदभार औदुंबर पाटील यांनी स्वीकारल्यानिमित्त सकल मराठा समाज मंडळ, खांदा कॉलनी यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. पाटील यांनी यापूर्वी कोपरखैरणे पोलीस ठाणे तसेच पनवेल वाहतूक शाखेत प्रमुख पदावर कार्यरत असताना प्रभावी कार्यशैलीची छाप उमटवली आहे. त्यांच्या अनुभवामुळे पनवेल गुन्हे शाखेच्या नव्या जबाबदारीकडून नागरिकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत.

# निवडक



## बाप्पाच्या निरोपासाठी गणेश घाट सज्ज

**खांदा कॉलनी** : लाडक्या बाप्पाला निरोप देण्यासाठी गणेशभक्त सज्ज झाले आहेत. अनंत चतुर्दशीच्या विसर्जनासाठी पनवेल महानगरपालिकेनेही जय्यत तयारी सुरू केली आहे. पनवेल महापालिका क्षेत्रातील १२ फुटांपेक्षा अधिक उंचीच्या गणेशमूर्तींच्या विसर्जनासाठी गणेश घाटावर विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. मोठ्या मूर्तींचे विसर्जन सुरक्षितपणे पार पाडण्यासाठी पालिका प्रशासनाने आवश्यक यंत्रसामग्री सज्ज ठेवली आहे. विसर्जन घाट परिसरात साफसफाईची कामे वेगाने सुरू असून, तात्पुरत्या स्वरूपातील व्यवस्था उभारण्यात आली आहे. मोठ्या गणेशमूर्ती घाटावर आणण्यासाठी तसेच विसर्जन प्रक्रिया सुरळीत करण्यासाठी क्रेनची व्यवस्था करण्यात आली आहे. विसर्जनाच्या वेळी कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी पालिका अधिकारी आणि कर्मचारी घाटावर तैनात राहणार आहेत. भाविकांना सूचना देण्यासाठी ध्वनिक्षेपकाची व्यवस्था करण्यात आली आहे. रात्रीच्या विसर्जनावेळी पुरेसा प्रकाश मिळावा यासाठी फ्लडलाईटचीही व्यवस्था करण्यात आली आहे. घाट परिसरातील स्वच्छता, प्रकाश व्यवस्था आणि विसर्जनाची प्रक्रिया यावर पालिका प्रशासनाकडून विशेष लक्ष दिले जाणार आहे. गणेश मंडळांनी आपल्या विसर्जन मिरवणुका नियोजित वेळेत सुरू करून घाटावर वेळेत पोहोचावे, असे आवाहन पालिकेने केले आहे.

## खुरावले-वाघोशी रस्त्याची दुरवस्था

**पाली** : खुरावले फाटा ते वाघोशी या मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत झालेल्या रस्त्याची ओव्हरलोड आणि बेदरकार वाहतुकीमुळे अत्यंत दैनंदिन दुरवस्था झाली असून, रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. या मार्गावरून चालणे आणि प्रवास करणे नागरिकांसाठी धोक्याचे बनले आहे. महागाव आणि ताडगाव परिसराच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात चिरा जांभा दगडाच्या खाणी आहेत. या खाणींमधून दिवस-रात्र मोठ्या प्रमाणावर ओव्हरलोड वाहनांची बेकायदेशीर



वाहतूक सुरू असते. तसेच खडी, डबर, वाळूची अवजड वाहनांची सततची वाहतूक ह्या मार्गांवरून चालू असते. क्षमतेपेक्षा कितीतरी पटीने जास्त वजन वाहून नेणाऱ्या अवजड वाहनांमुळे रस्त्यावर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले आहेत. यामुळे दुचाकी आणि इतर लहान वाहनधारकांना प्रवास करताना तीव्र त्रासाला सामोरे जावे लागत आहे. अवजड वाहनांच्या बेदरकार आणि अनियंत्रित वेगामुळे लहान-मोठे अपघात घडून नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे.विशेष म्हणजे, खुरावले फाटा ते वाघोशी हा रस्ता मुख्यमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत करण्यात आला होता. मात्र, सध्या या रस्त्याचा मदोष निवारण कालावधीफ संपुष्टात आला आहे. ठेकेदाराचा कालावधी संपल्याने आता या रस्त्याच्या दुरुस्ती व देखभालीकडे प्रशासनाकडून पूर्णपणे दुर्लक्ष केले जात आहे. रस्त्याची झालेली दुरवस्था आणि त्यातून उद्भवणारे धोके पाहता या अवजड व अवैध वाहतुकीकडे संबंधित प्रशासनाचे आणि शासनाचे लक्ष आहे की नाही? असा संतप्त सवाल स्थानिक नागरिक विचारत आहेत. या मार्गावरील अवैध ओव्हरलोड वाहतुकीवर तात्काळ कारवाई करून रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशी जोरदार मागणी परिसरातील नागरिकांकडून केली जात आहे.



## उरणमध्ये कांदळवनाची कत्तल अन् टॉवरचे जंगल

**उरण** : एकीकडे पर्यावरण वाचवा, कांदळवन जपा, झाडे लावा असा उपदेश शासनाकडून केला जात असताना, दुसरीकडे उरण तालुक्यात कांदळवनाची कथित कत्तल, भराव आणि झाडांची तोड करून बांधकामे उभी राहात असल्याच्या तक्रारींनी प्रशासनाच्या पर्यावरण संवर्धनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.उरण तालुक्यातील काही ग्रामपंचायत हद्दींमध्ये समुद्रकिनारी असलेल्या खारफुटीची कथित तोड करून मोठ्या प्रमाणात भराव करण्यात येत असल्याच्या तक्रारी आहेत. या भरावानंतर बांधकामे उभी राहत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. कांदळवन हे किनारपट्टीचे नैसर्गिक संरक्षण कवच असताना त्याच्यावर घाव घातला जात असेल, तर भविष्यातील पर्यावरणीय संकटाची जबाबदारी कोण घेणार, असा सवाल उपस्थित होत आहे. दुसरीकडे उरण नगरपालिका हद्दीत झाडांची तोड करून टॉवर उभारले जात असल्याच्या तक्रारीही आहेत. हिरवाई कमी होत असताना काँक्रीटचे जंगल मात्र वाढत असल्याचे चित्र आहे. विकासाच्या नावाखाली झाडे तोडायची आणि मोकळ्या जागांवर टॉवर उभे करायचे, तर पर्यावरण संवर्धनाचे धडे केवळ सामान्य नागरिकांनीच घ्यायचे का, असा संतप्त सवाल उरणकरांकडून होत आहे. उरणच्या कांदळवन आणि हिरवाईच्या रक्षणासाठी कठोर भूमिका घेण्याची मागणी केली जात आहे.


## क्लासिफाईड

जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- Vacancy in furniture factory as a office boy/girl. Education- Graduation. Experience-3-4 years. Salary- 20,000 per month. Location- Bamansure, chondhi. Contact- 9823585321.
- Vacancy for store Manager in furniture store. Experience in sale- 5+years. Salary- 50,000 per month. Location-Zirad. Contact- 9823585321
- होम स्टे कामासाठी जोडपे पाहिजे आहे. ठिकाण : चोंढी मो.नं. ८७७९७७६७१४
- अलिबाग एस.टी. स्टँडजवळ दुकान गाळा विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# शार्लोट लेकमधील गाळ गेला कुठे?

## तत्कालीन नगर अभियंत्यांच्या नोंदीची चौकशी करण्याची मागणी

- **पालिकेच्या नोंदीत गाळ काढल्याचा दावा**
- **तलावाभोवती मात्र अजूनही गाळाचा खच**

। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरानच्या शार्लोट लेकमधून तब्बल एक हजार ट्रक गाळ काढल्याची नोंद पालिकेच्या बांधकाम विभागात आहे. मात्र, हा गाळ नेमका गेला कुठे, याचे उत्तर अद्याप मिळालेले नाही. विशेष म्हणजे, तलावाच्या भोवती आजही मोठ्या प्रमाणात मातीमिश्रित गाळ साचलेला असल्याने एक हजार ट्रक गाळ काढल्याची नोंदच संशयाच्या भोवऱ्यात आली आहे. त्यामुळे तत्कालीन नगर अभियंत्यांनी केलेल्या नोंदीची शासनाने चौकशी करावी, अशी मागणी होत आहे.

शार्लोट लेकच्या गाळ काढण्यासाठी अमृत २.० योजनेतून सुमारे पाच कोटींचा निधी मंजूर झाला आहे. तलावातील गाळ काढून तो शहरातील रस्त्यांसाठी वापरण्याचे नियोजन होते. त्यानुसार १ हजार ट्रक गाळ काढल्याचा अहवाल तत्कालीन नगर अभियंत्यांनी पालिकेकडे देयकासाठी सादर केला होता.



मात्र, सर्वसाधारण सभेत कामावर आक्षेप घेतल्याने देयक अदा करण्यात आले नाही.

गाळ काढला असेल तर तो कुठे साठवला? त्याची वाहतूक कुठे झाली? या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे मिळाली नसल्याचा आरोप स्थानिक कार्यकर्ते राकेश कोकळे यांनी केला आहे.

> एक हजार ट्रक गाळ काढल्याची नोंद आहे; मात्र तो गाळ कुठे गेला याचा स्पष्ट तपशील नाही. तलावाभोवती आजही गाळ दिसत असल्याने या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी करावी.
> – राकेश कोकळे, स्थानिक कार्यकर्ते

तत्कालीन नगर अभियंत्यांच्या नोंदी, प्रत्यक्ष काम आणि गाळाच्या विल्हेवाटीची शासनाने चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर यांनी शार्लोट लेक खरोखर गाळमुक्त झाला आहे का, संवर्धनाचे काम पूर्ण झाले आहे का, हे पालिकेने जाहीर करावे, अशी मागणी केली आहे.

### गाळाचा हिशेब नागरिकांना द्या

कागदावर एक हजार ट्रक गाळ; प्रत्यक्षात तलावाभोवती गाळच गाळ! गाळ काढला असेल तर त्याचे ठिकाण, वाहतूक आणि विल्हेवाट याचा संपूर्ण हिशेब पालिकेने नागरिकांसमोर मांडावा, अशी मागणी होत आहे.

# माणगावचा बल्क ड्रग पार्क रद्द

- **महाराष्ट्राची मोठी औद्योगिक संधी हातची गेली**
- **नव्या फार्मा पार्कवरून सरकारच्या धोरणावर सवाल**

। माणगाव । प्रतिनिधी ।

महाराष्ट्राच्या हातात आलेली औद्योगिक संधी निसटली आणि माणगावचा बल्क ड्रग पार्क दुसऱ्या राज्यांच्या वाट्याला गेला. केंद्राच्या योजनेत महाराष्ट्राचा प्रस्ताव मंजूर न झाल्याने माणगावला मिळणारी मोठी गुंतवणूक, रोजगार आणि औद्योगिक झेप हुकली आहे. एकीकडे महाराष्ट्रातील महत्त्वाचे प्रकल्प आणि गुंतवणुकीच्या संधींबाबत प्रश्न निर्माण होत असताना, सरकार मात्र राजकीय फोडाफोडीच्या राजकारणात व्यस्त असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. त्यामुळे माणगावचा बल्क ड्रग पार्क हातातून जाणे हे केवळ प्रशासकीय अपयश आहे की, सरकारच्या औद्योगिक धोरणातील मोठी चूक, असा सवाल आता उपस्थित होत आहे.

केंद्राच्या Promotion of Bulk Drug Parks योजनेत आंध्र प्रदेश, गुजरात आणि हिमाचल प्रदेश या तीन राज्यांची निवड झाली असून, महाराष्ट्राचा प्रस्ताव या यादीत नाही. त्यामुळे माणगावला मिळू शकणारी मोठी औषधनिर्मिती उद्योगाची संधी हातातून गेली. केंद्राच्या या योजनेत मोठ्या आर्थिक सहाय्याची तरतूद असताना महाराष्ट्राला त्याचा लाभ मिळवता आला नाही, याबाबत राज्य सरकारच्या पाठपुराव्यावरही प्रश्न उपस्थित होत आहेत.

बल्क ड्रग पार्कची संधी हुकल्यानंतर राज्य सरकारने माणगाव रोहा परिसरातील दिघी पोर्ट इंडस्ट्रियल एरियात हाय-टेक फार्मास्युटिकल पार्क उभारण्याचा मार्ग स्वीकारला आहे. एमआयडीसीने रामकी इन्फ्रास्ट्रक्चरच्या MILeS City या उपकंपनीसोबत करार केला असून, सुमारे १ हजार हेक्टर क्षेत्रावर ३ हजार कोटी रुपयांचा प्रकल्प प्रस्तावित आहे. मात्र, प्रश्न एवढाच नाही की नवा प्रकल्प किती मोठा आहे. प्रश्न असा आहे की, केंद्राची संधी महाराष्ट्राच्या हातून का गेली? प्रस्तावात त्रुटी होत्या का? राज्याचा पाठपुरावा कमी पडला का? आणि माणगावला मिळू शकणारी केंद्राची मोठी मदत दुसऱ्या राज्यांकडे का वळली? या प्रश्नांची उत्तरे सरकारने जनतेसमोर मांडण्याची गरज आहे.

दिघी पोर्ट इंडस्ट्रियल एरिया मोठ्या औद्योगिक विस्ताराच्या दिशेने वाटचाल करत आहे. हजारो कोटींची गुंतवणूक आणि मोठ्या रोजगारनिर्मितीचे चित्र उभे केले जात असले, तरी माणगावच्या ग्रामस्थांच्या मनात शेती, पाणी आणि पर्यावरणाबाबत गंभीर प्रश्न आहेत. माणगाव तालुक्यातील २१ गावांतून प्रकल्पाला विरोधाची भूमिका घेतल्याचे वृत्त आहे. औद्योगिक विकास हवा; मात्र त्यासाठी शेतजमीन, जलस्रोत आणि पर्यावरणाची किंमत मोजावी लागणार असेल तर त्याचा जाब सरकारला द्यावाच लागेल.

### तरुणांना रोजगारात प्राधान्य द्या

माणगावच्या जमिनीवर हजारो कोटींचे उद्योग उभे राहणार असतील, तर स्थानिक तरुणांना रोजगारात प्राधान्य मिळणार का? पाण्याचे स्रोत सुरक्षित राहणार का? सांडपाण्याची शंभर टक्के शास्त्रीय विल्हेवाट होणार का? शेतीचे नुकसान झाल्यास जबाबदारी कोणाची? या प्रश्नांवर सरकारने स्पष्ट धोरण जाहीर करणे गरजेचे आहे.

# महापालिका भरतीतील चौकशीची मागणी

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

पनवेल महानगरपालिकेच्या सफाई कामगार पदासह इतर आस्थापनांमधील भरती प्रक्रियेत महापालिका क्षेत्राबाहेरील व्यक्तींची निवड झाल्याची माहिती समोर येत असल्याचा दावा करत भीमशक्तीचे तळोजा विभाग अध्यक्ष सुरेंद्र रघुनाथ जाधव यांनी भरती प्रक्रियेची चौकशी करण्याची मागणी केली आहे. याबाबत त्यांनी महापालिका आयुक्तांना निवेदन दिले आहे.

भरती प्रक्रिया कोणत्या नियमांनुसार करण्यात आली, याची माहिती देण्याची मागणी जाधव यांनी केली आहे. सफाई कामगार आणि इतर पदांसाठी प्रसिद्ध करण्यात आलेली जाहिरात, त्यातील पात्रतेच्या अटी, महापालिका क्षेत्रातील रहिवासी असणे आवश्यक होते का, याची माहिती देण्याची मागणी करण्यात आली आहे. या भरतीसाठी किती उमेदवारांनी अर्ज केले, त्यापैकी किती उमेदवारांची निवड झाली, निवड झालेल्या उमेदवारांच्या रहिवासी किंवा अधिवास प्रमाणपत्रांची तपासणी झाली का, तसेच निवड प्रक्रिया कोणत्या नियम, शासन निर्णय किंवा भरती नियमावलीनुसार राबविण्यात आली, याचा अहवाल मागविण्यात आला आहे. तसेच निवड समितीतील अधिकारी व सदस्यांची नावे, निवड झालेल्या उमेदवारांना देण्यात आलेले नियुक्ती आदेश आणि भरती प्रक्रियेत कोणतीही अनियमितता आढळल्यास संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात येणार, याची माहितीही जाहीर करण्याची मागणी जाधव यांनी केली आहे.

# १०० मीटरसाठी २० किमीचा फेरा

## दोन वर्षांपासून कागदी घोडे

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

दांडा-कुरवडे खाडीतील अवघे १०० मीटर अंतर जोडणारा महत्त्वाकांक्षी सागरी पूल गेल्या दोन वर्षांपासून लालफितीत अडकला आहे. पुलाअभावी नागरिक, पर्यटक, मच्छिमार, विद्यार्थी आणि व्यावसायिकांना तब्बल २० किलोमीटरचा फेरा मारावा लागत असून वेळ, पैसा आणि इंधनाची मोठी नासाडी होत आहे. तसेच नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

अमृत अनंत शिगवण यांनी राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांना निवेदन देत या प्रकल्पासाठी तातडीने पाठपुरावा करण्याची मागणी केली आहे.

दांडा-कुरवडे पूल झाल्यास श्रीवर्धन, हरिहरेश्वर, दिवेआगार आणि कुरवडे येथील पर्यटनस्थळांना थेट जोडणी मिळून स्थानिक बाजारपेठ, मच्छीमार आणि व्यावसायिकांना मोठा फायदा होऊ शकतो.

दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सर्व्हे व भौगोलिक-आर्थिक पडताळणीचा पाठपुरावा सुरू असल्याचे सांगण्यात येत असले, तरी दोन वर्षांपासून सर्व्हे आणि आश्वासनांपलीकडे काहीच झाले नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

‘आता कागदी घोडे नाचविण्याऐवजी पुलाच्या कामाचे ठोस वेळापत्रक जाहीर करावे; अन्यथा लोकप्रतिनिधींना जाब विचारत तीव्र आंदोलन छेडू, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

# रुग्णालयांतील मेडिकल साहित्य दरांची तपासणी करा

। पनवेल ग्रामीण । प्रतिनिधी ।

महानगरपालिका हद्दीतील मोठी रुग्णालये, बहुविशेषोपचार रुग्णालये, आघात उपचार केंद्रे, अतिदक्षता विभाग तसेच इतर आरोग्य आस्थापनांमध्ये रुग्णांकडून आकारण्यात येणाऱ्या वैद्यकीय वापरातील साहित्याच्या दरांची विशेष तपासणी करण्यात यावी, अशी मागणी नगरसेवक राजेंद्र शर्मा यांनी केली आहे. याबाबत त्यांनी पनवेल महानगरपालिकेचे मुख्य आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्याकडे निवेदन दिले आहे.

या निवेदनाच्या प्रती आयुक्त तुकाराम मुंढे, महापौर नितीन पाटील आणि पनवेल आयुक्त मंगेश चितळे यांना देण्यात आल्या आहेत. रुग्णालयांमध्ये वापरल्या जाणाऱ्या सलाईन संच, इंजेक्शनच्या सिरींज, कॅथेटर,



हातमोजे, कॅन्युला, शस्त्रक्रियेसाठी लागणारे साहित्य, ड्रेसिंग साहित्य, रक्त नमुना घेण्याचे साहित्य तसेच अतिदक्षता विभागात वापरल्या जाणाऱ्या विविध वैद्यकीय वस्तूंची प्रत्यक्ष खरेदी किंमत, छापील कमाल किरकोळ किंमत आणि रुग्णाच्या अंतिम बिलामध्ये आकारण्यात आलेली किंमत यांची तुलनात्मक तपासणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

विशेषतः कळंबोली येथील व्हाइट लोटस, खारघर येथील मेडीकव्हर रुग्णालयासह पनवेल महापालिका हद्दीतील प्रमुख रुग्णालयांची नमुना पद्धतीने तपासणी करण्यात यावी, असे निवेदनात म्हटले आहे. तपासणी करताना मागील किमान १२ महिन्यांतील निवडक वैद्यकीय साहित्याची खरेदी बिले, खरेदी आदेश, साठा नोंदवही, खरेदी नोंदवही आणि संबंधित रुग्णांची अंतिम बिले तपासण्यात यावीत. प्रत्येक वस्तूचे नाव, कंपनी, खरेदी किंमत, छापील कमाल किंमत, रुग्णाकडून आकारलेली किंमत आणि आढळलेली तफावत यांचा स्वतंत्र अहवाल तयार करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

एखाद्या वस्तूच्या खरेदी किमतीच्या तुलनेत रुग्णाकडून आकारण्यात आलेल्या दरात मोठी तफावत आढळल्यास संबंधित रुग्णालयाकडून लेखी स्पष्टीकरण घेण्यात यावे. तसेच चुकीचे बिलिंग, अनधिकृत आकारणी किंवा लागू नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधित सक्षम प्राधिकरणाच्या अधिकारक्षेत्रानुसार कारवाई करावी, अशी मागणी शर्मा यांनी केली आहे.

> या मागणीचा उद्देश कोणत्याही विशिष्ट रुग्णालयाला लक्ष्य करणे नसून रुग्णांच्या हिताचे संरक्षण, वैद्यकीय बिलिंगमध्ये पारदर्शकता आणि लागू नियमांचे पालन सुनिश्चित करणे हा आहे.
> – राजेंद्र शर्मा, नगरसेवक, कळंबोली

महापालिकेच्या अधिकारक्षेत्राबाहेरील बाबी आढळल्यास संबंधित कागदपत्रे अन्न व औषध प्रशासन, राष्ट्रीय औषध किंमत नियंत्रण प्राधिकरण, वैधमापनशास्त्र विभाग किंवा इतर सक्षम प्राधिकरणांकडे पाठवावीत, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# गणेश विसर्जनासाठी पनवेलमध्ये वाहतुकीत बदल

। पनवेल ग्रामीण । प्रतिनिधी ।

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणेशमूर्ती विसर्जनावेळी होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी नवी मुंबई पोलीस वाहतूक शाखेकडून पनवेल व आदई तलाव परिसरातील वाहतुकीत बदल करण्यात आले आहेत. अनंत चतुर्दशी तसेच गौरी-गणपती विसर्जन आणि आगमनाच्या कालावधीत काही मार्गांवर प्रवेशबंदी करण्यात आली आहे.

अनंत चतुर्दशीच्या विसर्जनासाठी २५ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजल्यापासून २६



सप्टेंबर रोजी सकाळी ६ वाजेपर्यंत वाहतूक नियंत्रण लागू राहणार आहे. खांदा कॉलनी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून रेल्वे पूल चढून आदई तलावाच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावर सर्व वाहनांना प्रवेशबंदी राहणार आहे. मात्र गणेशमूर्ती विसर्जनासाठी जाणाऱ्या वाहनांना यातून वगळण्यात आले आहे. या मार्गावरील वाहनांनी खांदा कॉलनी, नवीन पनवेल सिग्नल, गार्डन हॉटेल सिग्नल आणि नवीन पनवेल पूलमार्गे इच्छित स्थळी जावे.

तसेच आदई सर्कलकडून आदई तलावाच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांनाही प्रवेशबंदी करण्यात आली आहे. या वाहनांनी आदई सर्कलवरून सरळ शिवा कॉम्प्लेक्स आणि एचडीएफसी सर्कलमार्गे पुढे जावे.

दरम्यान, २८ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजल्यापासून ३० सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत गौरी-गणपती विसर्जन व आगमनासाठी वाहतुकीत बदल करण्यात आले आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज चौक ते कर्नाळा भाजी मार्केट सर्कल तसेच कर्नाळा भाजी मार्केट सर्कल ते छत्रपती शिवाजी महाराज चौक या मार्गांवर प्रवेशबंदी राहणार आहे. तसेच कर्नाळा सर्कल ते भाऊराव पाटील चौक या मार्गावरही वाहतुकीस बंदी राहणार आहे.

या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडे जाणाऱ्या वाहनांनी पंचरत्न चौक मार्गाचा वापर करावा असे वाहतूक शाखेने स्पष्ट केले आहे.

> पोलीस वाहने, शासकीय वाहने तसेच अत्यावश्यक सेवेतील वाहनांना या वाहतूक निर्बंधातून वगळण्यात आले आहे. गणेशोत्सव काळात नागरिकांनी वाहतूक पोलिसांच्या सूचनांचे पालन करून पर्यायी मार्गांचा वापर करावा
> – डॉ. राहुल खाडे, पोलीस उपआयुक्त, वाहतूक, नवी मुंबई

## रोटरी क्लब रोहातर्फे रक्तदान शिबीर

**रोहा** : शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या रोटरी क्लब रोहा सेंट्रल, जय गणेश मित्र मंडळ भुवनेश्वर यांच्या संयुक्त विद्यमाने व जिल्हा रक्तसंक्रमण केंद्र रायगड यांच्या सहकार्यातून बुधवारी (दि.२३) रोजी रक्तदान शिबीर संपन्न झाले. यावेळी लक्ष्मण मोरे, नितीन माने, प्रवीण शिर्के, मयूर दिवेकर, राकेश कागडा, विजय दिवकर,निखिल दाते, रामा नाकती, रुपेश पाटील, दिलीप देशमुख, दिपक सिंग, आदी उपस्थित होते.

## घरच्या भाकरीचा स्वयंपाकघरातून दुकानापर्यंतचा प्रवास

## ‘भाकरी सेंटर’मधून इतर महिलांनाही रोजगार

# महिलांच्या उद्योजकतेला नवी दिशा

। पनवेल ग्रामीण । प्रतिनिधी ।

घरच्या स्वयंपाकघरात रोज बनणारी भाकरी आता महिलांच्या उद्योजकतेचे माध्यम बनली आहे. बदलती जीवनशैली, कामाची धावपळ आणि स्वयंपाकासाठी कमी मिळणारा वेळ यामुळे तयार भाकरीला मागणी वाढत आहे. या मागणीची संधी साधत पनवेल महानगरपालिका हद्दीत महिलांनी घराबाहेर दुकाने सुरू करून ‘भाकरी सेंटर’ नावाने व्यवसाय उभे केले आहेत.

स्वतःचा रोजगार निर्माण करण्याबरोबरच या व्यवसायातून इतर महिलांनाही काम देत त्यांना उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून



दिले जात आहे.

भाकरी बनवण्याचे पारंपरिक कौशल्य व्यवसायात रूपांतरित करत महिलांनी छोट्या दुकानातून या व्यवसायाला सुरुवात केली. ग्राहकांची मागणी वाढत गेल्यानंतर व्यवसायाचा विस्तार झाला आणि अधिक महिलांना काम मिळू लागले. त्यामुळे एका महिलेने सुरू केलेल्या व्यवसायातून आता परिसरातील अनेक महिलांच्या हाताला रोजगार मिळत आहे.

पनवेल, नवीन पनवेल, कळंबोली, कामोठे, खारघर, तळोजा आदी भागांत भाकरी सेंटर सुरू झाल्याचे दिसून येत आहे. येथे ज्वारी, बाजरी, नाचणी, तांदूळ, मका तसेच विविध धान्यांच्या भाकऱ्या तयार केल्या जातात. ग्राहकांच्या मागणीनुसार ताज्या भाकऱ्या तयार करून दिल्या जातात. या सेंटरमधून तयार होणाऱ्या भाकऱ्यांची विक्री केवळ दुकानातील ग्राहकांपुरती मर्यादित नाही. घरोघरी तसेच हॉटेल आणि ढाब्यांमध्येही भाकऱ्यांचा नियमित पुरवठा केला जात आहे.

मोठ्या ऑर्डरसाठी महिलांचा गट एकत्रितपणे काम करत असल्याने मोठ्या प्रमाणात भाकऱ्या तयार करून वेळेत पुरवठा केला जात आहे. पनवेलमध्ये वाढणारी ‘भाकरी सेंटर’ ही केवळ तयार भाकरी विक्रीची दुकाने राहिलेली नसून महिलांनी कौशल्य, मेहनत आणि व्यवसायाची सांगड घालून उभे केलेले छोटे उद्योग म्हणून पुढे येत आहेत.

### लग्नसराईत मोठी मागणी

लग्नसराईच्या काळात भाकरीच्या व्यवसायाला विशेष चालना मिळत आहे. लग्नसमारंभ, साखरपुडा, धार्मिक कार्यक्रम आणि इतर कौटुंबिक कार्यक्रमांसाठी मोठ्या प्रमाणात भाकऱ्यांच्या ऑर्डर मिळत आहेत. त्यामुळे ङ्गभाकरी सेंटरफ चालवणाऱ्या महिलांसाठी लग्नसराईचा काळ महत्त्वाचा ठरत आहे.

> चुलीवर तयार होणारी भाकरी आता दुकानातून ग्राहकांच्या ताटापर्यंत पोहोचत आहे. महिलांनी आपल्या पारंपरिक कौशल्याला व्यवसायाची जोड देत स्वतःचे उत्पन्नाचे साधन उभे केले आहे. त्याचबरोबर व्यवसाय वाढल्यानंतर इतर महिलांनाही काम देण्यात येत असल्याने महिला उद्योजकतेला चालना मिळत आहे .
> –नीलम चौधरी

# जुगारावर कारवाई; सव्वा लाख रुपये जप्त

| पनवेल | प्रतिनिधी |

गुन्हे शाखा कक्ष दोनने जुगारावर कारवाई करत ११ जणांवर कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

अमरांते बिल्डिंग, सेक्टर ९, प्लॉट नंबर चार ,बिल्डिंग नंबर पाच, कळंबोली या ठिकाणी जुगार खेळत असल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला. यावेळी अण्णा दादासो सपकाळ (कळंबोली), केशव लक्ष्मण कदम (चेंबूर पूर्व), पाराजी सुदाम वराळ (रोडपाली), किरण पुंडलिक दरे (पडघे), अनिकेत मधुकर महाडिक (वाशी नाका), कादिर बाबू मुजावर (पनवेल), मयूर दत्तात्रय बेल्हेकर (कळंबोली), अरुण सुबराव माने (कामोठे), कृष्णा भीमशंकर कोळी (सोलापूर), दिगंबर हरिप्रसाद सिंग (उत्तर प्रदेश), रुपेश श्रीकांत शेडगे (कळंबोली) यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला. पोलिसांनी या ठिकाणाहून एक लाख २५ हजार रुपये आणि जुगाराचे साहित्य जप्त केले.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस व संबंधितांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आम्ही आमचे अशील विषम हासू कुपलानी २. शैलेश मनमोहनदास मर्चड ३. चंदु भगवानदास मुलचंदानी ४. नारी भगवानदास मुलचंदानी ५ . निशा प्रकाश मुलचंदानी ६. विशाल प्रकाश मुलचंदानी यांच्या सुचनेवरून व सांगण्यावरून खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेचे (ज्यास पुढे सदर मिळकत असे संबोधले आहे) मालकी हक्क, अधिकार, शीर्षक (Title) व हितसंबंधाची कायदेशीर तपासणी करत आहोत.

सदर मिळकतीवर किंवा तिच्या कोणत्याही भागावर कोणत्याही व्यक्ति, हिंदू अविभक्त कुटूंब, कंपनी, बँक, वित्तीय संस्था, बिगर बॅकींग वित्तीय संस्था, संस्था, कर्जदार, शासन किंवा स्थानिक प्राधिकरण, अथवा इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बक्षीसपत्र, बोजा, गहाण, लीज, भाडेपट्टा, ताबा, कुलमुखत्यापत्र, खरेदीखत, करार, सामजस्य करार, अदलाबदल, भागीदारी, कौटुंबिक व्यवस्था/वाटणी, वाद/न्यायालयीन खटला (lis pendens) आरक्षण, संपादन, अधिग्रहण प्रक्रिया, देखभाल हक्क, वारसाहक्क, रस्ता हक्क, हिस्सा, पोट भाडेकरू, ताबा हक्क, मृत्युपत्र, ट्रस्ट अथवा कोणत्याही न्यायालय/प्राधिकरणाच्या आदेशान्वये किंवा करारावदारे कोणताही दावा, आक्षेप, अधिकार, किंवा मालकी हक्काच्या कागदपत्रांचा ताबा असल्यास अशा सर्व व्यक्ति व संस्थांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून २१ दिवसांच्या आत आपल्या दाव्याच्या/आक्षेपाच्या समर्थनार्थ आवश्यक त्या मुळ अथवा साक्षांकित कागदोपत्री पुराव्यांसह खाली दिलेल्या पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे.

जर वरील मुदतीत कोणाचेही आक्षेप वा दावे प्राप्त न झाल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क, अधिकार वा दावा नाही किंवा असल्यास तो सोडून (Waive) दिला आहे असे मानले जाईल. त्यानंतर आमच्या अशिलांचे सदर जमिनीवरील मालकी हक्क व शीर्षक पुर्णपणे स्वच्छ, निर्वेध व विक्रीयोग्य (Clear, Marketable & free from encumbrances) आहे असे समजून पुढील व्यवहार पुर्ण केला जाईल. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या कोणत्याही दाव्यांची अथवा आक्षेपांची दखल घेतली जाणार नाही .

मिळकतीचा तपशिल (SCHEDULE OF THE PROPERTY)

मौजे माणगाव तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड, ग्रुप ग्रामपंचायत माणगाव हद्दीतील जमीन मिळकत तिचे वर्णन खालीलप्रमाणे

| सर्व्हे नंबर / हिस्सा नंबर. | जुना सर्व्हे नंबर./ हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.प्र. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| २१/२/अ | २४/२/अ | ०.२०.०० | ०.०७ |

ठिकाण : कर्जत
दिनांक : २५.०९.२०२६

**ॲड. उमेश आनंद भगत**
पत्ता मु. पो. चिंचवळी ता. कर्जत
जि. रायगड
ई मेल : ubhagat79@gmail.com
मो. नं. ९०४९४८६८०५

## महाराष्ट्र शासन

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड अलिबाग यांचे कार्यालय

कॉंग्रेस भुवन ट्रस्ट, तळमजला, महर्षी कर्वे, अलिबाग जि. रायगड दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०१३ ई-मेलःddr_rgd@rediffmail.com

जा.क्र.जिउनि/गृह/मोफा क्र.११/मा.अभि./जाहीर नोटीस १७८९/सन २०२६ दिनांक :- २२/०९/२०२६

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बाबत) जाहीर नोटीस**

चैतन्य सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, ठिकरूळ नाका, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी मेसर्स कोळेश्वर कन्स्ट्रक्शन कंपनी पनवेल तर्फे श्री विश्वास गजानन पोटे, रा. निर्मल सदन, गोखले हॉल जवळ, पनवेल, ता. पनवेल, जि.रायगड यांचे विरुध्द महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम ११(३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानिव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करुन मिळणे बाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**

रायगड जिल्ह्यातील ता. अलिबाग, अलिबाग येथील नगर भूमापन क्रमांक - ५४३, ५४१/१, ५४१/२, ५४१/३, ५४१/४,, ५४१/५, ५४१/६. याचे एकूण क्षेत्र १०७१.१० चौ.मी.

अर्जदाराचे अर्जाबाबत प्रतिवादी यांना नोटीस पाठविण्यात येवून सदरची नोटीस त्यांना प्राप्त झालेली आहे. तरीही प्रतिवादी यांचेवतीने किंवा ते स्वतः सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. सबब अर्जदाराने जाहीर पेपर नोटीस मागणी केली आहे. गैरअर्जदाराचे म्हणणे दाखल करणेसाठी अंतीम संधी देण्यांत येत असून त्यांनी वरील मिळकतीबाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावीत कार्यवाहीबाबतचे म्हणणे दिनांक ०९/१०/२०१६ रोजी दुपारी ११.३० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांची काहीही हरकत नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक- २२/०९/२०२६

सही/-
**(त.स.पाटील)**
सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था, रायगड अलिबाग

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग

**विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड**
**फॉर्म झेड**
**(नियम १०७ चा उपनियम १९ ( डी ११ )**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सूचना.**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक लि, अलिबाग शाखा माणगाव चे विशेष वसूली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णीत ऋणको यांना म्हणजेच कर्जदार व हमीदारांना मागणी नोटिस दिनांक २८/११/२०२३ रोजी निर्गमित केली. व त्या पाठोपाठ दिनांक ०८/०७/२०२६ रोजी जप्ती सूचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार सौ.प्राणिता विवेक मांजरेकर यांच्यासह इतर न्यायनिर्णीत ऋणको यांना सूचनेत नमूद केलेली दिनांक ३०/०६/२०२६ पर्यंतची रक्कम रुपये ५८,१३,६९०/- व दिनांक ०१/०७/२०२६ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची परतफेड सदरहू सूचना प्राप्त झाल्यानंतर वसुलीच्या तारखेपर्यंत त्यावरील १३ टक्के व्याज दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णीत ऋणको रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याणे निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सूचना जारी करून येथे खालील माहिती झालेली मिळकत जप्त केलेली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोणी संपूर्ण रकमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्व सामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ चा उपनियम (११ डी-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून गाव सुरव तर्फे निजामपूर, सिटी सर्व्हे माणगाव तालुका माणगाव, जि. रायगड येथील खालील मिळकतींचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये.

आणि सदर मिळकतीशी कोणत्याही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक लि अलिबाग शाखा माणगावच्या दिनांक ३१/०७/२०२६ रोजी येणे रक्कम रुपये ५८,१३,६९०/- व त्यावरील दिनांक ०१/०७/२०२६ पासूनचा व्याजाचा आणि इतर शुल्काच्या अधीन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- सौ. प्राणिता विवेक मांजरेकर**

| अ.क्र | गावाचे नाव | मिळकत क्रमांक | क्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | सुरव तर्फे निजामपूर ता.माणगाव | ४६८ | ०.९५.०० |

स्थळ : माणगाव.
दिनांक : २४/०९/२०२६

सही/-
**श्री. एस.जी.शिर्के**
**वसुली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड द्वारा**
**रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक लि.अलिबाग**

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल सौ. मनिषा दिपक अग्रवाल यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक १. श्री. शामजी कानजी पारसिया उर्फ पटेल व २. श्री. जोगेश हिरजी पारसिया यांचे कडून विकत घेण्याचे ठरवीले आहे.

**मौजे. बार्डी, ता. कर्जत, जि. रायगड येथिल मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ४६ | ७ | ०-१४-५० | १-६२ |
| ४७ | ६ | ०-१६-९० | १-०६ |
| ४७ | ७ | ०-१०-४० | ०-६१ |
| ४७ | ८ | ०-११-०० | ०-६४ |
| ४७ | १० | ०-०७-३० | ०-१६ |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दि. २५/०९/२०२६.

**ॲड. नरेश रामदास आहीर.**
पत्ता - शॉप नं.१२, शिवगंगा
अपार्टमेंन्ट, ब्राम्हणआळी, नेरळ
ता. कर्जत, जि. रायगड- ४१०१०१.
मो.-९३२५०६००३७/९०११२९२९८७.

## जाहीर सूचना

माझे पक्षकार नामे हिफ्जुर रहेमान शौकत अली नझिर रा. मेंदडी, ता. म्हसळा, जि. रायगड यांनी दिलेल्या अधिकार व माहिती व कागदपत्रानुसार सर्व सदस्य अंजुमन इस्लाम जंजीरा मुरूड, जि. रायगड नोंदणी क्रमांक बी-५७ यांना सूचित करण्यात येते की, सदरहू संस्थेचा वाद मा. महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण औरंगाबाद, छत्रपती संभाजीनगर येथे प्रबंलित आहे मा. उच्च न्यायालय मुंबई व मा. वक्फ न्यायाधिकरण यांनी माझे पक्षकारांना व्यवस्थापन करण्याची परवानगी आदेश दि. ०४.११.२०२५ अन्वये देण्यात आलेली आहे, दोन्ही पक्षकारांना आहे तशी स्थीती ठेवण्याबाबत निर्देश दिलेले आहे, तसेच तंतोतंत स्थगिती आदेशाचे पालन करण्याचे मा. उच्च न्यायालय मुंबई येथील आदेशान्वये निर्देशित केलेले आहे, सध्या प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. माझे पक्षकाराला मिळालेल्या माहिती नुसार निसार अहेमद अली बिरवाडकर हे चूकीचे माहिती देवुन व्यवस्थापनात अडथळा, गैरसमज संभ्रम निर्माण करीत आहे व संस्थेमार्फत व्यवस्थापनात असलेल्या शाळेच्या मुख्याधिपकांना धमकीवजा पत्र निर्गमित करीत आहे. सदरहू निसार अहेमद अली बिरवाडकर यांचे हे कार्य मा. उच्च न्यायालय मुंबई यांचे आदेशाची अवमानना आहे व उल्लंघण आहे. तरी निसार अहेमद अली बिरवाडकर यांनी संस्थेमार्फत दिलेल्या निर्देश, आदेश व पत्राची कोणत्याही प्रकारे दखल घेण्यात येवु नये, तसेच संस्थेच्या अधिपत्याखाली असलेल्या अधिकारी, शिक्षक व इतर कर्मचारी वर्ग यांनी निसार अहेमद अली बिरवाडकर यांच्या निर्देशानुसार कामकाज करू नये, माझे पक्षकारामार्फत संबधीतांवर अवमाननाची कार्यवाही करण्यात येईल, तसेच योग्य ते फौजदारी, दिवाणी कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी. माझे पक्षकार हे अंजुमन इस्लाम जंजीरा मुरूडचे कार्यरत जनरल सेक्रेटरी, विश्वस्त या अधिकाराने सदरहू जाहीर सूचना प्रकाशित करीत आहे.

करीता हे जाहीर सूचना.

मार्फत

sd/-
**Ad.Pathan Amjad S. Khan**
Advocate B. A., LL.B
Office: Near Al- Karim Hotel,
Champa Chowk, Roshan Gate Road,
Aurangabad. 431001.
adv_amjadpathan@yahoo.com
09370425569/ 9028031456

श्री.थोरात भाऊसाहेब लिंबाजी
प्लॉट ११, सर्व्हे ३८/२/२,
श्रीराम सहकारी गृहरचना संस्था,
शंकरनगर, खराडी, पुणे - ४११ ०१४

**सुधागड एज्युकेशन सोसायटी पाली, ता.सुधागड, जिल्हा-रायगड संस्थेच्या संचालक मंडळ निवडणूक २०२६ ते २०३१ साठीचा निवडणूक कार्यक्रमाची घोषणा.**

मी श्री.थोरात भाऊसाहेब लिंबाजी असे घोषीत करतो की, सुधागड एज्युकेशन सोसायटी पाली, ता.सुधागड जि.रायगड या शैक्षणिक संस्थेची संचालक मंडळाची पाच वर्षाकरीताची निवडणूक घेणेसाठी संस्थेने माझी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे. करीता संस्थेच्या नियमावली व घटनेनुसार तसेच मा.सहा.धर्मादाय आयुक्त, अलिबाग यांचे कडील वेळोवेळीच्या मार्गदर्शनानुसार मी खालील तपशिलाप्रमाणे निवडणूक कार्यक्रमाची घोषणा याद्वारे करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | संस्थेच्या दिनांक ३१/०८/२०२६ पर्यंतच्या सर्व संवर्गातील सभासदांच्या मतदार याद्या प्रसिद्ध करणे. | दि.२६/०९/२०२६ |
| २ | मतदार याद्यांमधील नावातील, सुचनांच्या हरकतींचा विचार करून अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करणे. | दि.३०/०९/२०२६ |
| ३ | प्रत्येक संवर्गातील निवडंणूकी करीता उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र स्विकारणे (सुट्या वगळून) | दि.०१/१०/२०२६ ते ०५/१०/२०२६ ते सकाळी ११.०० पासून दुपारी ३.०० वाजेपर्यंत |
| ४ | प्राप्त नामनिर्देशन पत्रांची छाननी करणे व उमेदवारी यादी प्रसिद्ध करणे | दि.०६/१०/२०२६ रोजी सकाळी ११.०० पासून दुपारी ३.०० वाजेपर्यंत. |
| ५ | नामनिर्देशन पत्र/उमेदवारी अर्ज माघार घेणे | दिनांक ०७/१०/२०२६ दुपारी ३.०० पर्यंत |
| ६ | निवडणूकीकरीता प्रत्येक संवर्गातील उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध करणे. | दिनांक ०८/१०/२०२६ |
| ७ | प्रत्येक संवर्गातील संचालकसाठी निवडणूक प्रक्रियेनुसार मतदान घेणे. | दि.१८/१०/२०२६ सकाळी १०.०० ते ५.०० |
| ८ | मतमोजणी व अंतिम निकाल घोषित करणे. | दि.१८/१०/२०२६ रोजी संध्या ६.०० ते पुढे |

वरील कार्यक्रमातील शासकीय सुट्यांचे दिवस वगळून कार्यालय चालु राहील.

वरील प्रमाणे संचालक मंडळाची निवडणूक प्रक्रिया संस्था नियमावलीतील मुद्दा क्र.१६ व १७ नुसार करण्यात येईल. (निवडणुकीसाठी येताना ओळखपत्र आणणे आवश्यक आहे. निवडणुकीचा फॉर्म भरताना रू.१०००/- (रूपये एक हजार मात्र) अनामत रक्कम घेतली जाईल.)

स्थळ : पाली
दिनांक : २२/०९/२०२६

**श्री.थोरात भाऊसाहेब लिंबाजी**
**निवडणूक निर्णय अधिकारी**

## जाहीर नोटीस

दिवाणी अपील क्र.२४४/२०१३
नि. ९५/ड

**अलिबाग येथील मे. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड यांचे कोर्टात**

नारायण सिताराम मोकल तर्फे वारस — अपेलंट
विरूद्ध
मीना पोसु धुमाळ, वगैरे — रेस्पॉंडंटस्

प्रति,
रेस्पॉंडंट क्र. ८/२/१ श्री. कर्तव्य अनिल मोकल,
रेस्पॉंडंट क्र. ८/२/२ श्री. स्वागत अनिल मोकल,
रेस्पॉंडंट क्र. ८/२/३ श्रीमती किमया अनिल मोकल,
रेस्पॉंडंट क्र. ८/३/२ श्री. गौरव मोहन मोकल,
रेस्पॉंडंट क्र. ८/३/३ श्रीमती कामिनी जयेश ठाकुर,
रेस्पॉंडंट क्र. ८/३/४ श्रीमती भाग्यश्री सुभाष तांडेल,
सर्व रा. चिंचवली, पो. नारंगी, ता.अलिबाग, जि.रायगड.

ज्याअर्थी नारायण सिताराम मोकल तर्फे वारस श्री.विवेकानंद नारायण मोकल यांनी या न्यायालयात वर नमुद दिवाणी अपील दाखल केले असुन त्या कामी तुमचे वर नमुद पत्त्यावर मे. कोर्टामार्फत अपीलाची नोटीस पाठवली असता तुम्ही सदरील ठिकाणी उपस्थित नसल्याचे लिहुन आल्याने तुम्हास या जाहीर नोटीसद्वारे कळवण्यात येते की, तुम्ही स्वतः अगर तुमचे वकील, प्रतिनिधी यांचेमार्फत दिनांक २१/१०/२०२६ रोजी या न्यायालयात सकाळी १०.३० वाजता हजर व्हावे. तुम्ही गैरहजर राहील्यास सदरील अपीलाचे कामी पुढील योग्य ते आदेश तुमच्या अनुपस्थितीत करण्यात येतील हे कळावे.

आज दिनांक २२/०९/२६ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी ही नोटीस दिली.

सही /-
**कनिष्ठ लिपिक,**
**जिल्हा न्यायालय,**
**रायगड-अलिबाग**

सही/-
**अधिक्षक**
**जिल्हा न्यायालय,**
**रायगड-अलिबाग**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, खाली नमूद केलेल्या जमिन मालक यांनी त्यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खाली वर्णन केलेली मिळकत आमचे पक्षकार यांना विकत देण्याचे ठरविले असून त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - वैजनाथ, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

| जमीन मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| राजीव दुर्गादास सरीन निरा राजीव सरीन | ३१ | १३ | ०-२२-०० | ०-२३ |
| | ३१ | ३/अ | ०-२१-०० | ०-१७ |
| | ४३ | १/क/१ | ०-१४-१० ०-०५-९० ०-२०-०० | ०-७३ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ, वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिएन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्कहितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत. असे गृहीत धरून आवश्यक त्या बाबींची पूर्तता करून आमचे पक्षकार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

कर्जत
तारीख : २४/०९/२०२६
मोबाईल: ९८२२९११२०५

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**श्री. ए.पी.डिमेलो**
मु.भिसेगाव, ता.कर्जत, जि.रायगड

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग

**विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड**
**फॉर्म झेड**
**(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सूचना.**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक लि, अलिबाग शाखा माणगाव चे विशेष वसूली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णीत ऋणको यांना म्हणजेच कर्जदार व हमीदारांना मागणी नोटिस दिनांक २८/११/२०२३ रोजी निर्गमित केली. व त्या पाठोपाठ दिनांक ०८/०७/२०२६ रोजी जप्ती सूचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार सौ.प्राणिता विवेक मांजरेकर यांच्यासह इतर न्यायनिर्णीत ऋणको यांना सूचनेत नमूद केलेली दिनांक ३०/०६/२०२६ पर्यंतची रक्कम रुपये ५८,१३,६९०/- व दिनांक ०१/०७/२०२६ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची परतफेड सदरहू सूचना प्राप्त झाल्यानंतर वसुलीच्या तारखेपर्यंत त्यावरील १३ टक्के व्याज दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णीत ऋणको रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याणे निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सूचना जारी करून येथे खालील माहिती झालेली मिळकत जप्त केलेली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोणी संपूर्ण रकमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्व सामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ चा उपनियम (११ डी-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून गाव कोशिंबळे तर्फे तळे, सिटी सर्व्हे माणगाव तालुका माणगाव, जि. रायगड येथील खालील मिळकतींचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये.

आणि सदर मिळकतीशी कोणत्याही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक लि अलिबाग शाखा माणगावच्या दिनांक ३१/०७/२०२६ रोजी येणे रक्कम रुपये ५८,१३,६९०/- व त्यावरील दिनांक ०१/०७/२०२६ पासूनचा व्याजाचा आणि इतर शुल्काच्या अधीन राहील.

**स्थावर मालमतेचे वर्णन**
**कर्जदार :- सौ. प्राणिता विवेक मांजरेकर**

गाव कोशिंबळे तर्फे तळे, सिटी सर्व्हे माणगाव तालुका माणगाव, जि. रायगड येथील मिळकतीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| मिळकतदाराचे नाव | मिळकत क्र | मिळकतीचा तपशील |
|---|---|---|
| तारणदार रमेश मनोहर देशमुख (मयत) यांचे वारसदार | ४९ | क्षेत्रफळ ०.५९.२० आर. आकार रु ८.०० |
| १) सौ.प्राणिता विवेक मांजरेकर | ५०/५ | क्षेत्रफळ ०.१७.८० आर. आकार रु १.०० |
| २) श्रीम.अंजला रमेश देशमुख, | ५१/२ | क्षेत्रफळ ०.०३.०० आर. आकार रु ०.३४ |
| ३) श्रीमती.अश्विनी सचिन खळे | ६०/१ | क्षेत्रफळ ०.१५.७० आर. आकार रु ०.८१ |
| ४) श्रीमती.चेतना अमित देशमुख | ६४/१० | क्षेत्रफळ ०.०६.०० आर. आकार रु ०.६६ |
| | ६४/१३ | क्षेत्रफळ ०.०५.०० आर. आकार रु. ०.४५ |
| | ८७/३/ब/२ | बिनशेती जमीन क्षेत्रफळ ४.७०.००. आर. आकार रु ४७.०० |
| | ९४/२/ब | क्षेत्रफळ ०.०३.७० आर. आकार रु ०.०२ |

स्थळ : माणगाव.
दिनांक : २४/०९/२०२६

सही/-
**श्री. एस.जी.शिर्के**
**वसुली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड द्वारा**
**रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक लि.अलिबाग**

अर्जदार तर्फे वकिल ॲड.अतुल अरविंद चौगुले

**श्रीवर्धन येथील मा.दिवाणी न्यायधिश (क.स्तर) सो., यांचे कोर्टात**

दिवाणी चौ.अर्ज क्र.४१/२०२६
नि.७/ड
ने.ता.०६/११/२०२६

## जाहीर नोटीस

१. श्री. प्रकाश सदानंद चौले
वय-३१ वर्षे, धंदा-नोकरी — अर्जदार
२. श्रीम.स्वाती सदानंद चौले
वय-५० वर्षे, धंदा-गृहिणी
अर्जदार क्र. १ ते २
रा.दांडा, श्रीवर्धन, ता.श्रीवर्धन, जि.रायगड
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

सर्व जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे-दांडा, श्रीवर्धन, ता.श्रीवर्धन, जि.रायगड येथील मयत कै.कमळ्या लाया चेवले ऊर्फ चौले यांचे दिनांक १०/०९/१९५० रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात मयताचे वाली वारस अर्जदार क्र. १ व २ हे आहेत. मयत कै.कमळ्या लाया चेवले ऊर्फ चौले यांचा मु.दांडा, श्रीवर्धन, ता.श्रीवर्धन, जि.रायगड येथे मृत्यू झालेला आहे. तरी त्यांच्या निधानांतर त्याच्या पश्चात अर्जदार यांचे नाव शासकीय, निमशासकीय, बँका, पतपेढया, पतसंस्था दाखल करणे करिता अर्जदार क्र.१ व २ हे कायदेशिर वारस असल्याबाबतचा सक्षम न्यायालयाचा वारस दाखला आणण्यास सांगितले. अर्जदार यांना वारस दाखल्याची आवश्यकता असल्याने वारस दाखला मिळण्याकरीता मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे. सदरचा वारस दाखला अर्जदारांना देण्याबाबत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत लेखी हरकत घेण्यात यावी. अन्यथा मागाहून येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नसून अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल.

आज दिनांक २२/०९/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी जाहिर नोटीस प्रसिद्ध केली.

श्रीवर्धन
ता. २२/०९/२०२६

सही/-
**क. लिपीक**
**न्यायालय, श्रीवर्धन**

सही /-
**सहाय्यक अधिक्षक, दिवाणी**
**दिवाणी न्यायालय, श्रीवर्धन**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे-वडवली, ता. कर्जत जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| श्री.नरेश राजाराम राऊत | ३१ | ९ | ०-०६-१० | ० | ३४ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४,
पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट,
कर्जत नगरपालीका कार्यालयाशेजारी,
ता.कर्जत, जि.रायगड.४१०२०१

सही /-
**ॲड. निलेश दामु मुंढे**
दिनांक :- २५/०९/२०२६
मो. नं. ८४४६८६९६७१
ई मेल: nileshmundhe029@gmail.com

## कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

**(म्हाडाचा घटक)**
**जाहीर सूचना**

कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळामार्फत खोपोली (हाळ बुद्रुक) येथील योजनेअंतर्गत खुल्या भूखंडाच्या विक्री करीता सोडत काढण्यात आली होती.

सदर जाहीर सूचनेद्वारे सूचित करण्यात येते कि, खाली नमूद भूखंड क्रमांकाच्या यशस्वी लाभार्थ्यांनी म्हाडा कार्यालयाशी संपर्क साधावा.

**अत्यल्प उत्पन्न गट भूखंड क्र.** - ७१, ८९, ११२, ११८, १२४, १३७, १४९, २५९, १५२, ६९, ७७, ९७, ९८, ९९, १०९, ११७, १२२, १२५, १२८, १२९, १३३, १३५, १३९, १४४, १४५, १५०, १५१, १५७, १५८, १५९, २६०, २६३, २६४, २६५, २६६, २६७, २६८, २६९, **एकूण ३८ भूखंड**

**अल्प उत्पन्न गट भूखंड क्र.** - ५४, १९३, १९४, १९९, २०१, २१०, २७८, ३०२, ३२३, ३१७, ३६१, ३७२, ३७७, ३७९, ३८७, ४४, १८७, २७३, ३१४, ३४४, ३६८, ३२, १९१, २०७, २३४, २५३, ३११, ३२०, ३२६, ३६६, ३८६, ३९०, ३९२- **एकूण ३३ भूखंड**

**मध्यम उत्पन्न गट भूखंड क्र.** २२, १८२, ३५९, १०, ०४, २० एकूण ०६ भूखंड

**व्यापारी भूखंड** C-२-A, C-२-B- **एकूण ०२ भूखंड**

मौजे खोपोली (हाळ बुद्रुक), ता.खालापूर, जि.रायगड येथील भूखंड योजनेतील वरीलप्रमाणे भूखंड क्रमांकाचे लाभार्थ्यांनी त्यांचेकडे असलेल्या सर्व कागदपत्रांसह, मुख्य अधिकारी/कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, कक्ष क्र १६८, पोट मजला, म्हाडा कार्यालय, कलानगर, वांद्रे (पू) यांचे कार्यालयातील संबंधित लिपिक यांचेशी सदर जाहीर सूचनेच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत तात्काळ संपर्क साधावा. अन्यथा या कार्यालयाकडील उपलब्ध अभिलेखानुसार लाभार्थीची नोंद घेवून उर्वरित भूखंडाच्या विल्हेवाटीबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल. तद्नंतर भूखंडाची मालकी/भाडेपट्ट्याबाबत कुठलाही दावा ग्राह्य धरण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

सही/-
**(डॉ. विशाल राठोड)**
**मुख्य अधिकारी.**
**कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ**

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमिन मिळकत आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्याप्रमाणे आमचे अशिल व मिळकतीचे विद्यमान मालक यांच्यामध्ये करारनामा करण्यात आलेला आहे मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर | आकार रू.पैसे | विद्यमान मालक |
|---|---|---|---|---|
| वाडगांव ता.अलिबाग, | १७७ | ०-१७-५० पो.ख. ०-०३-०० एकुण क्षेत्र ०-२०-५० | ५.०० | श्री.रामदास लक्ष्मण भगत, वगैरे |

संदर्भित मिळकती पुर्णत: निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सुचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासुन १४ दिवसांचे कालावधीत माझेकडे लेखी पुराव्यानिशी हरकत देऊन माझी खात्री पटवुन द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : २५/०९/२०२६

**ॲड. किशोर म.हजारे**
बी.कॉम.एल.एल.बी.
००१, वैद्यबाग को.ऑप
हौ.सो.कामत आळी,
ता.अलिबाग, जि.रायगड.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्या ने– तन्मणी, चींचपेटी, गड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८९६५**

# गणेश दर्शन स्पर्धा २०२६



● श्री संतोष चंद्रकांत कवळे, आवास यांच्या घरी विराजमान झालेले गणपती बाप्पा.



● कु. दर्शन सुरेश खडपे चौल सागमळा यांनी श्रींची केलेली आकर्षक सजावट.



● श्री. प्रमोद शैलेश नागवेकर बंधु यांनी बांबूपासून केलेली श्री गणेशाची आकर्षक सजावट. (छायाचित्र : सुरेश खडपे)



● सौ. रेखा देवानंद गोगर कोर्लई यांनी श्री गणरायाची साकारलेली सजावट. (छायाचित्र : सुरेश खडपे)



● कु. इथान अनिकेत ठाकूर चौलसागमळा यांनी श्री गणरायाची केलेली नयनरम्य सजावट. (छायाचित्र : सुरेश खडपे)



● श्री बाका पोईलकर यांच्या घरी बसलेली ७ फुटाची गणेश मूर्ती , सहाणगोठी



● विनोद सखाराम पाटील मुक्काम परहुर, मूर्तिकार श्याम घरात



● श्री. शशिकांत कमलाकर पाटील, पेझारी (आंबेपूर)




● सौ. श्वेता सचिन भगत, मु. आवास, ता. अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणपतीचे दर्शन घेताना किहीम सरपंच प्रसाद उर्फ पिंट्या गायकवाड. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● मुरूड तालुक्यातील मजगाव येथील लक्ष्मी अंबाजी यांच्या निवासस्थानी स्थानापन्न झालेली गणरायाची आकर्षक मंगलमूर्ती. (छायाचित्र : राजीव नेवासेकर)



● गोतावडे परिवार यांच्या निवासस्थानी विराजमान गणपती बाप्पा.



● सागर गजानन घाटकर, वाडगाव यांच्या घरी विराजमान झालेले गणराय.



●मिथिल पुरुषोत्तम घरत, ढोलपाडा, खंडाळा यांच्या घरी विराजमान झालेले बाप्पा.



● श्री. संदीप सुरेश पाटील, पळी यांच्या निवासस्थानी विराजमान गणपती बाप्पा



● संकेत साईनाथ घरत थळ पालथी निवासस्थानी गणेशाची सुबक मूर्ती व जंगल सीन देखावा.




● चेतन संजय घरत रा. वरसोली, विद्यानगर यांच्या निवासस्थानी विराजमान गणपती बाप्पा



● धोलपाडा येथील कु. मान्यता हितेश वेळे यांच्या घरी विराजमान गणराय.



● नामदेव नथू भोपी मु. मोठे भिंगार पनवेल रायगड यांच्या घरी विराजमान गणरायाची आकर्षक मूर्ती.



## राशीभविष्य

- **मेष** : व्यवसायात नव्या संधी लाभतील. नोकरीत कामाचा ताण हलका होईल. कुलदेवतेची उपासना करावी.
- **वृषभ** : सारं मनाप्रमाणे घडत जाईल. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राखावी. दूरच्या प्रवासचे बेत आखले जातील.
- **मिथुन** : नोकरीत सहकाऱ्यांशी मतभेद संभवतात. यांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील. बाकी चिंता नसावी.
- **कर्क** : उत्साहवर्धक घटना घडतील. क्रीडा, शिक्षण क्षेत्रात नव्या संधींचा लाभ घ्यावा. विचारानं रहावं.
- **सिंह** : आर्थिक अडचणी उद्भवतील. स्थावर प्रश्न प्रलंबित राहतील. विद्यार्थ्यांच्या कलांना वाव मिळेल.
- **कन्या** : कौटुंबिक वाद वेळीच टाळावेत. व्यवसायात साधारण स्थिती राहील. प्रवासात विशेष काळजी घ्या.
- **तूळ** : जुन्या स्मृतींना उजाळा मिळेल. प्रलंबित कामांना गती येईल. धार्मिक स्थळांची यात्रा सफल ठरेल.
- **वृश्चिक** : महत्त्वाचे निर्णय विचारानं घ्यावे. किरकोळ गोष्टींची अधिक चिंता करू नये. ताण-तणाव वाढेल.
- **धनु** : मनाविरूध्द घटना संभवतात. बोलताना शब्दांचा वापर विचारपूर्वक करावा. देवीची उपासना करावी.
- **मकर** : आर्थिक व्यवहारात लाभ होईल. कलाकारांचा उत्साह वाढेल. अंगभूत कला-गुणांचा विकास होईल.
- **कुंभ** : महत्त्वाचे करार होतील. कंत्राटी व्यवसायात अनुकूलता राहील. कार्याचं वरिष्ठांकडून कौतुक होईल.
- **मीन** : मनातील योजना साकार होऊ लागतील. नव्या ओळखी लाभदायक ठरतील. समाधानी रहाल.

स्टाईल स्टेटमेंट

## जुन्या साड्यांना द्या ट्विस्ट

✻ सिल्कच्या साडीचा अनारकली शिवता येईल. सध्या साडीचा इव्हिनिंग गाऊनही शिवला जातो. हा गाऊन खूप सुंदर दिसतो. इव्हिनिंग गाऊनचे बरेच डिझाइन्स आहेत. अनारकली शिवणार असाल तर साडीच्या रंगाला साजेसं कापड आणून स्टायलिश बॉटमही शिवून घ्या. शिफॉनचा प्लेन दुपट्टा घेऊन त्यावर साडीचे काठ लावता येतील. यामुळे दुपट्टा हेवी दिसेल. ✻ जॉर्जेटच्या साडीचा सलवार-कमीझ शिवता येईल. साडीवर फार वर्क नसेल तर अनारकली किंवा स्कर्ट टॉप शिऊन घ्या. अनारकलीवर हेवी दुपट्टा घ्या. ✻ लेहंगा चोली किंवा स्कर्ट टॉपसाठी दोन वेगळ्या साड्यांचं कॉम्बिनेशन करता येईल. दोन साड्या निवडून एका साडीचा टॉप आणि दुसरीचा स्कर्ट किंवा लेहंगा शिवता येईल. लेस आणि बटणांचा वापर करून पोशाखाला आकर्षक लूक देता येईल. ✻ कॉटनचे कपडे आरामदायी असतात. तसंच ते दिसतातही छान. कॉटनच्या साडीचाही ड्रेस शिवता येईल. ✻ एखाद्या प्रिंटेड साडीचाही सलवार कमीझ शिवता येईल. या साडीचा पदर दुपट्टा म्हणून वापरता येईल. दुपट्टयाच्या काठांना छानशी लेस लावा. यामुळे ड्रेसचा लूक खुलेल.

## २५ सप्टेंबर

दिन विशेष

**१९९८ :** प्रख्यात रंगकर्मी, दिग्दर्शक, निर्माते, लेखक कमलाकर सारंग यांचं निधन.
**१९९९ :** अवकाशशास्त्रज्ञ डॉ. कस्तुरीरंगन, रसायनशास्त्रज्ञ प्रा. एम. एस. शर्मा आणि डॉ. पाल रत्नासामी यांना एच. के. फिरोदीया पुरस्कार जाहीर.
**२०१३ :** केंद्र सरकारने कर्मचाऱ्यांसाठी सातवा वेतन आयोग स्थापण्याची घोषणा केली.
**२०१४ :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महत्त्वाकांक्षी 'मेक इन इंडिया' मोहिमेला प्रारंभ.

फन टाईम

## पर्यावरणपूरक विटा

छोट्या दोस्तांनो, आता पर्यावरणपूरक म्हणजे इको-फ्रेंडली विटा तयार करण्यात आल्या आहेत. 'इंडियन स्कूल ऑफ डिझाइन अँड इनोव्हेशन'मधल्या शास्त्रज्ञांनी या विटा तयार केल्या आहेत. या विटा तयार करण्यासाठी माती, सिमेंट, चारकोल आणि ऑरगॅनिक लुफ्फा फायबरचा वापर करण्यात आला आहे. या विटांमध्ये सिमेंट असलं तरी काँक्रिटच्या विटांच्या तुलनेत त्याचं प्रमाण बरंच कमी आहे. 'ग्रीन चारकोल ब्रिक्स' असं नाव या विटांना देण्यात आलं आहे. या विटांमध्ये हवा खेळती रहाण्यासाठी छोट्या पोकळ्या तयार करण्यात आल्या आहेत. या पोकळ्यांमुळे विटांमध्ये पाणी साठून रहातं आणि विटांचं तापमान कमी होतं. यामुळे घरात थंडावा जाणवतो. चारकोल हवेतलं नायट्रेट शोषून घेऊन हवा शुद्ध करतं. या विटा खूप हलक्या आहेत. तसंच त्या अगदी पटकन नष्टही होऊ शकतात. त्यामुळे बांधकामासाठी या विटांचा वापर होणं गरजेचं आहे. वातावरणात कार्बन डाय ऑक्साइडचं प्रमाण वाढत चाललं आहे. यामुळे जागतिक तापमानवाढीची समस्या निर्माण होते. सिमेंटमुळे कार्बनच्या उत्सर्जनात वाढ झाली आहे.

### पंचांग

**शुक्रवार, २५ सप्टेंबर २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
भाद्रपद शु. १४ **(अनंत चतुर्दशी)**,
चंद्रराशी : कुंभ,
नक्षत्र : शततारका, योग : शूल,
सूर्योदय ६.३०, सूर्यास्त ६.३०

### फॉरवर्ड्स

**हम क़िरदार हीं क़ुछ ऐसा ऱखते हैं...!**

**ज़ो आज़माने आतें हैं वो दीवानें हो जातें हैं...!**

आरोग्यमंत्र

## शांत झोप हवीय ?

' झोप लागत नाही ' ही तक्रार अलिकडे कोणत्याही वयोगटाची मंडळी करताना दिसतात. अर्थातच यामागे आपली बदललेली किंवा बिघडलेली जीवनशैली कारण आहे. रात्री उशीरापर्यंत टीव्हीसीरीअल्स बघणं, वाढतं हॉटेलिंग, वर्क फ्रॉम होम असलं तरीही उशीरापर्यंत करावं लागणारं काम, लहानमोठ्या पार्टी हे सारं निद्रानाशाला कारण आहेत. रात्री शांत झोप न लागण्यामुळे होणारे दुष्परिणाम लगेच जाणवतात.जागरणामुळे दुसऱ्या दिवशी लवकर जाग येत नाही. दिनचर्या बिघडते. डोकेदुखी, पचनक्रियेच्या तक्रारी, ॲसीडीटी, डोळयांची जळजळ, चिडचिड यासारखे त्रास होतात. त्यामुळं झोपेची वेळ पाळणं सगळयांत महत्त्वाचं. रात्री ११ ते पहाटे ३ ही गाढ झोपेची वेळ असते. या वेळेत झोप मिळाली तर झोपेचे चांगले परिणाम जाणवतात. झोपण्याअगोदर मन अगदी शांत असावं. झोपण्याची जागा स्वच्छ व प्रसन्न असावी. शक्यतो डोक्यावरुन पूर्ण पांधरुन घेऊ झोपू नये. दिवसभराची चादर रात्री झोपताना शक्यतो वापरु नये. उशी अगदी कमी जाडीची हवी. रात्रीचं जेवण आणि झोप यात निदान दोन ते तीन तासांचे अंतर ठेवावं म्हणजे खाल्लेलं अन्न पचण्यासाठी मदत होते. योग्य प्रमाणात आणि योग्य प्रकारे घेतलेली निद्रा बल, ओज आणि सुख प्राप्त करुन देणारी ठरते असं आयुर्वेदात म्हटलं आहे.



### वेगळ्या वाटा

'इंटरनॅशनल बिझनेस ऑपरेशन्स' या अभ्यासक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना विविध देशांमधल्या अर्थव्यवस्थेची ओळख करून दिली जाते. यासोबतच सध्याच्या औद्योगिक परिस्थितीत विविध अर्थव्यवस्थांच्या आपसातील संबंधांबाबतही विद्यार्थांना सजग के लं जातं. हा अभ्यासक्रम पूर्ण करून विद्यार्थी 'इंटरनॅशनल बिझनेस' या क्षेत्रात उत्तम करिअर करू शकतात. एक इंटरनॅशनल बिझनेस मॅनेजर आपल्या कंपनीच्या प्रगतीसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर धोरणात्मक व्यावसायिक योजना तयार करतो. आंतरराष्ट्रीय व्यापाराशी संबंधित समस्या ओळखून त्या सोडवण्याच्या दृष्टीने प्रयत्न करतो. **(क्रमश:)**

करिअरवाटा

## इंटर्नशीपकडे संधी म्हणून पहा

बरेचदा शालेय आणि कॉलेजमधलं शिक्षण बंद खोलीतलं म्हणजेच चार भिंतींच्या आतलं असतं. सहाजिकच ते पूर्णपणे पुस्तकी ज्ञानावर आधारलेलं असतं. मात्र नोकरी देणारी व्यक्ती, संस्था पुस्तकी ज्ञानापेक्षा त्या ज्ञानाच्या व्यवहारी वापराच्या कौशल्याला महत्त्व देत असते. त्यांच्या दृष्टीने तुम्ही पुस्तकी ज्ञानाचं उपयोजन कसं करता आणि त्या उपयोजनाचा आपल्याला फायदा होतो की नाही हे महत्त्वाचं असतं. आपली अशी उपयोगिता आहे की नाही, हे इंटर्नशीपमध्ये कळतं. पुस्तकी ज्ञानाचं उपयोजन कसं करावं हे या काळात शिकता येतं. मुख्य म्हणजे ते शिकण्यासाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध झालेल्या असतात. म्हणूनच चांगली नोकरी मिळवून उत्तम करीअर करू इच्छिणाऱ्या तरूण-तरूणींसाठी इंटर्नशीप ही उत्तम संधी असते. काही विद्यार्थी इंटर्नशीपसाठी ज्या उद्योगात जातात तिथं एवढं चांगलं काम करून दाखवतात की त्यांना तिथंच नोकरी मिळून जाते. आपल्याला ज्या इंडस्ट्रीमध्ये नोकरी करायची आहे ती इंडस्ट्री कशी चालते, हे पाहण्याची संधी, तिथल्या लोकांशी संपर्क वाढवण्याची संधी म्हणून ते इंटर्नशीपकडे पाहतात. म्हणूनच इंटर्नशीप महत्वाचा टप्पा समजायला हवा.




खेचाखेची

### पिवळा रंग

**मुलगा** - मला तुझे दात खूप आवडतात.

**मुलगी** - अय्या! खरंच?

.
.
.
.
.

**मुलगा** - हो, कारण पिवळा माझा फेव्हरेट रंग आहे.

वेगळं काही

शास्त्रज्ञांना सायबेरियातल्या डेनिसोवा गुहेत गुहेत ४० हजार वर्षांपूर्वीची बांगडी सापडली आहे. इथेच एक लाख २५ हजार वर्षांपूर्वी लुप्त झालेल्या जनावरांची हाडंही सापडली होती. या भागात डेनिसोवा जमातीचे लोक रहात होते. डेनिसोवन ही मानवाची एक प्रजाती होती. जवळपास १० लाख वर्षांपूर्वी त्यांचं अस्तित्व होतं. शास्त्रज्ञांना डेनिसोवन महिलेची हाडं आणि दातही सापडले होते. डेनिसोवन्स जमातीचं सध्याच्या मानवजातीशी काहीच साधर्म्य नव्हतं. डेनिसोवन्स सध्याच्या मानवाजातीपेक्षा बरेच प्रगत आणि शक्तीशाली असल्याचंही बोललं जात होतं. दरम्यान शास्त्रज्ञांना सापडलेल्या या बांगडीवरची कलाकुसर खूपच अनोखी आहे.

संगोपन

## मुलं हट्टी झालीत?

काही मुलांच्या ठायी आक्रमकता, हट्टीपणा प्रकर्षाने बघायला मिळतो. अशा मुलांचं संगोपन करताना पालकांनी काही बाबी लक्षात घ्याव्या. मुलांमधली आक्रमकता कमी करण्यासाठी पालकांनी काय करायला हवं?

✻ मुलं थोडी कळती असतील तर जबाबदारीने वागणं आणि इतरांचा आदर करणं का गरजेचं आहे हे मुलांना समजावून सांगा. त्यांना हट्टीपणा करण्याचे, सतत आक्रमक वागण्याचे दुष्परिणाम सांगा. ✻ मुलांसाठी त्यांचे पालकच आदर्श असतात. पालकांच्या वागणुकीतून ते धडा घेतात. त्यामुळे पालकांनी आधी स्वत:ची वागणूक सुधारली पाहिजे. मुलांसमोर भांडण टाळायला हवं. गरजूंना मदत करणं कसं गरजेचं आहे हे मुलांच्या मनावर बिंबवायला हवं. पालकांची प्रेमाची वागणूक बघून मुलंही त्याप्रमाणे वागू लागतील. ✻ मुलांच्या चुकीच्या वागणुकीला तुम्ही डोळे वटारत असाल तरी त्यांच्या चांगल्या वागणुकीचं कौतुकही करा. मुलांनी कोणाला मदत केली तर पाठीवर शाबासकीची थाप द्या. ✻ मुलांना बाहेरच्या परिस्थितीची जाणीव करून द्या. एखाद्या अनाथाश्रमात मुलांचा वाढदिवस साजरा करा. समाजसेवेचे धडे द्या. यामुळे त्यांचा आक्रमकपणा कमी होईल.



## सुडोकू १५३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | ६ | ३ | ७ | ८ | | | | |
| १ | | ८ | | | २ | ३ | | ९ |
| | | | ९ | | | | | |
| | | | | | | | २ | |
| २ | | ५ | | ४ | | १ | | ८ |
| | १ | | | | | | | |
| | | | | | ७ | | | |
| ५ | | ४ | १ | | | २ | | ७ |
| | | | | ५ | ६ | ८ | ३ | १ |

**टीप -**
✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १५२ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | ९ | १ | ३ | ४ | ५ | ७ | २ | ६ |
| ३ | ४ | ६ | ९ | ७ | २ | १ | ५ | ८ |
| ५ | २ | ७ | १ | ६ | ८ | ४ | ३ | ९ |
| १ | ७ | ४ | ८ | ३ | ६ | २ | ९ | ५ |
| ६ | ८ | २ | ४ | ५ | ९ | ३ | १ | ७ |
| ९ | ३ | ५ | २ | १ | ७ | ६ | ८ | ४ |
| ७ | ५ | ३ | ६ | ९ | १ | ८ | ४ | २ |
| २ | १ | ९ | ७ | ८ | ४ | ५ | ६ | ३ |
| ४ | ६ | ८ | ५ | २ | ३ | ९ | ७ | १ |

## शब्दकोडे क्रमांक १५३



**आडवे शब्द :-**
१) भारतीय विमानांनी या गावातील अतिरेक्यांचा अड्डा नष्ट केला
४) पाय(हिं)
६) एखाद्यास दान केलेला मजकूर असलेला कागद
८) जास्वंद
१०) अबोलीचा हार
११) निर्नायकी स्थिती
१३) सरबत इ पेय
१४) युक्ती
१५) ✻✻ ✻✻✻ जय किसान
१७) गाव
१९) गळणारा
२१) डाग (हिं )
२२) झकास
२३) वक्र
२४) तिखटमीठाचा शिरा
२५) चिंतन
२७) पंख
३९) डोळ्याला सुरमा लावण्याची धातूची कांडी
३१) जैन साधू
३३) चलाख, हुशार
३६) पुरुष
३७) विठ्ठलाची पत्नी
३८) एक दागिना
३९) गोणपाटाचा तुकडा
४१) अभिप्राय ४४) रत्न
४६) परीक्षा, ज्ञान
४८) एक लक्ष
५०) गायकाला तबल्याची साथ देणारा
५३) चटपट, लवकर
५५) खोटे, नकली
५७) मोठी वाटी
५८) मीठाची चव
५९) दुसऱ्यासाठी केलेला खर्च
६२) माणूस
६३) थाळी
६४) संपत्ती
६५) लक्ष्मीचे एक नाव
६६) निरुपाय
६८) अक्षरापुढची रेघ
६९) जनकजननी
७१) पळून जाणे
७४) धनी
७५) शंभर
७५) सैनिकी शिक्षण

**उभे शब्द :-**
१) माळी
२) शरम
३) अगदी नवा
४) मोठे पसरट ताट
५) हत्ती
६) देणारा
७) जगाच्या कल्याणासाठी केलेली एक प्रार्थना
८) जन्ममृत्यू
९) साखरेचा रस
११) मृत्यु नसलेला
१२) ललाट
१३) बासरी
१६) दुनिया
१८) रानरेडा
१९) गजवदन
२०) कावीळ, हळद्या रोग
२४) संध्याकाळ
२६) होकारच्या विरुद्ध
२७) एक फळ
२८) रात्र संपेपर्यंत
२९) वर वधू मधील पडदा
३०) लज्जा
३१) क्षमाशील
३२) ओटा
३४) चित्रपटाचा पडदा
३५) पद्धत
४०) चेष्टा, उपहास
४२) तळे
४३) ✻✻ तलवार
४५) अभिनेता
४७) बातमी
४९) प्रयत्न
५१) अनमोल
५२) प्राण
५४) पडणे
५६) अपशकुन
५७) थोडेसे बाजूला होणे
६०) श्रीविष्णुचे एक नाव
६१) एक दुतोंडी छोटे चर्मवाद्य
६२) विपुलता, रेलचेल
६३) संगीतातील ठेका
६६) निराश
६७) पाणकोंबडा
६८) मिश्रण, हिंदीत काळा रंग
७०) दह्याचे पातळसर पेय
७१) रस्ता
७२) नूतन
७३) रात्र

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ड | ळा | मा | र | णे | | भ | स्म | सा | त | हो | णे | | म | स |
| बो | | स्त | व | | च | र | | प | ड | का | | अ | त्त | र |
| ले | ट | र | | भा | रा | भ | र | | का | र | खा | ना | | का |
| | क्क | | श्वा | न | | रा | | सा | फ | | स | क | वा | र |
| मा | ल | कं | स | | फा | ट | क | | ड | फ | | ल | व | |
| र्फ | | ग | | ह | य | | च | म | की | | ध | नी | | ब |
| त | ल | वा | र | | र | म | रा | ट | | स | म | य | वे | त्ता |
| | हा | | सा | य | | न | | का | च | | क | | स | सा |
| मा | न | व | | म | धु | क | र | | र | ट्टा | | पा | क | |
| रा | स | | छा | या | | व | स | व | स | | अ | न | र | सा |
| मा | र | वा | | त | ग | डा | | र | | | मो | | | धा |
| री | | न | र | ना | री | | क | व | डी | मो | ल | | आ | र |
| | स | व | त | | ब | रो | ब | र | | ग | | सा | ब | ण |
| स | ह | सा | | न | | क | र | | पा | रा | वा | र | | |
| म | ज | | क | ड | क | ड | | तो | रा | | चा | क | व | त |

# गणेश दर्शन स्पर्धा २०२६



●श्री. जयेश भास्कर पाटील - रा.कार्ले (मा. सरपंच मान तर्फे झिराड ग्रामपंचायत) यांच्या घरी विराजमान गणपती. देखावा नांदतो बैलजोडी संग, येतो शेतकऱ्याच्या दारी, सुख-समृद्धी घेऊन आला, माझा विघ्नहर्ता घरी!



● मुरुड तालुका पंचायत समितीचे माजी सभापती चंद्रकांत कमाने मजगांव येथील आपल्या निवासस्थानी विराजमान झालेल्या गणरायाला वंदन करताना. (छाया:राजीव नेवासेकर)



● श्री. प्रजोत्य राऊळ, मु. आवास, ता. अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणपतीचे दर्शन घेताना किहीम सरपंच प्रसाद उर्फ पिंट्या गायकवाड व इतर. (छायाचित्र - अब्दुल सोगावकर)



● सौ. वृषाली सचिन पाटील, मु. आवास, ता. अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणपतीचे दर्शन घेताना किहीम सरपंच प्रसाद उर्फ पिंट्या गायकवाड. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● श्री. समीर सावंत, मु. तळवडे(गोठेघर), ता. अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणपतीचे दर्शन घेताना किहीम सरपंच प्रसाद उर्फ पिंट्या गायकवाड. (छायाचित्र - अब्दुल सोगावकर)



● मुरुड नगरपरिषदेच्या नगरसेविका प्रांजली मकू यांच्या निवासस्थानी स्थानापन्न झालेली लालबागचा राजा गणरायाची आकर्षक मंगलमूर्ती (छाया:राजीव नेवासेकर)

## निवडक

### भारताचा ऑस्ट्रेलियावर विजय

**नवी दिल्ली** : भारतीय आणि ऑस्ट्रेलियन १९ वर्षांखालील संघांमधील तीन सामन्यांच्या युवा एकदिवसीय मालिकेतील पहिला सामना रोमांचक ठरला. पावसामुळे बाधित झालेल्या या सामन्यात



भारताने ऑस्ट्रेलियाचा सात धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना भारताने २० षटकांत सहा गडी गमावून १८२ धावा केल्या. प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाला सात गडी गमावून केवळ १७५ धावाच करता आल्या. अन्वय द्रविड आणि आर्यवीर सेहवाग हे देखील या सामन्यात मैदानात उतरले होते. सहाव्या क्रमांकावर फलंदाजी करताना अन्वयने अवघ्या १८ चेंडूंमध्ये ३८ धावांची वेगवान खेळी केली. त्याने दोन चौकार आणि तीन षटकार मारले. त्याचा स्ट्राईक रेट २११.११ होता. आर्यवीरने आपल्या वडिलांप्रमाणेच डावाची सुरुवात केली आणि पाच चौकारांसह २६ चेंडूंमध्ये २८ धावा केल्या. प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारतीय संघाची सुरुवात चांगली झाली नाही आणि १२ व्या षटकापर्यंत त्यांची धावसंख्या चार गडी गमावून ८८ झाली होती.

### भारतीय पुरुष बॅडमिंटन संघाला कांस्यपदक

**नागोया** : आशियाई खेळ २०२६ च्या उपांत्य फेरीत चीनकडून ३-१ असा पराभव पत्करल्यानंतर भारतीय पुरुष बॅडमिंटन संघाने कांस्यपदक जिंकले. सात्विकसाईराज रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी पुरुष दुहेरीच्या सामन्यात विद्यमान जागतिक विजेते लियांग वेईकेंग आणि वांग चांग यांचा २१-११, २२-२० असा पराभव करून या लढतीत भारताचा एकमेव विजय नोंदवला. लक्ष्य सेनला सुरुवातीच्या सामन्यात शी युकीकडून २१-१६, २१-१८ असा पराभव स्वीकारावा लागला. लक्ष्यने दमदार सुरुवात केली होती, परंतु शीने जोरदार पुनरागमन करत पहिला गेम जिंकला. दुसऱ्या गेममध्येही भारतीय खेळाडूने कडवी झुंज दिली आणि १६-१६ अशी बरोबरी साधली, मात्र अखेरीस चिनी खेळाडूने सामना जिंकला. आशियाई खेळांमधील पुरुष दुहेरीचे विद्यमान विजेते असलेल्या सात्विक आणि चिराग यांनी जागतिक क्रमवारीत तिसऱ्या स्थानावर असलेल्या चिनी जोडीविरुद्ध उत्कृष्ट कामगिरी केली. उपांत्यपूर्व फेरीत यजमान जपानचा ३-० असा पराभव करून भारताने पदक निश्चित केले होते. हाँगझोऊ २०२३ आशियाई क्रीडा स्पर्धेत रौप्यपदक जिंकणाऱ्या भारताने सलग दुसऱ्यांदा पदक पटकावले होते.

### इराणवर ३७-२३ ने विजय



**जपान** : आयची-नागोया आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये भारतीय महिला कबड्डी संघाने आपली विजयी घौडदौड कायम राखत, गट-फेरीतील सामन्यात इराणचा ३७-२३ ने पराभव केला. भारताची सुरुवात संथ झाली आणि पहिल्या सत्रात संघ इराणपेक्षा ९-११ अशा गुणांनी पिछाडीवर होता; मात्र त्यानंतर भारतीय संघाने जोरदार पुनरागमन केले. भारतीय संघाने सामन्याची सूत्रे आपल्या हाती घेत पहिल्या सत्राच्या अखेरीस १९-१५ अशी आघाडी घेतली. भावना देवीने महत्त्वपूर्ण टॅकल्स करत महत्त्वाची भूमिका बजावली, तर पूजाने मोक्याच्या क्षणी गुण मिळवून भारताला सामन्यावरील पकड कायम राखण्यास मदत केली. दुसऱ्या सत्रात भारताने आपली आघाडी अधिक वाढवली आणि इराणवर ३७-२३ असा सहज विजय मिळवला. महिलांच्या कबड्डी स्पर्धेतील भारताचा हा सलग दुसरा विजय ठरला.

# भारतीय महिलांनी थायलंडचा उडवला धुव्वा

**| नागोया (जपान) | वृत्तसंस्था |**

आशियाई क्रीडा २०२६ मध्ये भारतीय महिला हॉकी संघाची विजयी घोडदौड कायम आहे. उझबेकिस्तान आणि इंडोनेशियाला पराभूत केल्यानंतर, भारतीय संघाने थायलंडचाही धुव्वा उडवत आपला सलग तिसरा दणदणीत विजय नोंदवला. बुधवारी खेळल्या गेलेल्या पूल 'बी'च्या सामन्यात भारताने शानदार कामगिरी करत थायलंडला २०-१ अशा मोठ्या फरकाने पराभूत केले. ६० मिनिटे चाललेल्या या एकतर्फी सामन्यावर भारतीय संघाचे पूर्णपणे वर्चस्व होते.या सामन्यात दीपिका सेहरावतने नऊ गोल करून भारतासाठी सर्वाधिक गोल केले. नवनीत कौरने चार, ऋतुजा पिसाळने तीन, तर लालरेम्सियामी, नेहा, साक्षी आणि सलीमा यांनी प्रत्येकी एक गोल केला.





**दीपिकाने स्वतःचाच मोडला विक्रम**

भारतीय महिला हॉकी संघाने आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये आतापर्यंत तीन सामन्यांमध्ये ५६ गोल केले आहेत. दीपिकाने स्वतःचाच विक्रम मोडून आशियाई क्रीडा स्पर्धेतील एकाच महिला हॉकी सामन्यात सर्वाधिक गोल करणारी खेळाडू बनण्याचा मान मिळवला आहे. यापूर्वी, दीपिकाने उझबेकिस्तानविरुद्धच्या सामन्यात आठ गोल केले होते. भारतीय महिला हॉकी संघाने आशियाई क्रीडा स्पर्धेत आतापर्यंत आपले तिन्ही सामने जिंकले आहेत. भारताने यापूर्वी उझबेकिस्तान आणि इंडोनेशियाला पराभूत केले आहे. त्यांचा पुढील सामना २५ सप्टेंबर रोजी जपानशी होईल.

सामन्याच्या दुसऱ्याच मिनिटाला दीपिका सेहरावतने भारताला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर चौथ्या मिनिटाला नवनीत कौरने ही आघाडी दुप्पट केली. त्यानंतर दीपिकाने ८व्या आणि ९व्या मिनिटाला सलग गोल केले. भारतीय खेळाडूंनी गोल करणे सुरूच ठेवले आणि थायलंडसमोर गोलांचा डोंगर उभा केला. याशिवाय,अनुभवी मिडफिल्डर नेहा (१९व्या मिनिटाला), लालरेम्सियामी (२६व्या मिनिटाला), साक्षी राणा (२९व्या मिनिटाला) आणि कर्णधार सलीमा टेटे (४५व्या मिनिटाला) यांनी प्रत्येकी एक गोल केला.

पहिल्या तीन क्वार्टर्समध्ये भारतीय संघाचे वर्चस्व इतके होते की थायलंडला एकही गोल करता आला नाही. मात्र, चौथ्या क्वार्टरमध्ये थायलंडने आपले खाते उघडले. सामना संपण्याच्या काही वेळ आधी थायलंडला पेनल्टी कॉर्नर मिळाला. ५७ व्या मिनिटाला सुपांसा सामान्सोने थायलंडसाठी एकमेव गोल केला. भारतीय संघाने सामन्यावर पूर्णपणे वर्चस्व गाजवत २०-१ असा एकतर्फी विजय मिळवला.

भारतीय संघ संपूर्ण सामन्यात आक्रमकपणे खेळला आणि प्रतिस्पर्धी संघावर दबाव कायम ठेवला. शानदार अटॅक आणि उत्कृष्ट समन्वयाच्या जोरावर भारताने सामन्यावर पूर्ण नियंत्रण राखले आणि प्रतिस्पर्धी संघाला पुनरागमन करण्याची कोणतीही संधी दिली नाही. चौथ्या क्वार्टरच्या अखेरीस थायलंडला एक गोल करण्यात यश आले. पेनल्टी कॉर्नरवर सुपंसा समन्सूच्या ड्रॅग-फ्लिकने चेंडू किंचित भारतीय गोलमध्ये वळवला, ज्यामुळे थायलंडला सामन्यातील एकमेव गोल मिळाला. भारताचा हा विजय 'पूल बी' मधील तिसरा विजय होता. यापूर्वी, संघाने इंडोनेशियाला १७-१ ने पराभूत केले होते.

## मीराबाई चानूला 'रौप्यपदक'

**| नागोया (जपान) | वृत्तसंस्था |**

ऑलिम्पिक पदक विजेती आणि तीन वेळा राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणाऱ्या मीराबाई चानूने आयची-नागोया आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये महिला वेटलिफ्टिंग ४९ किलो वजनीगटात रौप्य पदक जिंकून आशियाई क्रीडा स्पर्धेतील आपले पहिले पदक मिळवले. कर्णम मल्लेश्वरीच्यानंतर, ऑलिम्पिक, आशियाई क्रीडा स्पर्धा, राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा, जागतिक अजिंक्यपद स्पर्धा तसेच आशियाई आणि राष्ट्रकुल अजिंक्यपद स्पर्धा यांसारख्या सर्व प्रमुख आंतरराष्ट्रीय वेटलिफ्टिंग स्पर्धांमध्ये पदक जिंकणारी मीराबाई चानू ही दुसरी भारतीय वेटलिफ्टर ठरली आहे. चानूने या स्पर्धेत दमदार कामगिरी करत एकूण १९८ किलो वजन उचलले. तिने स्नॅच प्रकारातील तिन्ही प्रयत्न यशस्वीरीत्या पूर्ण केले आणि अनुक्रमे ८३ किलो, ८५ किलो व ८७ किलो वजन उचलले. क्लीन अँड जर्क प्रकारात, या भारतीय वेटलिफ्टरने १०७ किलो वजन उचलून सुरुवात केली आणि त्यानंतर १११ किलोचा दुसरा प्रयत्न यशस्वीरीत्या पूर्ण केला, ज्यामुळे तिची एकूण कामगिरी १९८ किलोची झाली. उत्तर कोरियाच्या री सोंग गम हिने एकूण २१५ किलो वजन उचलून स्पर्धेवर वर्चस्व गाजवले आणि सुवर्णपदक जिंकले, तर चानूने रौप्य पदक पटकावले. विजयाना हिने कांस्य पदक जिंकले. चानूसाठी हे पदक एक ऐतिहासिक कामगिरी ठरली.



## सोनम मस्करची ऐतिहासिक कामगिरी

**| कोल्हापूर | प्रतिनिधी |**

कोल्हापूरच्या सोनम मस्कर या आंतरराष्ट्रीय नेमबाजपटूने आपल्या अचूक निशाण्याने आणि जिद्दीने जागतिक क्रीडापटलावर भारताचा झेंडा दिमाखात फडकवला आहे. जपानमधील आयची-नागोया येथे आयोजित आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये, महिलांच्या १० मीटर एअर रायफल सांघिक प्रकारात सोनम मस्कर, एलावेनिल वालारिवन आणि विदार्सा विनोद या भारतीय त्रिकुटाने १८९८.० गुणांची संयुक्त कमाई करत ऐतिहासिक रौप्यपदक पटकावलं. या स्पर्धेत चीननं १९०४.२ गुणांचा नवा जागतिक विक्रम नोंदवत सुवर्णपदक मिळवले.

## रोनाल्डो पोर्तुगालच्या संघात सामील

**| लिस्बन (पोर्तुगाल) | वृत्तसंस्था |**



पोर्तुगालचा दिग्गज फुटबॉलपटू ख्रिस्तियानो रोनाल्डो युईएफए नेशन्स लीगच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय संघात सामील झाला आहे. २४ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या या स्पर्धेसाठी राष्ट्रीय संघाच्या शिबिरात पोहोचल्याचे फोटो ख्रिस्तियानोने शेअर केले आहेत. नवे मुख्य प्रशिक्षक जॉर्ज जीझस यांनी आगामी नेशन्स लीग सामन्यांसाठी ख्रिस्तियानो रोनाल्डोची संघात निवड केली आहे. पोर्तुगाल आपल्या नेशन्स लीग मोहिमेची सुरुवात २४ सप्टेंबर रोजी घरच्या मैदानावर वेल्सविरुद्धच्या सामन्याने करेल. त्यानंतर २७ सप्टेंबर रोजी ते नॉर्वेविरुद्ध त्यांच्याच मैदानावर (अवे मॅच) खेळतील, १ ऑक्टोबरला डेन्मार्कविरुद्धच्या सामन्यासाठी प्रवास करतील आणि ४ ऑक्टोबरला नॉर्वेचे यजमानपद भूषवतील. याआधी, रोनाल्डोने होते की, फिफा विश्वचषक ही या स्पर्धेतील त्याची शेवटची उपस्थिती असेल. मात्र, आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्ती घेण्याबाबत त्याने अद्याप कोणतीही निश्चित घोषणा केलेली नाही.२०२८ ची युरोपियन चॅम्पियनशिप होईल तेव्हा रोनाल्डो ४३ वर्षांचा असेल. पाच वेळा बॅलन डी ओर पुरस्कार जिंकणारा रोनाल्डो हा पुरुषांच्या आंतरराष्ट्रीय फुटबॉलमध्ये सर्वाधिक गोल (१४६ गोल) करणारा फुटबॉलपटू आहे.

**कार्यवाह चित्रलेखा पाटील यांच्याकडून विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक | जिल्हास्तरीय शालेय बॉक्सिंग स्पर्धेत घवघवीत यश**

# पीएनपीचे विद्यार्थी मुंबई विभागीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी सज्ज

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

जिल्हा क्रीडा अधिकारी, अलिबाग-रायगड आणि एचओसीएल, रसायनी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय शालेय बॉक्सिंग क्रीडा स्पर्धा २०२६-२७ मध्ये पीएनपी होली चाईल्ड स्कूल स्टेट बोर्ड, वेश्वी-अलिबागच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले. या स्पर्धेतील दमदार कामगिरीच्या जोरावर शाळेच्या १३ विद्यार्थ्यांची मुंबई विभागीय बॉक्सिंग क्रीडा स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.



स्पर्धेत १४ वर्षांखालील मुलांच्या ३४-३६ किलो वजनी गटात तनिष्क राकेश रामनाथकर याने प्रथम क्रमांक पटकावला. १७ वर्षांखालील मुलांच्या ६३-६६ किलो वजनी गटात निमिष विश्वनाथ करावडे याने द्वितीय, तर ५२-५४ किलो वजनी गटात हमजा इरफान मुकादम याने तृतीय क्रमांक मिळवला.

१९ वर्षांखालील मुलींच्या गटात नुपूर सतीश बुंदके (५७-६० किलो), श्रावणी निकेत भगत (४५-४८ किलो) आणि कल्याणी वैजनाथ पवार (८१ किलोपेक्षा अधिक) यांनी आपल्या वजनी गटात प्रथम क्रमांक मिळवला. तसेच अर्पिता प्रवीण पाटील (४५ किलो) हिने द्वितीय क्रमांक, तर भूमी सहदेव हलदार (४८-५१ किलो) आणि राणी लक्ष्मण ठाकूर (४५ किलो) यांनी तृतीय क्रमांक पटकावला.

१९ वर्षांखालील मुलांच्या गटात तन्मय रुपेश लखन (८१-९१ किलो) आणि शौर्य देवेंद्र तांबोळी (४६-४९ किलो) यांनी प्रथम क्रमांक मिळवला. रुद्र समीर पाटील (४६-४९ किलो) याने द्वितीय, तर निसर्ग मंगेश पाटील (७०-७५ किलो) याने तृतीय क्रमांक मिळवला.

या सर्व विद्यार्थ्यांची मुंबई विभागीय बॉक्सिंग क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या उल्लेखनीय यशाबद्दल पीएनपी संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, होली चाईल्ड एसएससी बोर्डच्या मुख्याध्यापिका निसर्गा चेवले, उपमुख्याध्यापिका शर्मिला शेटे, क्रीडा मार्गदर्शक अक्षय डाकी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. मुंबई विभागीय स्पर्धेतही विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करून शाळेचे, संस्थेचे आणि रायगड जिल्ह्याचे नाव उज्वल करावे, यासाठी सर्वांनी त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)